# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

मंगळवार, २२ ऑगस्ट २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - २५

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● TUESDAY 22 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-25 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-14 ● PRICE-5


# समुद्रकिनारी कोट्यवधींचे ड्रग्ज

## रत्नागिरी जिल्ह्यातील किनाऱ्यांवरून २५० किलोहून अधिक ड्रग्स ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**रत्नागिरी : महाराष्ट्राच्या पश्चिम टोकाला समुद्रकिनारी कोट्यवधी रुपयांचे ड्रग्ज सापडल्याने खळबळ उडाली आहे. हे ड्रग्स समुद्राच्या लाटांनी तरंगणाऱ्या पॅकेट्सच्या स्वरूपात किनाऱ्यावर आढळून आले. रत्नागिरी जिल्ह्यातील सात वेगवेगळ्या किनाऱ्यांवरून सीमाशुल्क विभागानं 250 किलोहून अधिक ड्रग्सचे पॅकेट्स ताब्यात घेतले. प्रशासनाकडून आधीच निर्बंध लादण्यात आलेल्या या ड्रग्सचे प्लास्टिकच्या पिशव्यांचे पॅकेट्स 14 ऑगस्ट ते 17 ऑगस्ट दरम्यान महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या किनाऱ्यांवर वाहून आले. कर्डे, लाडघर, केळशी, कोलथरे, मुरुड, बुरुंडी, दाभोळ आणि बोऱ्या समुद्रकिनाऱ्यांवर ही ड्रग्सची पाकिटे जप्त करण्यात आली आहेत.**

**गुजरातच्या समुद्र किनाऱ्यावरही अंमली पदार्थ आढळले :** गेल्या वर्षी 2022 मध्ये गुजरातमधील पोरबंदर आणि जुनागढ



जिल्ह्यात समुद्र किनाऱ्या लगतच्या भागातही ड्रग्जचे पॅकेट्स वाहून आल्याचे पाहायला मिळाले होते. तब्बल 59 प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये पॅक केलेले ड्रग्ज किनाऱ्यावर आढळून आले होते. प्रत्येक पॅकेटचे वजन सुमारे एक किलो होते. जुनागडमधील मंगरोळ आणि पोरबंदरमधील माधवपूर येथून संशयित ड्रग्ज असलेली पाकिटं जप्त करण्यात आली होती.

2019 मध्ये, सीमा सुरक्षा दलाने गुजरातच्या कच्छ जिल्ह्यातील क्रीक भागांत समुद्र किनाऱ्यावर ड्रग्सची दोन पाकिटे आढळून आली होती. या दोन्ही पॅकेटचे वजन सुमारे दोन किलो असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले होते. बीएसएफ अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ही दोन ड्रग पॅकेट्स पाकिस्तानी क्रूने समुद्रात टाकलेल्या मोठ्या प्रतिबंधित ड्रग्सच्या कन्साइनमेंटचा भाग होती. दरम्यान, ड्रग्ज समुद्रात टाकण्याची घटना भारतीय तटरक्षक दलाने मे 2019 मध्ये गुजरातच्या जाखाऊ किनारपट्टीवर 'अल मदिना' या पाकिस्तानी ड्रग्सने भरलेल्या जहाजाचा पाठलाग करून पकडले तेव्हा घडली होती.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या समुद्रकिनाऱ्यांवर वाहून आलेली ड्रग्सची पाकिटे अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधून वाहून आली असावीत, असा सीमाशुल्क विभागाला संशय आहे. ही अंमली पदार्थांची पाकिटे एकतर समुद्रात पडली असतील किंवा अंमली पदार्थांच्या तस्करीच्या उद्देशानं परदेशी जहाजांमधून फेकण्यात आली असतील, असा संशयही सीमाशुल्क विभागाकडून व्यक्त केला जात आहे. दरम्यान, स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला सुरक्षा गस्तीदरम्यान, रत्नागिरीतील दापोली सीमाशुल्क विभागाच्या तटरक्षक दलाला कर्डे समुद्रकिनारी वाहून आलेले 10 संशयास्पद पॅकेट्स (एकूण 12 किलो वजनाची) आढळून आली. तात्काळ ही ड्रग्सची पाकिटे सीमाशुल्क विभागाने ताब्यात घेतली आणि त्यांची तपासणी केली. तपासाअंती चरस (हशीश) असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर केळशी ते बोर्या परिसरात सीमाशुल्क विभागाकडून शोधमोहीम राबविण्यात आली. 15 ऑगस्ट रोजी कर्डे ते लाडघर समुद्रकिनारी सुमारे 35 किलो चरस असलेली प्लास्टिकची पाकिटे आढळून आली. 16 ऑगस्ट रोजी केळशी समुद्रकिनाऱ्यावरून 25 किलो आणि कोलथरे समुद्रकिनाऱ्यावरून 13 किलो ड्रग्स जप्त करण्यात आले होते. 17 ऑगस्ट रोजी मुरुड येथून 14 किलोंपेक्षा जास्त, बुरुंडी ते दाभोळ खाडीदरम्यान 101 किलो, तर बोऱ्या येथून 22 किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले. नंतर, कोलथरे समुद्रकिनाऱ्याच्या खडकाळ भागातही मोठ्या प्रमाणावर चरस असलेली पाकिटं आढळून आली. दापोली सीमा शुल्क विभागाचे सहाय्यक आयुक्त श्रीकांत कुडाळकर यांनी यासंदर्भात माहिती देताना सांगितले की, आमची शोध मोहीम सुरू आहे. तरीही समुद्रकिनारी राहणाऱ्या स्थानिक लोकांना अशी कोणतीही पाकिटे आढळल्यास आमच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन आम्ही करत आहोत. बेकायदेशीर अंमली पदार्थ बाळगणाऱ्यास 10 वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाच्या शिक्षेची तरदूत असल्याचंही यावेळी त्यांनी सांगितलं.

### महत्त्वाची बातमी

## चांद्रयान २ च्या अपयशातून खूप काही शिकलो : प्रा. पाधी


आधुनिक केसरी न्यूज

**बंगळुरु :** चांद्रयान ३ च्या विक्रम लँडरमध्ये एक असे टेक्निक इनबिल्ट केले आहे जे सॉफ्ट लँडिंगमध्ये त्याची मदत करेल. काहीही गडबड झाली तरीही या तंत्रामुळे व्यवस्थित लँडिंग होईल अशी माहिती एअरोस्पेस वैज्ञानिकाने दिली. चांद्रयान २ हे जेव्हा अपयशी झाले त्या अपयशातून आम्ही खूप काही शिकलो आहोत. त्यामुळे आम्हाला इतका आत्मविश्वास आहे की विक्रम लँडरचे लँडिंग अगदी व्यवस्थित होईल. बंगळुरु या ठिकाणी असलेल्या भारतीय विज्ञान संस्थेचे एयरोस्पेस वैज्ञानिक प्रा. राधाकांत पाधी यांनी चांद्रयान दोन विषयीही महत्त्वाची माहिती दिली. राधाकांत असे म्हणाले की चांद्रयान २ ही मोहीम अपयशी ठरली कारण त्यावेळी विक्रम लँडर आपला वेग नियंत्रित करु शकले नव्हते त्यामुळे ते कोसळले. हे अपयश अल्गोरिदमचे होते. मात्र आम्ही त्यातून शिकलो आहोत आणि यात आता अनेक महत्त्वाच्या सुधारणा केल्या आहेत. विक्रम लँडर आता आणखी बळकट करण्यात आले आहे. एनडीटीव्हीशी चर्चा करताना राधाकांत पाधी यांनी ही माहिती दिली. प्राध्यापक राधाकांत पाधी चांद्रयान २ आणि ३ या दोन्हीच्या लाँचिंगमध्ये सहभागी होते. भारतीय विज्ञान संस्थेच्या एअरोस्पेस विभागातही त्यांचे मोठे योगदान आहे. भारतीय अंतराळ संस्था ISRO चे वैज्ञानिक चांद्रयान २ च्याबाबतीत अति आत्मविश्वासात होते. असंही वक्तव्य पाधी यांनी केले आहे. राधाकृष्ण पाधी यांनी असे म्हटले आहे की, यावेळी लँडिंग यशस्वी होईल. चांद्रयान ३ ला सहा सिग्मा बाउंड साठी डिझाईन तयार करण्यात आले आहे.

## मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. जगदीश कदम

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील



यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. या बैठकीत गंगापूर येथे आयोजित ४३ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. जगदीश कदम यांची एकमताने निवड करण्यात आली. जगदीश कदम हे गेल्या पाच शतकांपासून लेखन करीत आहेत. कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, व्यक्तिचित्र, समीक्षा अशा विविध साहित्य प्रकारांत त्यांनी लेखन केले आहे. त्यांनी रास आणि गोंडर, झाडमाती, नामदेव शेतकरी, गाव हाकेच्या अंतरावर, ऐसी कळवळ्याची जाती हे कवितासंग्रह मुडदे, आखर, मुक्कामाला फुटले पाय हे कथासंग्रह लिहिले आहेत. गाडा, ओले मूळ भेदी या कादंबऱ्या लिहिल्या आहेत. बुडत्याचे पाय खोलात, वडगाव लाईव्ह ही नाटके लिहिली आहेत. सहयात्री हे ललित लेख आहे. साहित्य : आकलन आणि आस्वाद हा समीक्षेचा ग्रंथ महात्मा ज्योतिबा फुले, महात्मा गौतम बुद्ध ही चरित्र पुस्तके आहेत.

## उद्धव ठाकरे, संजय राऊतांना १५ हजारांचा जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेना खासदार राहुल शेवाळे यांच्या बदनामी प्रकरणी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे. 15 हजारांचा जामीन मंजूर करण्यात आला आहे.

आजच्या सुनावणीसाठी स्वतः उद्धव ठाकरे यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून हजेरी लावली. त्यांनी त्यांच्यावर लावण्यात आलेले सर्व आरोप फेटाळले असून आपला या प्रकरणाशी कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. दुसरीकडे या प्रकरणातील सहआरोपी असलेले संजय राऊत यांनी कोर्टात स्वतः हजेरी लावली होती. या नंतर या दोघांनी आपला जामीन अर्ज कोर्टापुढे सादर केला. त्यानंतर 15 हजार रुपयांचा जामीन मंजूर करण्यात आला.

या पुढची सुनावणी ही 14 सप्टेंबर रोजी होणार असून त्या वेळीही या दोघांनाही हजेरी लावावी लागेल. उद्धव ठाकरे हे राज्यातील अतिमहत्त्वाचे व्यक्ती आहेत, तसेच त्यांच्या प्रकृतीमुळे त्यांना प्रत्यक्ष हजेरी लावण्यापासून सूट देण्यात आली आहे. पुढच्या सुनावणीवेळीही उद्धव ठाकरे हे व्हिडीओ कॉन्फरन्सच्या माध्यमातून उपस्थिती लावतील. राहुल शेवाळे आणि संजय राऊत यांच्यातील वादाचा हा मुद्दा आहे. खासदार राहुल शेवाळे हे शिंदे गटासोबत गेल्यानंतर त्यांच्यावर शिवसेना मुखपत्र सामनातून टीका करण्यात आली होती. दुबईतील कन्स्ट्रक्शन कंपन्यांमध्ये राहुल शेवाळे यांची गुंतवणूक असल्याचा आरोप सामनामधून करण्यात आला होता. यामुळे आपली बदनामी झाल्याचे सांगत राहुल शेवाळे यांनी उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांच्याविरोधात याचिका दाखल केली होती. सामना या मुखपत्राच्या हिंदी आणि मराठी आवृत्तीमध्ये 29 डिसेंबर 2022 रोजी प्रकाशित एका लेखात राहुल शेवाळे यांचे दुबई तसेच पाकिस्तानातील कराचीत रिअल इस्टेटमध्ये हितसंबंध असल्याचा दावा करण्यात आला होता. यावर शेवाळे यांनी वकील चित्रा साळुंखे यांच्या मार्फत 3 जानेवारी 2023 रोजी नोटीस पाठवून या लेखातील दाव्यांचा स्त्रोत काय? अशी विचारणा केली होती. त्यावर, एका महिलेने इंटरनेटवर केलेला दावा आणि अन्य माहितीच्या आधारावर हा लेख लिहील्याचे सामनाकडून प्रत्युत्तरात सांगण्यात आले.

# केंद्राने कांदा निर्यातीवर शुल्क लावल्याने शेतकरी आक्रमक

## नाशिक जिल्ह्यातील १४ बाजार समित्यांमध्ये कांदा लिलाव बंद

आधुनिक केसरी न्यूज



दोन दिवसात केंद्राने निर्यात शुल्काचा निर्णय मागे घेतला नाही तर लोकप्रतिनिधींना रस्त्यावर फिरु देणार नाही.


**भारत दिघोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटना**

आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकार शेतमालाचे भाव पाडण्याचे धोरण राबवत आहे. एक बाजूला गव्हाचे आयात शुल्क संपूर्ण कमी केले. टोमॅटो परदेशातून आयात करण्यासाठी अनुदान दिले. दुसऱ्या बाजूला कांदा निर्यातीवर चाळीस टक्के निर्यात शुल्क लावले. म्हणजे फक्त शेतमालाचे भाव पाडायचे एवढेच धोरण आज केंद्र सरकारचे दिसत आहे. असे सरकारचे धोरण राहिल्यास या देशातील बहुसंख्य शेतकऱ्यांना आत्महत्येच्या वाटेने जावे लागेल. सरकारने असे निर्णय घेणे थांबवलं पाहिजे. तुमच्या अशा धोरणांना कंटाळून जर शेतकऱ्यांनी शेती करायचं सोडून दिले तर कारखान्यांमध्ये अन्नधान्य तयार करणार का?

**संदीप जगताप, प्रदेशाध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना**

निफाड : केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर अवास्तव शुल्क लावल्याने शेतकरी आक्रमक झाले आहेत. नाशिक जिल्ह्यातील १४ बाजार समित्यांमध्ये कांदा लिलाव बंद ठेवण्याचा निर्णय व्यापारी असोसिएशने निर्णय घेतला आहे. शेतकरी संघटना आक्रमक झाल्या असून जोडे मारो आंदोलन करण्यात आले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेने वणी, विंचुर, येवला येथे महामार्ग रोखले असून निफाड तालुक्यातील शेतकऱ्यांनी अध्यादेशाची होळी केली आहे. सरकारच्या निर्णयाविरोधात आणि निषेधार्थ आज पासून नाशिक जिल्ह्यातील १४ बाजार समित्याबेमुदत काळासाठी बंद ठेवण्यात आल्या आहेत. नाशिक जिल्हा कांदा व्यापारी असोसिएशनच्या लासलगाव येथील बैठकीत निर्णय झाल्यानंतर आता थेट लिलाव प्रक्रियाच बंद ठेवण्यात आली. आशिया खंडामधील सर्वात मोठी लासलगाव बाजार समितीमध्ये रोजच्या रोज शेकडो ट्रक आणि टेम्पो कांदा घेऊन येतात. लासलगावबाजार समितीत ९६ लाख २५ हजार ८३८ क्विंटल वर्षभरात आवक असते, तर ९ अब्ज २० कोटी, ४९ लाख ६३ हजार ९७८ इतकी या बाजार समितीची उलाढाल आहे. केंद्राच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे, त्यामुळे शेतकरी संतप्त झालेला असून व्यापाऱ्यांनी देखील शेतकऱ्याच्या हिताचं धोरण लक्षात घेता आज संपूर्ण बाजार समित्यांमधील लिलाव बंद ठेवण्यात आले आहेत. यामुळे समित्यांमध्ये दैनंदिन होणारे ६० ते ७० हजार क्विंटलचे लिलाव थांबणार आहेत. यावर्षी ५ लाख टनांचा बफर स्टॉक राखण्यासाठी केंद्र सरकार अतिरिक्त २ लाख टन कांदा खरेदी करणार आहे. कांदा निर्यातीवर ४० टक्के शुल्क लादल्यानंतर केंद्राने ही घोषणा केली. सन २०२२-२३ साठी कांद्याच्या बफरचे उद्दिष्ट ३ लाख टन होते. ते आधीच खरेदी केले आहे. स्थानिक उपलब्धतेसाठी व दरवाढ रोखण्यासाठी निवडक राज्यांत समान बफर स्टॉक वापरला जात आहे. बफरमधील कांदा ग्राहकांना दि.२१ ऑगस्टपासून किरकोळ आउटलेट्स आणि एनसीसीएफच्या मोबाइल व्हॅनद्वारे २५ रुपये प्रतिकिलो अनुदानित दराने प्रमुख बाजारपेठांमध्ये उपलब्ध करून दिला जाणार आहे. मुंबई पोर्टवर १७२ आणि नाशिक जिल्ह्यातील जानोरी येथे ३४ कंटेनर कांदा भरून पडेलला आहे. ठाणे शहरातील वाहतूक कोंडीमुळे १९ तास अवजड वाहतूक बंद करण्यात आल्याने महामार्गावर देखील कांद्याचे कंटेनर उभे आहेत.एका कंटेनरमध्ये ३० टन कांदा असून एकूण बारा ते पंधरा हजार क्विंटल कांदा हा रस्त्यात पडून आहे. निर्यात शुल्कामुळे एका कंटेनरमागे चार लाख रुपयांचा आर्थिक फटका बसणार आहे. तसेच हा कांदा माघारी बोलवला तर अडीच ते पावणेतीन लाख रुपयांचा फटका निर्यातदारांना सहन करावा लागणार आहे. देवगाव (ता.निफाड) येथील शेतकऱ्यांनी केंद्र सरकारच्या या निर्णयाच्या अध्यादेशाची होळी केली. यावेळी भाऊसाहेब बोचरे, विनोद जोशी, दिगंबर सोमवंशी, धनंजय जोशी, मनोहर बोचरे, सचिन बोचरे, गोरख निलख, शामराव लोहारकर, अण्णा उफाडे, ज्ञानेश्वर साबळे, जगन बोचरे, वैभव जोशी, अनिल खुळे, योगेश बोचरे, संतोष साबळे, पाडूरंग कूलथे, सुरेश राजगुरू, बबन पिंगट, प्रकाश लोहारकर, गणपत बोचरे, संजय मेमाणे, प्रभाकर घाडगे आदी उपस्थित होते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

'बाबा, तुम्ही पण सांगा ना काहीतरी, ' राजेश म्हणाला. श्यामराव हसले. ते म्हणाले, 'बाळांनो, आई अगदी बरोबर माहिती सांगते आहे तुम्हाला. त्यामुळे मी पण ती ऐकत होतो. आज आपण पर्यावरण संरक्षणाच्या गोष्टी करतो. पण या देशी बियाण्यांमुळे आपोआपच पर्यावरणाचे रक्षण होत होते. जमिनीचा कस टिकून राहत होता. तसेच रासायनिक खते, रासायनिक कीटकनाशकांची फवारणी त्यामुळे पर्यावरणाला तसेच मानवी आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. यातील विषारी घटक नष्ट होत नाहीत. अन्नधान्य, भाजीपाला इ. च्या माध्यमातून ती आपल्या शरीरात जातातच, त्यामुळे मधुमेह, कर्करोग यासारख्या अनेक आजारांना निमंत्रण मिळते. स्वदेशी पारंपरिक बियाणे पर्यावरण पूरक तर आहेच पण आपल्या आरोग्यासाठी उत्तम आणि अधिक पोषणमूल्ये असलेले आहे. त्याचा खर्चही कमी येतो. संकरित बियाण्यापेक्षा त्यांचे उत्पादन थोडे कमी येते हे खरे असले तरी अनेक उपायांद्वारे हे उत्पादन वाढवता येऊ शकते. त्यासाठी सेंद्रिय खते, नैसर्गिक कीटकनाशके इ. चा वापर करता येऊ शकतो. गरज आहे ती इच्छाशक्तीची. '' किती छान माहिती कळली बाबा आज तुमच्याकडुन आणि आईकडून. आपण खरोखरच पुन्हा अशी स्वदेशीची कास धरली तर आपला देश पुन्हा सुजलाम सुफलाम होऊ शकतो, नाही का ?' पिंकी म्हणाली. बरोबर आहे, पिंकी. आपण तसे होईल अशी आशा करू या. चला, आता आपले घर जवळ आले. ' श्यामराव, श्यामलाताई, पिंकी आणि राजेश दोन दिवसांची सुटी सार्थकी लावून आले होते. श्यामरावांची आपल्या सोपान या बालमित्राशी भेट झाली होती. मुलांना खूप काही नवीन बघायला, शिकायला मिळाले होते. त्यामळे घरी परतल्यावर त्यांच्या मनात खूप आनंद आणि समाधानाची भावना होती. घरी आल्यानंतर पिंकी आणि राजेशने आपण काय काय नवीन पाहिले ते लिहून काढले. प्राणी आणि विविध वनस्पतींनी समृद्ध असलेले अभयारण्य, हेमाडपंती शिव मंदिर, सोपानरावांच्या गावातील बारा बलुतेदारांपैकी कुंभार, लोहार, सुतार आदींच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी, कळण्याची भाकरी, सातूचे पीठ यासारखे स्वदेशी खाद्यपदार्थ, वड, पिंपळ, बेल आदी विविध वनस्पतींची माहिती त्यांनी लक्षात ठेवली होती. काही शंका असेल तर पुन्हा आपल्या आईबाबांना विचारून ते खात्री करून घेत होते. देशी बियाणे आणि त्याचे राहीबाई पोपरे यांच्यासारख्या एका अशिक्षित महिलेने केलेले जतन याबद्दलची माहिती त्यांना खूप आवडली होती. त्याबद्दल पिंकी जेव्हा बाबांना म्हणाली,



समृद्ध प्राचीन भारत



# आनंदी पहाट

## करिअरची निवड करण्यापूर्वी गरजांची योग्यता पहावी

आधुनिक केसरी

आपल्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि प्रत्येक अनुभव सुखद असण्यासाठी आवश्यकता असते ती योग्य करिअर निवडून अर्थार्जन करण्याची, पैशाच्या योग्य वापराची, बचतीची आणि गुंतवणुकीची.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रत्येकाच्या जशा गरजा वेगवेगळ्या असतात तसेच उत्पन्न अथवा आपल्या हाती येणारा पैसा देखील कमी-अधिक प्रमाणात आपल्या पदरी पडत असतो. खरे कसब आपल्या करिअर निवडण्यात असते. जो योग्य करिअरची निवड करतो तोच अर्थार्जन उत्तम प्रकारे करू शकतो. आपण निवडलेल्या करिअरचा केवळ गरजेपुरता आणि अर्थार्जनासाठी उपयोग करून चालणार नाही, तर करिअरमधील स्थिरता आणि आत्मिक आंनद मिळवण्याचे तंत्र अवगत केले पाहिजे. यासाठी आपण प्रत्येक बाबतीत चिकित्सा केली पाहिजे. करिअरची निवड करण्यापूर्वी आपल्या गरजांची योग्यता, त्यांची आपण करत असलेली अपेक्षा आणि त्यांची पूर्तता या सर्वच बाबींचा आपण अभ्यासपूर्वक विचार करणे महत्वाचे असते. अनेकदा आभासी दुनियेत मशगुल झालेल्यांना स्वतःचे चांगले-वाईट कळत नाही. आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र आणि निवारा या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे, अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपले करिअर अर्थात अर्थार्जनासाठी निवडलेला आपल्या आवडीचा मार्ग असतो.




आधुनिक केसरी

### ज्ञाना मुक्त त्यासी केला ||

हरि भजनी रमला | देह चित्तासी (चित्ताला) भेटला ||१||
मुखी विठ्ठल विठ्ठल | विश्व व्यापिले सकल ||२||
मनी ध्यान गोविंदाचे | तेथे उरे काय साचे ||३||
माझे मीपण सरले | श्वास विठ्ठलचि झाले ||४||
आता उरे मागे काही | चिंता विठु सर्व वाही ||५||
नको स्वर्ग-मोक्ष काही | दास विठ्ठलाचा राही(होई) ||६||
नाना संसारी गुंतला | ज्ञाना मुक्त त्यासी केला ||७||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण

आधुनिक केसरी

तव स्वरूपमज्ञेयं तस्य पारं न याति वै |
दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्
|| ७१ || तुझे स्वरूप अज्ञेय आहे. त्याचा खरोखर पार लागत नाही. दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

करना मुझको कुछ नहीं, अन्त लगन दुरबीन ।
सुधरे चक्षु विवेक का, भक्ति सन्त परवीन
।।२५।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/२५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
मला बाहेरील कुठलीच प्राकृतिक क्रिया करायची नाही तर आपले ज्ञानचक्षु ठीक करून अंतर्प्रेम सहज साधनायुक्त सद् युक्ती-रूपी दुर्बिणीने त्या परमेश्वराला बघायचे आहे. विवेकी संत यालाच भक्ती असे म्हणतात.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

# आत्मदर्शन

आधुनिक केसरी

प्रत्येक जी्वात परमेश्वर आहे. "जे जे भेटे भूत तया मानियले भगवंत"! ज्ञानेश्वरांनी पसायदानात "विश्वात्मके देवो "असे सांगितले आहे. पण हा परमात्मा कसा आहे हो? परमात्म्याला जन्ममरण नाही. कोठेही येणेजाणे नाही. बंधन नसल्याने त्याला मोक्षपण नाही. परमात्मा सगुण साकार व निर्गुण निराकार आहे. तो अनंत अपार आहे. परमात्मा नित्य तर आहेचं पण तो जशाचा तसाच दिसतो. तो एक शाश्वत सत्य भासतो. त्याची जाणीव होते.




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

जेव्हा तुमची भक्ति सर्व शक्तिसह एकरूप झाली तर परमात्मा भेटला अशी जाणीव होते. परमात्मा सर्व व्यापी असल्याने अनेकामध्ये एकपणाने रहातो. नुसत्या कल्पनेने तो आपल्या मनात कायमचा वास करतो.
परमात्म्याचे तर्काने आकलन होऊ शकत नाही, असे वेद व श्रुति सांगतात पण परमात्म्याची ओळख भक्तिभावाने होऊ शकते. आत्मनिवेदन भक्ति हा त्यातलाच एक भाग आहे. प्रथम मी कोण आहे? हे शोधणे हेच "आत्मदर्शन निरूपणाचे पहिले लक्षण आहे. निर्गुण परमात्म्याची जाणीव होण्यासाठी परमात्मा कसा आहें ते शोधावे. देव शाश्वत सत्य आहे. पण देव व भक्त कसा आहे. देवाचं व भक्ताचं नातं एकदा का समजलं तर त्यालाच आत्मनिवेदन भक्ति असं म्हणलं तर ते चुकीचं होणार नाही. देहाची अवस्था साधनसुचित्वाने शुध्द होते. एकदा का देहबुध्दि नाहीशी झाली की, "देव पहावयास गेलो आणि देव होऊनी राहिलो ."!अद्वैताला लागलेले द्वैत विरते.आणि आत्मस्वरूपाचा साक्षात्कार होतो.

# प्रपंचात 'राम कर्ता' ही भावना ठेवावी

आधुनिक केसरी

परमात्मा आनंदरूप आहे. भगवंताचा आनंद हा उपाधिरहित आहे. भगवंताच्या हास्यमुखाचे ध्यान करावे. प्रत्येक गोष्टीत मनुष्य आनंद पाहात असतो. उकाड्यात वारा आला, त्याला वाटते बरे झाले; पाऊस आला की त्याला वाटते, आता गारवा येईल. कोणत्याही तऱ्हेने काय, मनुष्य आनंद साठवू पाहात असतो. मनुष्याला भूक लागेल तेव्हा जर अन्न खाईल तर त्याचे पोट भरेल आणि त्यापासून त्याला आनंद होईल; परंतु त्याने विष खाल्ले तर त्याने आनंद न होता मरण मात्र येईल. तसे आपले होते. आपण विषयातून आनंद घेऊ पाहतो, आणि तो बाधक होतो. एखाद्या रोग्याला जर जंत झाले आणि त्याला जर खूप खायला घातले, तर ते शरीराला पोषक न होता, जंतच वाढतात; त्याचप्रमाणे आपण सत्कर्मे करताना पोटात विषयांचे प्रेम ठेवून ती केली, तर त्यामुळे विषयच पोसले जाऊन, त्यांपासून समाधान लाभू शकत नाही. याकरिता कर्तव्यबुद्धीने कर्म करावे, म्हणजे ते बाधक ठरत नाही.मनुष्य जन्मभर जो धंदा करतो त्याच्याशीच तो तद्रूप होऊन जातो. एखादा वकील घ्या, तो त्याच्या धंद्याशी इतका तद्रूप होतो की मरतेवेळीसुद्धा तो वादच करीत जाईल. नोकरी करणारा नोकरीशी इतका तद्रूप होतो की, स्वप्नात देखील तो स्वतःला नोकर समजूनच राहतो. कर्म कसे करावे, तर त्याच्यातून वेगळे राहून. लग्नाचा सोहळा भोगावा, लाडू खावेत, परंतु ते दुसऱ्याचे आहेत असे समजून. आपल्या मुलीचे किंवा मुलाचे नाहीत असे मानून; नाही तर व्याह्यांची काळजी लागायची, किंवा हुंडा मिळतो की नाही इकडे लक्ष लागायचे. त्यामुळे तापच निर्माण होईल. कर्माशिवाय कोणालाच राहता येत नाही. एखाद्याला शिक्षा द्यायची म्हणून, 'अगदी हलायचे नाही, पापणी, हात, पाय, काहीही हलवता कामा नये,' असे सांगितले तर ते जसे त्याला शक्य होणार नाही, तसे काही ना काही तरी कर्म हे होणारच. भगवंतांनी अशी काही सांगड घालून दिली आहे की कर्म केल्याशिवाय गत्यंतरच नाही. परंतु ती कर्मे ' राम कर्ता ' ही भावना विसरून केली तर बाधक होतात, आणि मरणापर्यंत माणूस पुढल्या जन्माची तयारी करीत राहतो; तेव्हा, देहाने कर्म करतानाही ' कर्ता मी नव्हे ' हे जाणून कर्म करावे. आपल्याला कर्म केल्याशिवाय करमत नाही. पण आपण फळाची आशा उगीचच करीत असतो. आपण फळाची आशा सोडून कर्म करू लागलो, की ते कर्म करीत असतानाच समाधान प्राप्त होते.



# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी

त्याच प्रमाणे गुरु तत्व हे एकच आहे ह्या प्रणालीत कुठल्याही सद्गुरूंचे शिष्य झालो म्हणजे एकच गोडी चाखावयास मिळते. म्हणून मनात द्वैत भाव न ठेवता गुरूस अन्यन्य भावाने समर्पित व्हावे. किंवा अशा मोठ्या समारंभाच्या ठिकाणी अनेक लोकांना पाण्याची व्यवस्था जशी एकाच टाकीतून फक्त अनेक तोटया लावून केलेली असते ती एकाच ठिकाणी गर्दी होऊन लोकांचा वेळ वाया जाऊ नये म्हणून व सर्वांना सोईचे व्हावे म्हणूनच तसेच गुरुंचे आहे गुरु हे तत्व इथून तिथून एकच फक्त सर्वांना उपलब्ध व्हावे म्हणून ते वेगवेगळ्या अवतारात वेगवेगळ्या ठिकाणी अवतरत असतात. इथे फक्त एकाच सावधानता पाळली पाहिजे ती म्हणजे जे गुरु परंपरेतील आहेत त्यांचाच अनुग्रह घ्यावा ,हि परंपरा भगवान शंकरापासून सुरु होते. जिज्ञासूनी गुरुचरीत्रातून याची खात्री जरूर करून घ्यावी. विद्वान सर्वत्र पूज्यते यासाठी सर्वानी ज्ञानी व्हावे हीच सदिच्छा असल्याने सर्वांनी मन:पूर्वक प्रयत्नास लागावे ,कसूर नको.



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

तक्षकस्य विषं दंशे मक्षिकायाच मस्तके ।वृश्विकस्य विषं पुच्छे सर्वांगे दुर्जनस्य तत् ॥
स्पष्टीकरण - या श्लोकाचा रोख दुर्जनांकडे आहे. कोणत्याही परिस्थितीत दुर्जनांपासून सावध राहावे असे यात सांगायचे आहे. दुर्जन हा शरीर, मन, वाणी, बुद्धी या सर्वांगांनी विषारी असतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
मंगळवार, २२ ऑगस्ट २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# लातूर पॅटर्नचे ज्ञानस्तंभ प्रा. चिराग सेनमा यांचा दिल्लीत गौरव

## शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेत 'राष्ट्रीय एकता पुरस्कार' प्रदान

आधुनिक केसरी न्यूज

**लातूर :** स्वातंत्र्य दिनानिमित्त, दिल्ली सरकारच्या ओ .बी . सी कमिशन ने कॉन्स्टिट्यूशन क्लब ऑफ इंडिया येथे सन्मान आणि पुरस्कार वितरणाचे आयोजन केले, ज्यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना राष्ट्रीय एकता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यामध्ये शैक्षणिक क्षेत्रात नाविन्यपूर्ण आणि कौतुकास्पद उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीला चालना देत नवीन शैक्षणिक क्रांती घडवून हजारो विद्यार्थ्यांचे डॉक्टर होण्याचे स्वप्न सत्यात उतरविणारे लातूर पॅटर्नचे ज्ञानस्तंभ प्रा. चिराग सेनमा यांना "राष्ट्रीय एकता पुरस्काराने" गौरविण्यात आले. प्रा. सेनमा यांना देशाची राजधानी दिल्ली येथे तेही शैक्षणिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल गौरविण्यात आले यामुळे लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नला देशात झळाळी मिळाली आहे. दिल्ली सरकारच्या ओ .बी . सी कमिशनचे अध्यक्ष जगदीश यादव यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. अनूप चावला आणि डॉ.भरत झा कार्यक्रमाचे संयोजक होते. सरांश महाजन, सहाय्यक आयुक्त जी .एस .टी, दिल्लीचे सेवानिवृत्त अग्निशमन प्रमुख डॉ.धर्मपाल भारद्वाज, शास्त्रीय गायक पंडित बलदेव राज वर्मा आदी उपस्थित होते. विविध राज्यातील अनेकांना हा पुरस्कार मिळाल्याचा अभिमान वाटला. ज्यात जयश्री बाळासाहेब थोरात, डॉ.आर.जे. बार्नबस, देवदन काळकुंबे, सुधा कांकरिया, ऍड. रत्नदीप निकाळजे, डॉ.मल्हारी जाधव, शाहीन अली.

मीनल शिंदे, अभिषेक चावला, मर्लिन अलीशा लातूर पॅटर्नचे ज्ञानस्तंभ प्रा. चिराग सेनमा, एवंजेलिन मनषा, ओमर सादिक तगारी, नवनाथ कुताल, मधुर बागायत, संदीप रोडे, डॉ.ममता कांबळे, अजिंक्य पवार, नवतेज सिंग रसिका, रितू राजपूत, रणवीर सिंग, राजेश जॉन पॉल संदीप महाजन, हरप्रीत दुग्गल, दीपिका जसवाल, विपिन नंदवानी, माया वर्मा ओम ससे, संतोष शर्मा, कौशल शर्मा, पत्रकारिता डॉ तरुण शर्मा, डॉ. प्रिया जॉन आदी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सत्कार करण्यात करण्यात आला.




दरम्यान, मागील काही वर्षांपासून विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी नाविन्यपूर्ण आणणे आणि त्या यशस्वीपणे राबवून लातुरात शैक्षणिक दर्जा उंचावन्याचे काम प्रा. चिराग सेनमा यांनी अगदी चपखलपणे केले आहे. सरांची अत्यंत दर्जेदार अशी टिचिंग पद्धती, अकॅडमीक प्लॅनिंग आणि विद्यार्थ्यांवर त्यांच्या अध्यापनाचा असलेला प्रभाव यामुळे विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून प्रा. चिराग सरांना ओळखले जाते त्याच बरोबर लातूर पॅटर्नचे ज्ञानस्तंभ अशी नवीन ओळख निर्माण झाली आहे. सरांनी जनता दरबारची संकल्पना आणि त्याद्वारे प्रत्येक विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढीसाठी त्यांच्या क्षमतेनुसार राबविण्यात आलेल्या विविध योजना आणि उपक्रम राबविले. यामध्ये केवळ अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अध्यापनाचा नव्हे तर विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृतीचे मूळ रुजविणे यालाही प्राधान्य दिले. क्लासेस कॅम्पस किंवा वर्गामध्ये स्मार्ट व्हॉच आणि मोबाईल वापरावर निर्बंध ही संकल्पना पहिल्यांदाच लातुरात राबविली. कोरोना संकटानंतर जवळपास 90 टक्के विद्यार्थ्यांकडे स्मार्ट फोन होता आता आयआयबीबी इन्स्टिट्यूटच्या नियमांनंतर सध्या विद्यार्थ्यांमध्ये स्मार्ट फोन वापरण्याचे प्रमाण लक्षणीय प्रमाणात कमी झाले असून विद्यार्थ्यांचा मोबाईल वापरावर जाणारा वेळ हा अभ्यासाकडे वळला आणि त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता झपाट्याने वाढली असल्याचे दिसते. शैक्षणिक क्षेत्राबरोबरच प्रा. चिराग सर आपली सामाजिक बांधिलकी विविध प्रकारे बजावत असतात.

यामध्ये सर्वात कौतुकास्पद उपक्रम म्हणजे लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील हसेगाव येथे एचआयव्ही-एड्स बाधित मुलां-मुलींसाठी कार्य करणाऱ्या सेवालय या संस्थेतील सर्व मुलां-मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वतः प्रा. चिराग सेनमा यांनी स्वीकारले असून या विद्यार्थ्यांनी भविष्यात दैदिप्यमान यश संपादन करावे असे सरांचे स्वप्न आहे. प्रा. चिराग सरांच्या या सर्वांगीण गुणांचे आणि त्यांच्यातील एका सृजनशील व्यक्तिमत्त्वाचा गौरव व्हावा आणि त्यांच्या या कार्याचा इतरांनीही आदर्श घ्यावा या हेतूने दिल्ली सरकारच्या ओबीसी आयोग आयोगामार्फत प्रा. चिराग सेनमा यांना "राष्ट्रीय एकता पुरस्काराने" गौरविण्यात आले.

# विद्युत वाहिनीच्या तारेला वेलीचा विळखा

## महावितरणमुळे एसटी कर्मचाऱ्यांसह प्रवाशांचा जीव टांगणीला

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्याचे वर्दळीच्या चे ठिकाण असणारे एसटी बस स्थानक व त्या समोरील उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीला झाडांनी व वेलींनी विळखा घालत तोरण तयार केले आहे.

त्याचबरोबर शहरातील तसेच शाळा,कॉलेज जवळील रस्त्याच्या कडेला व वरदळीच्या ठिकाणी महावितरण'ने उभारलेल्या बहुतांश विद्युत ट्रांसफार्मर व विद्युत वाहिनी स झाडेझुडपे आणि वेलींनी वेढल्याचे चित्र अनेक ठिकाणी पाहायला मिळते. त्यामुळे विजेच्या लोखंडी खांबांमध्ये वीजप्रवाह उतरण्याचा धोका निर्माण होऊ शकतो.

आधीच शहरात ठिकठिकाणी असलेल्या उघड्या डीपीमुळे नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण झाला असून महावितरणने मान्सूनपूर्व कामांसह विविध समस्यांकडे दुर्लक्ष केले असल्याचे शहरातील वीज खांब व डीपींच्या दुरवस्थेवरून दिसून येत आहे.

अनेक ठिकाणी खांबांवर व डीपीशेजारी झाडाझुडपांचा वेलींचा विळखा वाढला आहे. परिणामी ओलाव्यामुळे परिसरात वीजप्रवाह उतरून नागरिकांच्या व प्राण्यांच्या जीविताला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरवर्षी मानसून पूर्व कामे करण्यासाठी महावितरण करून ठेकेदारास लाखो रुपयाचे काम दिले जाते. संबंधित ठेकेदाराकडून काम न करता बिले उचलण्याची तक्रार नागरिकांमधून होते. याकडेही महावितरण कंपनीचे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. मान्सूनपूर्व कामे न केल्यामुळेच शहरातील लोखंडी विद्युत पोलसह उच्च दाबाच्या विद्युत वाहिनीवर वेलवर्गीय वनस्पती मोठ्या प्रमाणात वाढल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. शिवाय इतर झाडेझुडपेही मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. यामुळे शहरासह, वरदळीच्या ठिकाणी असणाऱ्या एसटी बस स्थानकाकडे ये-जा करणाऱ्या प्रवाशांसह, एसटी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानात राहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवितास धोका निर्माण झालेला आहे.



# कोकण रेल्वेच्या गेटमनची गोळ्या झाडून हत्या

आधुनिक केसरी न्यूज

**अलिबाग :** कोकण रेल्वे मार्गावरील कोलाड स्थानकाजवळ गेटमनची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली. चंद्रकांत कांबळे असे त्याचे नाव असून तो तेथून जवळच असलेल्या महाबळे गावचा रहिवासी आहे. गोळीबाराच्या घटनेनंतर आरोपी तेथून पसार झाला आहे. हल्लेखोर आणि हत्येमागचे कारण अद्याप समजू शकले नाही. पोलीस घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी घटनेचा पंचनामा सुरू केलाय. महाबळे ग्रामस्थ घटनास्थळी पोहोचले असून ते आक्रमक झाले आहेत. जोपर्यंत मारेकऱ्याला अटक होत नाही तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नाही, अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. भर दिवसा गोळीबार झाल्याने या परिसरात दहशतीचे वातावरण आहे.

# जानकरांचा 'एकला चलो रे'चा नारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** सर्वच राजकीय पक्षांनी आगामी लोकसभा आणिविधानसभा निवडणुकांची तयारी सुरू केली आहे. अजित पवार गटाच्या येण्याने राज्यातील भाजपाप्रणित महायुती मजबूत झाली आहे. तर महाविकास आघाडीकडूनही जोरदार मोर्चेबांधणी सुरू आहे. अशातच राज्यात असे काही लहान-मोठे पक्ष आहेत जे ना कुठल्या आघाडीत आहेत ना युतीत. त्यापैकीच एक म्हणजे राष्ट्रीय समाज पक्ष. महादेव जानकरांचा हा पक्ष मागील निवडणुकीत एनडीएबरोबर होता. अद्याप त्यांची कोणत्याही पक्षाबरोबर युती झालेली नाही. जानकर सध्या रासपच्या जनस्वराज्य यात्रेनिमित्त राज्यभर फिरत आहेत. अशातच त्यांनी आगामी निवडणुकीत 'एकला चलो रे'चा नारा दिला आहे. जानकर म्हणाले, या राज्यात, देशात आपला पक्ष वाढला पाहिजे, यासाठी गेल्या दिड महिन्यांपासून आम्ही रासपची जनस्वराज्य यात्रा काढली आहे. युतीबद्दल बोलायचं झाल्यास त्यांनी आम्हाला बोलावले नाही आणि आम्हीसुद्धा त्यांना गृहित धरले नाही.

# ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने 10 कोटींचा विकास निधी मंजूर

## आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नांना मोठे यश

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** मतदार संघाच्या विकासासाठी आमदार



किशोर जोरगेवार यांनी विविध विभागाअंतर्गत निधीतून मतदारसंघात तरुणाईला अभ्यासाकरिता सर्व सोयीसुविधा युक्त अभ्यासिका, विविध भागात समाज भवन, यासारखी कामे केल्या जात आहेत. विशेष म्हणजे ग्रामीण भागाच्या विकासासाठी आमदार किशोर जोरगेवार यांच्या वतीने सातत्याने प्रयत्न सुरु असुन या भागात विविध विभागाअंतर्गत मोठा निधी त्यांनी उपलब्ध करुन दिला आहे. दरम्यान ग्रामीण भागातील पादंण रस्ते व इतर विकासकामांसाठी आमदार किशोर जोरगेवार यांनी ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने निधी उपलब्ध व्हावा अशी मागणी केली होती. या मागणीचा पाठपूरावा त्यांच्या वतीने सातत्याने सुरु होता. अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून ग्रामविकास व पंचायत राज विभागाच्या वतीने मतदार संघातील ग्रामीण भागासाठी 10 कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या निधीतून धानोरा येथील श्री. सदगुरु जगन्नाथ बाबा देवस्थानच्या जागेवर समाजभवनाच्या बांधकामासाठी 50 लक्ष रुपये खर्च केल्या जाणार आहे. तर खुटाळा येथे तुकडोजी महाराज सभागृहाच्या बांधकामासाठी 40 लक्ष रुपये, नकोडा येथे समाज भवनासाठी 20 लक्ष रुपये, चिंचाळा येथे रस्त्याच्या बांधकामासाठी 30 लक्ष रुपये, ताडाळी येथील पादंण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, येरुर येथील पादंण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, पिपरी येथील समाज भवनासाठी 30 लक्ष रुपये, येरुर येथे समाज भवन बांधण्यासाठी 30 लक्ष रुपये, पिपरी येथील मारडा पादंण रस्त्याचे खडीकरण करण्यासाठी 30 लक्ष रुपये, सोनेगाव येथील रस्त्याच्या बांधकामासाठी 30 लक्ष रुपये, सोनेगाव येथील पादंण रस्त्यासाठी 60 लक्ष रुपये, म्हातारदेवी येथील रस्त्याच्या खडीकरणासाठी 30 लक्ष रुपये, सिदुर येथील पादंण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, मोरवा येथील पादंण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, पिपरी येथील पादंण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये, नागाळा येथील पादंण रस्त्यासाठी 30 लक्ष रुपये खर्च केल्या जाणार आहे. तर उर्वरित निधीतून ग्रामीण भागातील इतर विकासकामे केल्या जाणार आहे. या सर्व कामांतून ग्रामीण भागाचा कायापालट करत ग्रामीण भागातील नागरिकांनाही सर्व मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिकोनातून पुढेही सतत प्रयत्नशील राहील असे मत आमदार किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केले.

# रशिया अपयशी

आधुनिक केसरी

४ ऑक्टोबर १९५७ ला सोव्हिएत रशियाने जगातील पहिला कृत्रिम उपग्रह स्फुटनिक अवकाशात पाठवला आणि तेव्हा शीत युद्धासाठी आणखी एक मैदान खरं तर अवकाश उपलब्ध झाले. अवकाशात विविध प्रकारचे उपग्रह पाठवत कुरघोडी करण्याची स्पर्धा तेव्हाचे शक्तीशाली देश अमेरिका आणि सोव्हिएत रशियामध्ये सुरु झाली. विविध उपग्रह पाठवत रशियाने पुढील काही वर्षे ही आघाडी टीकवत अनेक विक्रम रचले. अखरे रशियाच्या आधी अंतराळवीर चंद्रावर उतरवत अमेरिकेने ही अत्यंत खार्चिक पण अवकाश तंत्रज्ञानात आमुलाग्र बदल करणारी अवकाश स्पर्धा जिंकत रशियाला मागे टाकले. मात्र सोव्हिएत रशियाने चंद्राच्या बाबतीत अनेक विक्रम रचले. चंद्राच्या जवळून जाणारे पहिले यान, चंद्राचे छायाचित्र घेणारे पहिले यान, तेव्हापर्यंत कधीही न दिसलेल्या चंद्राच्या मागच्या बाजूचे छायाचित्र काढणारे पहिले यान, चंद्रावर आदळवत पहिले मानवी अस्तित्व उमटवणारे पहिले यान, चंद्राचा उपग्रह म्हणून प्रदक्षिणा घालणारे पहिले यान म्हणून रशियाच्या विविध यान-उपग्रहांनी यशस्वी कामगिरी बजावली. यामध्ये आणखी एक पराक्रम तेव्हाच्या सोव्हिएत रशियाच्या तंत्रज्ञानांनी करुन दाखवला. चंद्रावर अलगद उतरण्याची स्पर्धा अमेरिका आणि रशियामध्ये सुरुच होती. चंद्रापर्यंत पोहचतांना दोन्ही देशांना अनेक मोहिमांच्या अपयशाला सामोरं जावं लागलं. मात्र ३ फेब्रुवारी १९६६ रशियाचे Luna 9 हे यान चंद्राच्या विषुववृत्तावर यशस्वीपणे अलगद उतरले. Luna 9 हे यान ३१ जानेवारी १९६६ ला प्रक्षेपित करण्यात आले. अवघ्या सहा दिवसांचा प्रवास करत हे यान चंद्राच्या कक्षेत पोहचले. या यानाचे एकुण वजन हे सुमारे १६०० किलो होते तर चंद्रावर उतरणाऱ्या भागाचे वजन हे १०० किलोच्या आसपास होते. चंद्रावर उतरल्यावर विविध उपकरणांच्या सहाय्याने चंद्राच्या अभ्यासाचे नियोजन करण्यात आले होते. चंद्रावर उतरलेले Luna 9 हे पुढील फक्त तीन दिवस कार्यरत राहीले आणि त्यानंतर त्याचा संपर्क तुटला. असं असलं तरी या यानाने पाठवलेली माहिती, घेतलेल्या विविध छायाचित्रांच्या माध्यमातून पहिल्यांदाच प्रत्यक्ष चंद्राच्या जमिनीवरील परिस्थितीची माहिती मिळवण्यात यश आले. चंद्रापर्यंत पोहचण्यात अनेक मोहिमांत अपयश आलेल्या रशिया आणि अमेरिका सारख्या देशांना एकप्रकारे चंद्रावर उतरण्याचा मार्ग Luna 9 मुळे खऱ्या अर्थाने मोकळा केला. यानंतर तीन वर्षातच अमेरिकमुळे पहिले मानवी पाऊल चंद्रावर उलटले आणि खऱ्या अर्थाने चांद्र स्पर्धा अमेरिकेने जिंकली. अमेरिका आणि चीनमुळे रशिया पुन्हा एकदा luna 25 या यानाच्या मार्फत स्पर्धेत उतरु बघत होता. मात्र चंद्राभोवती पोहचल्यावर शेवटच्या क्षणी रशियाला अपयश आले. आता भारताचे – इस्रोचे ( ISRO ) चांद्रयान ३ नेमके हेच करणार आहे, चंद्रावर अलगद उतरण्याचा प्रयत्न करणार आहे, उतरल्यावर एक रोव्हरही तिथे संचार करणार आहे, तेही कधीही न स्पर्श झालेल्या चंद्राच्या दक्षिण भागात. चंद्रावर उतरण्याचा हा कठीण अश्या या शेवटच्या टप्प्यात चांद्रयान ३ नेमकी कशी कामगिरी करते याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.

# तालिबानसमोर आंतरराष्ट्रीय मान्यतेचा प्रश्न



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306
आधुनिक केसरी

**दोन दशकांनंतर अमेरिकेने अफगाणिस्तानातून घाईघाईने माघार घेतल्याने अफगाणिस्तानात गोंधळ उडाला. अफगाणिस्तानातील तालिबान सरकारला अद्याप कोणत्याही देशाने मान्यता दिलेली नाही. याचा परिणाम म्हणजे आंतरराष्ट्रीय मदतीवर अवलंबून असलेला हा देश आर्थिक विनाशाच्या उंबरठ्यावर पोहोचला आहे.अमेरिकेच्या नेतृत्वाखालील नाटो आघाडीने अफगाणिस्तानला शाश्वत शांतता आणि विकासाच्या मार्गावर प्रभावीपणे सेट न करता हजारो सैन्य आणि अब्जावधी डॉलर्स गमावले. तत्कालीन अफगाण सरकार तालिबानच्या हल्ल्याचा मुकाबला करण्यात अयशस्वी ठरले आणि शेवटी ते पडले. वर्षानुवर्षे अफगाण सरकार कमकुवत होत चालले होते आणि तालिबान मजबूत होत होते.**

मॉस्को आणि दोहा चर्चा ही या दिशेने बदल घडवून आणणारी सर्व प्रक्रिया होती. चीन , पाकिस्तान , इराण आणि रशियासारख्या देशांचा तालिबानशी चर्चा करण्यास विरोध नव्हता. असे करण्यात या प्रत्येक देशाचे स्वतःचे स्वारस्य होते. तथापि ,तालिबानने अफगाणिस्तानात सत्ता काबीज करून जवळपास दोन वर्षे उलटले तरी या देशांनी राजनैतिक मान्यता दिलेली नाही.

जगातील कोणत्याही देशाने तालिबान राजवटीला मान्यता दिलेली नाही. आता हे उघड आहे की तालिबान सरकारला अधिकृत सरकारी दर्जाही नसताना ते मुत्सद्दी किंवा राजदूत कसे नियुक्त करू शकतात.

काही देशांनी यातून मार्ग काढला. 'द हिंदू' या इंग्रजी वृत्तपत्रानुसार- अफगाणिस्तानच्या अनेक देशांमध्ये विदेशी मिशन आहेत. त्यांनी तालिबान सरकारला सरकारचा दर्जा दिला नाही, पण त्यांची मोहीमही थांबवली नाही. यामध्ये रशिया, चीन, पाकिस्तान, कझाकिस्तान आणि इराणचा समावेश आहे.

विशेष म्हणजे या मोहिमांमध्ये तालिबानचे नियुक्त अधिकारीच काम करत आहेत. 'इस्लामिक अमिराती ऑफ अफगाणिस्तान'चाही राष्ट्रध्वज वापरला जात आहे. तालिबानला हे नाव देण्यात आले आहे. याआधी अफगाणिस्तानची सरकारे 'इस्लामिक रिपब्लिक ऑफ अफगाणिस्तान' या नावाने राजनैतिक जगात काम करत असत. तालिबानची औपचारिक मान्यता रोखणारे कोणते देश आहेत ? २०२० मध्ये दोहा फेरीच्या चर्चेदरम्यान , चीनने तालिबान आणि युनायटेड स्टेट्स ( यूएस ) यांच्यातील कराराचे समर्थन केले होते. २५ मार्च २०२२ रोजी चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी अचानक अफगाणिस्तानला भेट दिली. त्यानंतर , बीजिंगने ३०-३१ मार्च २०२२ दरम्यान चीनमधील तुन्शी येथे होणाऱ्या अफगाणिस्तानच्या शेजारी देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीसाठी तालिबानला प्रतिनिधी पाठवण्याचे निमंत्रणही दिले . तथापि ,या भेटी आणि शासनाशी सक्रिय संवाद असूनही , चीनने अद्याप तालिबानच्या इस्लामिक अमिरातीला राजनैतिक मान्यता दिलेली नाही. अफगाणिस्तानातील शांतता चीनच्या अशांत उईघुर-बहुल शिनजियांग स्वायत्त प्रदेशातील स्थिरतेसाठी महत्त्वपूर्ण आहे. चीनने तालिबानला अधिकृतपणे मान्यता देण्याची , शिनजियांगमधील दहशतवाद थांबवण्याची आणि अफगाणिस्तानातील समृद्ध खनिज साठ्यांमध्ये चीनी कंपन्यांना प्रवेश करण्याची अट ठेवली आहे. आतापर्यंत , देशातील चिनी गुंतवणूक कमकुवत आहे, विशेषतः मेस आयनाक तांबे खाणी आणि अमू दर्या तेल आणि वायू खाण यांसारख्या मोठ्या प्रकल्पांमध्ये. सुरक्षेचे परिमाण आर्थिक हितसंबंध आणि मुत्सद्दी मान्यता यांच्यापेक्षा खूपच जास्त असल्याचे दिसते. गेल्या वर्षी जुलै आणि २६ एप्रिल २०२२ मध्येपाकिस्तानमधील चिनी नागरिकांवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यांमुळे चीनमध्ये भीती निर्माण झाली आहे की तालिबान चीनला लक्ष्य करणाऱ्या अतिरेकी शक्तींना रोखू शकणार नाहीत , जसे की पूर्व तुर्कस्तान इस्लामिक चळवळ जो अफगाणिस्तानचा प्रशिक्षण मैदान म्हणून वापर करते. पुढे जाऊन, चीनने असेही म्हटले आहे की ते तालिबान सरकारला मान्यता देणे हे एकतर्फी प्रकरण बनवणार नाही. इराण , रशिया आणि पाकिस्तान यांसारख्या देशांशी करार केल्यानंतर चीन पुढे जाईल . हे एकमत कधी आणि कसे होते हे पाहणे बाकी आहे . पाकिस्तानी तालिबानचा प्रमुख संरक्षक असलेल्या पाकिस्तानने अद्यापही त्यांच्या सरकारला राजनैतिक मान्यता दिलेली नाही. तालिबानकडून ड्युरंड रेषेला मान्यता न देणे ,अफगाणिस्तान आणि पाकिस्तान यांच्यातील सीमा , पूर्वीच्या सरकारांच्या जुन्या अफगाण धोरणाचा सातत्य , या दोघांमधील प्रमुख संघर्षाचा मुद्दा बनला आहे. तालिबानला ड्युरंड रेषेच्या.पध्दतीमध्ये रस आहे आणि त्यांनी म्हटले आहे की त्यांना सीमा समस्या राजकीय मार्गाने सोडवायची आहे. परंतु तेहरिक-ए-तालिबान पाकिस्तान ( TTP ) ला अफगाणिस्तानमधील सुरक्षित आश्रयस्थानांचा वापर करण्यापासून रोखण्यासाठी ड्युरंड रेषेवर सीमेवरील कुंपण बांधणे पाकिस्तानच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचे आहे. टीटीपी ही एक मोठी दहशतवादी संघटना आहे जी पाकिस्तानी सरकार उलथवून पाकिस्तानमध्ये इस्लामिक अमिरात स्थापन करू पाहत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार ,पाकिस्तानी हवाई दलाच्या ताज्या हवाई हल्ल्यात अफगाणिस्तानच्या पूर्वेकडील खोस्त आणि कुनार या प्रांतांमध्ये ड्युरंड रेषेवर ४७ लोक ठार झाले आहेत. यामुळे तालिबान आणि पाकिस्तान यांच्यातील संबंध बिघडू शकतात. अफगाण अधिकाऱ्यांनी ठळकपणे सांगितले की हवाई हल्ल्यात मोठ्या संख्येने महिला आणि मुले मारली गेली आहेत. त्यामुळे सामान्य अफगाण नागरिकांनीही पाकिस्तान सरकारविरोधात निदर्शने केली आहेत. शिवाय , संयुक्त राष्ट्र मधील पाकिस्तानचे राजदूत मुनीर अक्रम यांनी सांगितले की, जेव्हा देशांमध्ये प्रादेशिक करार होईल तेव्हा पाकिस्तान तालिबानला मान्यता देण्याचा निर्णय घेईल. ते पुढे म्हणाले की चीन हा देश , तुर्कस्तान आणि यूएस सारख्या देशांशी योग्य मंचावर या विषयावर चर्चा करू.

रशियाने २४ फेब्रुवारी २०२२ रोजी युक्रेनमध्ये आपले विशेष लष्करी ऑपरेशन सुरू केले आणि सध्या युक्रेन , अफगाणिस्तान आणि मध्य आशियाई प्रदेशात व्यापलेले असले तरी , रशियासाठी सामरिकदृष्ट्या उपयुक्तता कायम आहे. तालिबानबद्दल मॉस्कोची स्वतःची भीती आहे. काही रशियन विश्लेषकांनी इस्लामिक मूव्हमेंट ऑफ उझबेकिस्तान सारख्या मध्य आशियाई देशांना लक्ष्य करणाऱ्या अतिरेकी गटांना त्यांच्या सीमेमध्ये कार्य करण्यापासून नियंत्रित करण्याच्या तालिबानच्या क्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. जानेवारी २०२२ मध्ये कझाकस्तानमध्ये दिसून आलेल्या अस्थिरतेमुळे रशियन भीती वाढली आहे. रशिया _जानेवारी २०२२ मध्ये नंतरच्या राजकीय संकटाच्या वेळी सामूहिक सुरक्षा करार संघटना ( CSTO ) आदेशानुसार कझाकस्तानमध्ये सैन्य पाठवणे कझाक सरकारच्या या मताशी सहमत होते की अशांतता वाढविण्यात विदेशी अतिरेकी संघटनांचा सहभाग होता. मात्र, कोणत्या संघटनांनी हा प्रकार घडवून आणला हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. तर , अलीकडेच ९ एप्रिल रोजी रशियाने तालिबान राजवटीने नियुक्त केलेल्या मुत्सद्द्याला स्वीकारले होते. तथापि , रशियन परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्टपणे सांगितले की मुत्सद्दी स्वीकारणे हे तालिबान सरकारला औपचारिक मान्यता देण्याच्या जवळपास नाही. रशियन परराष्ट्र मंत्र्याने ' अजेंडा सध्या टेबलवर नाही' असे उद्धृत केले होते. अफगाणिस्तानचे जवळचे शेजारी असल्याने , मध्य आशियाई देशांना तालिबानच्या ताब्यात असताना देश सोडून पळून जाणाऱ्या अफगाणांचा त्रास सहन करावा लागला. मध्य आशियाई देश अजूनही बदलत्या प्रादेशिक सुरक्षा रचनेचा सामना करण्याचा प्रयत्न करत आहेत. जरी त्यांनी तात्पुरते सीमेवरील नियंत्रणे शिथिल केली असली तरी , ते तालिबान सदस्यांसह अफगाण नागरिकांच्या हालचालींवर काटेकोरपणे निरीक्षण आणि नियंत्रण ठेवत आहेत. यामुळे अफगाणिस्तान आणि या भागातील देशांमधील संबंधांमध्ये खूप तणाव निर्माण होऊ शकतो. ताजिकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संबंध घा अलीकडच्या काळात चांगले राहिलेले नाहीत. ताजिकिस्तानच्या अध्यक्षांनी तालिबानवर देशातील वांशिक ताजिकांशी भेदभाव केल्याबद्दल टीका केली. अलीकडील अहवालानुसार, " अफगाणिस्तानातील अल्पसंख्याक ताजिकांनी तालिबानशी लढण्यासाठी आणि अफगाणिस्तानला नंतरच्या दहशतवादी राजवटीपासून मुक्त करण्यासाठी ' अफगाणिस्तान फ्रीडम फ्रंट ( AFF ) ' नावाची एक नवीन संघटना स्थापन केली आहे . AFF ने अफगाणिस्तानमध्ये लोकशाही आणि महिलांचे अधिकार पुनर्संचयित करण्याची शपथ घेतली आहे. या अहवालांनुसार , संघटनेमध्ये "अफगाण राष्ट्रीय संरक्षण आणि सुरक्षा दल ( ANDSF ) चे माजी सदस्य आणि तालिबानला विरोध करणाऱ्या विविध प्रतिकार गटातील कार्यकर्ते" यांचा समावेश असल्याचे मानले जाते. आधीपासून अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय प्रतिकार आघाडीच्या व्यतिरिक्त आहे ,ज्याचा नेताही ताजिकिस्तानमध्ये असल्याचे सांगितले जाते. तुर्कमेनिस्तानच्या सीमेवरही सीमेपलीकडून गोळीबार झाल्याच्या बातम्या आल्या आहेत. या घडामोडींवरून असे दिसून येते की प्रदेशात शांतता आणि स्थिरतेसाठी अजूनही अनेक आव्हाने आहेत.

# निरंजन टकले म्हणजे सत्याचा अणुबॉम्ब



हेमंत टाले
संपर्क क्र. 9975807632
आधुनिक केसरी

**मित्रांनो वर्धा येथील विद्रोही साहित्य संमेलना नंतर काल अमरावती येथील अभियंता भवन येथे जाणीव प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या स्वातंत्र्याचे वैरी या विषयच्या व्याख्यानाच्या वेळी सध्या संपूर्ण भारतात सुप्रसिद्ध शोध पत्रकार म्हणून नावलौकिक पावलेले निरंजन टकले सर यांची भेट झाली. यावेळी त्यांनी लिहिलेले न्यायमूर्ती लोयांचा खुनी कोण? ह्या त्यांच्या पुस्तकावर सरांनी स्वतः सही केली. सरांचं कालचं व्याख्यान हे अत्यंत स्फोटक आणि कुणालाही अचंबित करणार होतं.**

एखाद्या व्यक्तीचं इतकं उदातीकरण दैवीकरण केल्या जाऊ शकते यावर कोणाचाही विश्वास बसणार नाही. त्यासाठी एकच उदाहरण देतो मी मागच्या महिन्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे सद्गुण आणि सावरकरांची विकृती हा लेख लिहिला तो बहुजन सौरभ आणि आधुनिक केसरी या दैनिकांमध्ये छापुन आला. तो लेख वाचून माझे मीत्र आहे. त्याचं बायको सोबत भांडण झालं. बायको म्हणाली एवढ्या मोठ्या देशभक्ता विषयी हे असं कसं लिहिलं. नवरा समजून सांगण्याचा प्रयत्न करत होता. परंतु काहीही फायदा झाला नाही. शेवटी त्या बिचाऱ्याने मला फोन केला आणि प्रकार समजावून सांगितला. मी त्या ताई सोबत बोललो. त्या म्हणाल्या. माझा विश्वासच बसत नाही. मी म्हटलं आमचाही विश्वास बसत नव्हता. इतिहास आपल्या पर्यंत नीटपणे पोहोचला नाही. इतिहासातून प्रेरणा घेऊन भविष्याचा वेध घ्यायचा असतो. प्रेरणा चुकली की भविष्याचा वेध घेता येत नाही. अशीच परिस्थिती आज आपली अर्थात आपल्या सर्व बहुजन समाजाची झालेली आहे. आणि म्हणून आपण कर्मकांडात आणि आपले पोरं दंगलीमध्ये गुंतलेले आहे.

मी त्या ताईंना म्हणालो तुम्हाला सत्याचा शोध घ्यायचा आहे का ? त्या होय म्हणाल्या. मी त्यांना कालच्या व्याख्यानासाठी निमंत्रित केलं होतं. कारण आईला जोपर्यंत नीटपणे वारसा कळत नाही तोपर्यंत तो मुलांपर्यंत जाऊन पोहोचत नाही. नवी पिढी घडवण्यासाठी आपल्याला इथून सुरुवात करावी लागेल. निरंजन टकले सर म्हणजे तुमच्या आमच्या सारख्या भ्रमाच्या काळोखात वावरणाऱ्या श्रोत्यांना वास्तव्याचं सूर्यदर्शन घडवणाऱ्या माणसाचा रस्ता किती विषारी विंचू, साप, काच, खिळे, आणि खाच- खडग्यांनी भरलेला असेल याची कल्पना सद्यस्थितीत बहुजन समाजाला नाही आणि त्यासाठी त्यांना जी किंमत मोजावी लागत आहे त्याविषयीची जाणीवही नाही. ती जाणीव करून देण्यासाठी जाणीव प्रतिष्ठानने हा अत्यंत मोलाचा असा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यासाठी त्यांचे अभिनंदन आणि आभार मानणे हे मी माझे कर्तव्य समजतो.



अशा अवघड वाटेने हा माणूस गांधींसारखा अत्यंत निडर आणि निर्भयपणे चालतो आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी म्हटल्याप्रमाणे गांधी तेरी अहिंसा लढना ही सिखाती है महाराजांच्या वरील ओळीचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे सातत्याने सत्याची बाजू घेऊन अविरतपणे लढणारा लढवय्या शिपाई म्हणजे निरंजन टकले होय. मरा हुआ आदमी कुछ नही करता. कुछ नही कहता. कुछ न कहने पर और कुछ न बोलने पर आदमी मर ही जाता है. सरांच्या व्याख्यानातील हे नेहमीचं वाक्य आमच्यासारख्या अनेकांना प्रेरणा देणारं. झोपलेल्या माणसाला खडबडून जागं करणारं. बसलेल्या माणसाला उठून उभन करणारं आणि चालणाऱ्या माणसाला धावतं करणार आहे. पत्रकार म्हटलं की चीढ यावी अशी सध्याची परिस्थिती आहे. कुठल्याही पुराव्या अभावी बोलणारा पोपट म्हणजे पत्रकार अशी आजच्या पत्रकाराची अवस्था झालेली आहे. अशा परिस्थितीमध्ये निरंजन टकले सरांसारखे शोध पत्रकार प्रत्येक गोष्टीचा पुरावा प्राप्त करण्यासाठी आयुष्य झिजवणारे आणि पुराव्याशिवाय एकही शब्द न बोलणारे काही अपवाद पण ते बोटावर मोजण्याइतकेच. निरंजन टकले म्हणजे सत्याचा अविष्कार. निरंजन टकले म्हणजे सत्याचा अणुबॉम्ब.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ ( महाराष्ट्र ) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत )
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 ( Maharashtra ) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad ( Maharashtra ) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * ( * According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court. )
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# आ . बंब यांच्या मार्गदर्शनातून महाजनसंपर्क अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यामध्ये आ. प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनातून महाजनसंपर्क अभियान भारताचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी सरकारला 9 वर्ष पूर्ण झाले या सेवा, सुशासन और गरिब कल्याण अंतर्गत 9 वर्षात मोदीजीने जनतेसाठी सुरू केलेल्या विविध लोककल्याणकारी योजनानाचे परिपत्रक वाटप करण्यात आली सबका साथ , सबका विश्वास, सबका प्रयास या मोदीजींच्या वचनाप्रमाणे 9 वर्षांत केलेल्या नागरिकांच्या जनहिताच्या योजनेचे माहिती पत्रक प्रत्येक घराघरात देण्याचे काम सर्व लोकप्रतिनिधीं, शक्तिकेंन्द्र प्रमुख, बुथप्रमुख, व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून रत्नपुर-खुलताबाद तालुक्यात आमदार प्रशांतजी बंब साहेब यांच्या मार्गदर्शनात सुरू केले असून पत्रके वाटण्याची सुरवात झालेली असून आज दरेगाव, पाडळी, झरी, बाजारसावंगी, लोणी, बोडखा या परिसरातील नागरिकच्या घरी जाऊन परिपत्रक देण्यात आली या पत्रकात मोदी सरकारने 2014 पासून सुरू केलेल्या योजनांची संपूर्ण माहिती देण्यात आली आहे , जसे की, पी.एम.स्वनिधी, प्रधानमंत्री उज्ज्वला गॅस,सुकन्या समृद्धी योजना,आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना,जल जीवन मिशन पाणीपुरवठा योजना,प्रधानमंत्री जीवन ज्योती बिमा योजना,प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना,प्रधानमंत्री फसल बिमा योजना,अटल पेन्शन योजना,प्रधानमंत्री मातृ वंदना योजना,प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत अभियान योजना,स्टँड- अप इंडीया, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना,किसान क्रेडिट कार्ड योजना,प्रधानमंत्री जनधन योजना,न.मो.किसान सन्मान योजना, प्रधानमंत्री गरिब कल्याण योजना,प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम,



प्रधानमंत्री मुद्रा योजना, अशा अनेक योजनांची माहितीचे पत्रके वाटताना भाजपा तालुकाध्यक्ष प्रकाश वाकळे, माजी जि.प.उपाध्यक्ष एल.जी. गायकवाड, ज्ञानेश्वर नलावडे, विकास कापसे, प्रभाकर शिंदे, शिवाजी गायकवाड, आजिनाथ लहाणे, अशोक गायकवाड, गोरक्षनाथ गायकवाड, संदिप निकम, काकासाहेब गायकवाड, मिरलाल , रावसाहेब तांदळे,गणेश झुरावत, सत्तार पटेल, तसेच गावातील नागरिक उपस्थितीत होते.

# जळगाव जामोद येथे जागतिक छायाचित्र दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव जामोद :** जागतिक छायाचित्र दिनानिमित्त आज 19रोजी तालुकाभरातून व शहरातून आलेल्या व्यावसायिक छायाचित्रकारांनी स्नेहमिलन सोहळा व सहभोजन पार पडले.

सविस्तर वृत्त असे की, जगभरात 19 ऑगस्ट हा दिवस जागतिक छायाचित्र दिन म्हणून साजरा केला जातो याचाच एक भाग म्हणून तालुक्यातील सर्व व्यावसायिक फोटोग्राफर बंधू यांनी एकत्र येत येथील वडशिंगी रोडवरील श्री महासिद्ध महाराज मंदिर सभागृहात कॅमेरा पूजन व स्नेहसंमेलन आयोजित केले. सुरुवातीला कॅमेरा पूजन पार पडून वरिष्ठ छायाचित्रकारांनी नवोदित छायाचित्रकारांना उचित मार्गदर्शन केले. तसेच व्यवसायातील बदलत्या संधी व चढउतार याविषयी साधक बाधक चर्चा केल्या गेली. ही जागतिक दर्जाची कला जोपासने आज सोपे राहिले नाही, यासाठी अतिशय महागडे कॅमेरे आणून कायम अपडेट राहने फारच आवश्यक



असल्याचा मत जेष्ठनी व्यक्त केले. कार्यक्रम चा शेवट स्नेहभोज ने होऊन पुढे सर्वजण फ़ोटौवाल्क साठी सातपुडयात रवाना झाले. कार्यक्रम च्या वेळी तालुक्यातील लकी भगत, आश्विन राजपूत, अनिल पाटिल, शंकर कोथळकर, मुरलीधर सोनोने, अशोक जाधव, दिपक जाधव, प्रमोद ढगे, किसना दाते, सतीष हागे, ज्ञानेश्वर घोलप, व्यंकटेश धोरण, राम जाधव, अफसर मासरे,गोपाल उमरकर, क्षीरसागर सर, नंदू कोकाटे ,योगेश वानखडे, अनिकेत भगत, गणेश बावस्कर, सचिन घूळे, सुमित चव्हाण, दिपक कुवारे, इत्यादी शेकडो फोटोग्राफ़र ऊपस्थित होते.

# लोणी भापकरचा प्राचीन शिल्प ठेवा नष्ट होण्याच्या मार्गांवर

आधुनिक केसरी न्यूज

**लोणीभापकर :** महाराष्ट्रातील राजकीय आणि आर्थिक राजधानी पैकी सुपरिचित असलेल्या बारामतीच्या पंचक्रोशीतील लोणीभापकर या पौराणिक ऐतिहासिक भूमी वरील शिल्प संस्कृतीने समृद्ध असलेल्या प्राचीन शिवालय मंदिराला निधी मंजूर होऊनही दुरुस्ती डागडुजी बाबत पुरातत्व विभागाच्या हालगर्जी आणि उदासिनेतेमुळे प्राचीन पौराणिक अशा तेराव्या शतकातील शिल्पआणि बांधकाम शैलीतिला या मंदिराला अल्पवधीतच मुकावे लागण्याची भीती शिवभक्तांनी व्यक्त कैली आहें, भापकर या ऐतिहासिक सरदार घराण्याचा कुलस्वामी असलेले मल्लिकार्जून शिव मंदिर आपल्या आगळ्या वेगळ्या पाषाण शैलीच्या बांधकाम पद्धतीने ओळखले जाते सध्या श्रावण महिना



असल्या कारणणे एकांतातील हे शिवालय भविक भक्तांच्या महादेव गरजनेने लक्ष वेधून घेता आहें, इतकेच मल्लिकार्जून शिवालयास विदेश प्रवासी अभ्यासक केविन स्टयडेज यांनी खास भेट देऊन या मंदिरास वेळीस लक्ष न दिल्यास हा अनमोल ठेवा नस्ट होण्याची भीती व्यक्त कैली आहें या बाबत ग्रामस्थांनीही राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना निवेदन दिले असल्याचे सांगितले.



# डॉ. महेंद्रकर यांचा शांताराईमध्ये सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** शांताराई विद्यालय, ताजनापूर यांच्यातर्फे येथील प्रकाश धनजी धुमाळ यांचे भाचे डॉ. आशिकेश मंजीत महिंद्रकर यांनी बेंगलोर विद्यापीठ बेंगलोर येथे बायोलॉजी या विषयांमध्ये वयाच्या 23 व्या वर्षी आठ विषयांमध्ये पीएचडी करून गिनीज बुक ऑफ वॉर्डमध्ये नोंद केली. त्याबद्दल ताजनापूर येथील माजी सैनिक पोलीस पाटील संजय कोतकर प्राचार्य गणेश काळे यांनी त्याच्या आई-वडील व आजी सिंधुबाई धुमाळ मामा प्रकाश धुमाळ यांच्यासह सर्वांचा सत्कार केला.




महाराष्ट्र Business Katta












# साप अन्य वेळी मारा : आली पंचमी पूजा करा ?



श्रीकृष्णदास
निरंकारी (बापू)
संपर्क क्र. 9423714883

आधुनिक केसरी

**नागपंचमी हा श्रावण महिन्यातील भूतदया सांगणारा सण आहे. या दिवशी घरोघरी नागाची पूजा करून नागदेवतेला प्रसन्न करण्याची पद्धत आहे. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले, तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्या दिवसापासून नागपूजा प्रचारात आली, असे मानले जाते. नागपंचमी पूजा करताना महिला आणि पुरुष व्रतस्थ असतात. दर बारा वर्षांनी नागपंचमीच्या दिवशी देशभरातील नाथ संप्रदायाचे लोक गंगा-गौतमी अर्थात अहिल्या-गौतमी संगमावर स्नान करतात. अनंत म्हणजेच शेष, वासुकी, पद्मनाभ, कम्बल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया या ८ नागांची या दिवशी पूजा केली जाते. मात्र खालील श्लोकात वासुकी, तक्षक, कालिय, मणिभद्रक, ऐरावत, धृतराष्ट्र, कार्कोटक आणि धनंजय, असे वेगळेच नाग सांगितले आहेत- भविष्योत्तरपुराण: ३२/२/७-**

**"वासुकिः तक्षकश्चैव कालियो मणिभद्रकः|
ऐरावतो धृतराष्ट्रः कार्कोटकधनञ्जयौ||"**

**भारतीय संस्कृतीत अनेक प्रकारे नागांची** पूजा केली जाते. नाग म्हणजे फणाधारी सर्प होय. त्याच्या फण्यावर पुढच्या बाजूने दहाच्या अंकासारखे चिन्ह असते. त्याचा रंग हिरवट किंवा पिवळा असतो. त्याच्या तोंडात विष धारण करणारे दात असतात. त्याची जीभ दुभंगलेली असते. प्राचीन भारतीय लोकांनी त्याला देवत्व देऊन पूजा विषय बनवले. कृषी संस्कृतीत नागाच्या पूजनाचे महत्त्व विशेष आहे. नाग आणि साप हे शेताचे रक्षणकर्ते आणि शेतकरी बांधवांचा मित्र मानला जातो. नागपंचमीच्या सणाला बहिणीला माहेरी नेण्यासाठी तिचा बंधू यायचा. माहेरी जाण्याकरिता परवानगी घेण्यासाठी तिला सासू-सासरे, दीर-नणंदा, पतिराज यांची आर्जवे करावी लागत. अशावेळी ती या लोकगीतातून सासूरवाशीण सासूला म्हणते-

**"पंचमीच्या सणाला, बंधू आल्यात नियाला। बंधू आल्यात नियाला, रजा द्या मला जायाला।।"**

या सणाच्या निमित्ताने विवाहित बहिणीला तिचा भाऊ माहेरी घेऊन येतो, अशी पद्धती भारतात रूढ आहे. तरुणी पूजेला जाण्यासाठी हाताला मेंदी लावतात, ही पद्धतही हौसेचा भाग म्हणून आलेली दिसते. स्त्रिया झाडाला पाळणे बांधून झोके घेतात. मौजैने झोके घेत नागपंचमीची गाणी म्हणतात-

"फांद्यावरी बांधिले गं मुलींनी हिंदोळे,
पंचमिचा सण आला डोळे माझे ओले."

पूर्वी नागपंचमीच्या सणापूर्वी ८ ते १० दिवस आधी गल्लीतील सर्व लहानथोर स्त्रिया एकत्र येऊन फेर धरून गाणी म्हणत असत. या दिवशी महिला वर्तुळाकार आकार तयार करून झिम्मा-फुगडीसारखी नृत्ये व खेळ खेळत. झिम्मा-फुगडी, घोडा-चुईफुई, पिंगा-काटवटकाना, पिंगा इत्यादी खेळ मनसोक्त खेळत. खेळता-खेळता उखाणे, गाणी म्हणून मन मोकळे करताना दिसत-

**"नागपंचमीच्या गं दिवशी मी गं नेसले हिरवी साडी.
नाग भाऊराया मला पाठवितो गं गाडी.
नागपंचमीच्या दिवशी मी गं भरीला चुडा!
नागा रे भाऊराया तुला नैवेद्य ताजा पेढा!!
तूच रे रक्षण करी माझा आईच्या गोताचा!
नागा रे भाऊराया तुला नैवेद्य कढीचा!!"**

भारताच्या काही प्रांतात नागपंचमीला जिवंत नागाची पूजा होते. दूध-लाह्या या माणसाच्या आवडीच्या गोष्टी नागांना दिल्या जातात, पण ते त्यांचे अन्न नाही, त्याला त्यातून अपाय होऊ शकतो; हे लक्षात ठेवले पाहिजे. मात्र पावसाळ्यात तो माणसाच्या हिताचा आहार आहे. नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा करण्यापूर्वी महिला घराची स्वच्छता करतात. जमिनी शेणाने सारवितात. अंगणात रांगोळी काढतात. नागाची चित्रे भिंतीवर काढतात आणि त्याची पूजा करतात. काही ठिकाणी नागाच्या वारुळापाशी महिला गाणी म्हणत जातात आणि वारुळाची पूजा करतात-

**"नागा रे भाऊराया तुला वहिल्या मी**



**लाह्या, तुझ्या दर्शनाला आल्या शेजारच्या आया बाया।
नागा रे भाऊराया तुला नैवेद्य गुळाचा,
आता रक्षण करी माझ्या बंधूच्या कुळाचा।"**

आधुनिक काळात नागपंचमीचे व्रत कसे करावे? तर आजचे नागपंचमीचे व्रत नागप्रदेशातील एका तरी व्यक्तीशी संपर्क निर्माण करून माहित करता येईल. दात काढलेल्या आणि उपाशी ठेवून टोपलीतून आणलेल्या नागांचा छळ थांबविणे. नाग, सापांची उपयुक्तता घरोघरी, शाळा, महाविद्यालये यांच्यामध्ये जाऊन सांगितली पाहिजे. नागांमुळे उंदरांच्या संख्येवर नियंत्रण राहते. हरित क्रांतीची महत्वाकांक्षा पूर्ण करायची तर उंदरांच्या पोटात जाणारे धान्य वाचवावे लागेल. प्रत्येक तीन पोत्यापैकी एक पोते उंदीर खातात. म्हणूनच नागपंचमीचे आधुनिक व्रत 'धामण पाळा नि धान्योत्पादन वाढवा' अशा उद्‌घोषणांबरोबरच ते कृतीतूनही व्हायला हवे. तरारून आलेल्या शेताकडे पाहून कृषी कन्यांना खुप आनंद होतो. मग त्या भविष्याची सुखस्वप्ने पाहात उंच उंच झोके घेतात व हा सण साजरा करतात. या काळात मुलांनी मैदानी खेळ खेळावे, अशी जुनी प्रथा आहे. त्यासाठी मैदानी खेळांच्या स्पर्धा भरविण्याचा संकल्प श्रावणात धरावा व चातुर्मासात पूर्ण करावा. नाग पंथाचा इतिहास आणि त्यासंबंधी विविध कलांची माहिती घेणे.

फार पूर्वी एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला. अशीही समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपले शेत नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व काहीही कुटायचे नाही. असे काही नियम पालन करण्याची प्रथा आहे. श्रद्धाळू माणसे नागदेवतेची पूजा करून तिला दूध-लाह्यांचा व गव्हाच्या खिरीचा नैवेद्य दाखवतात. आपले संरक्षण कर, अशी प्रार्थना करतात. यावर त्रिकालदर्शी संतशिरोमणी कबीर महाराजांनी लिहिले-

**"सोने का जब नाग बना के,
पुजते यह दिन भाई! असली नाग निकल पडा,
तो दे डंडा लवलाई!**
अनाडी दुनिया, प्रभु जी कैसे तरिओ!!"

खरे तर माणसानेही त्याचे नेहमी रक्षण केले पाहिजे. साप दिसताच त्याला लाठीकाठीने बदडून ठार केले जाते, या आपल्या निर्दयीवृत्तीला आवर घातला पाहिजे. त्याची भिती वाटणे साहजिकच आहे, मात्र त्याला मारून दूर फेकणे योग्य नाही. तर सर्पमित्रांकरवी त्याला निर्जनस्थळी नेऊन सोडणे, हेच खरे नागपंचमी व्रत व महापूजा ठरेल!

# माय माउली !



डॉ.बलराज पांडवे
संपर्क क्र. 9511885093

आधुनिक केसरी

**प्रत्येक व्यक्तीच्या जीवनामध्ये आई या शब्दाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. कोणीआई म्हणते, कोणी माय म्हणते, कोणी मदर म्हणते, आईसाठी वेगवेगळ्या नावाने बोललया जाते.माय म्हणजे थंड वृक्षाची सावली, माय म्हणजे वासरासाठी गाय जशी, माय म्हणजे दुधावरची साय जशी, वेगवेगळ्या कवींनी आणि वेगवेगळ्या लेखकांनी आईचे वर्णन वेगवेगळ्या रूपाने वेगवेगळ्या भावनेने केलेले आपणास दिसून येते. म्हणून एका कवीने आईसाठी लिहिलेले ते शब्द या ठिकाणी मला आठवतात हंबरून वासराले चाटते जेव्हा गाय तवा मले गाई मंदी दिसती माझी माय माय म्हणजे अंतकरणातून फुटणारा मायेचा पाझरच जणू.. जशी की हंबरुनी गाय वासरालाचाटते ...तशीच माय ही आपल्या लेकरांना कुशीत घेऊन कुरवाळत असते.... कवटाळत असते.. लाड करत असते....! आई म्हणजे एक प्रेमाचं स्वरूप आहे. वात्सल्याची एक मूर्ती आहे. आई म्हणजे जगातील सगळ्यात महत्त्वाचे स्थान असणारी व्यक्ती आहे.**

लहानपणापासूनच आईच्या व्यक्तिमत्त्वाचे आपल्या जीवनावर प्रभाव पडलेले असतात. मुसळधार पाऊस पडत असताना आपल्या पदराखाली लेकराला झाकून जेव्हा माय घेऊन जाते, तसेच कडाक्याच्या उन्हामध्ये डोक्यावरती पदर टाकून जेव्हा उन्हापासून संरक्षण करत आई घेऊन जाते ते क्षण आठवले तर आजही कळते, आजही त्या गोष्टीची जाणीव होते की स्वतः पावसामध्ये भिजत जरी असली तरी आपल्या मुलाला पदराखाली झाकून पावसापासून संरक्षण करत असते. कडकडीत उन्हामध्ये सुद्धा लेकराला ऊन लागू नये म्हणून पदर डोक्यावरून टाकून सावलीमध्ये घेऊन जाणारी ती आईच असते. म्हणून आईच्या बाबतीत असे म्हटले जाते त्रिलोकीचा स्वामी आई विना भिकारी आईच्या अस्तित्वाची जाणीव ही माणसाच्या जीवनामध्ये नेहमीच होत असते. आई म्हणजे गजबजलेले एक घर असते,आई म्हणजे शांतीचा एक रूप असते, आई म्हणजे लेकरासाठी मायेचा स्वरूप असते, आई म्हणजे लेकरांसाठी प्रेमाचं पाझर असते. आईच्या अंतकरणांमध्ये लेकरांच्या प्रति असलेले माया, असलेली अस्मिता, असलेला जिव्हाळा व लेकराप्रती वाटेल ते कष्ट करण्यासाठी तयार असणारे रूप म्हणजेच मायेचा रूप आहे. जीवनामध्ये प्रत्येक व्यक्तीने डोळे बंद करून आईचं रूप आठवल्यास, त्यांना निश्चित ही प्रचिती होईल की आई म्हणजे लहानपणापासून मोठे होईपर्यंत सतत चंदनासारखं झिजणारे एक रूप आहे. हे मात्र प्रत्येक व्यक्तीला जाणीव झाल्याशिवाय राहत नाही हे सत्य आहे. ज्या घरात आई आहे त्या घरांमध्ये सुख-समृद्धी व शांती नांदत असल्याची प्रचिती वारंवार येत असते. तद्वतच ज्या घरांमध्ये आई नाही त्या लेकरांना पदोपदी आईची उणीव भासल्याशिवाय राहणार नाही! मुलांप्रती असलेला तिचा जिव्हाळा, असलेली तिची ओढ हे नाकारून चालणार नाही. आई नसेल तर एक मोठी पोकळी माणसाच्या आयुष्यामध्ये निर्माण होत असते. त्याची प्रचिती नेहमीच आपल्याला पदोपदी येत असते. म्हणून आई हे जगातील अशी व्यक्ती आहे की त्या व्यक्तीला पर्याय नाही... आयुष्यामध्ये अनेक नाती मिळतात.. मानलेली बहीण मानलेले भाऊ ....मानलेली आत्या ....मानलेली मावशी... पण आई हीआईच असते आईला पर्याय नसते म्हणून मी माझ्या एका कवितेमध्ये असे म्हटले आहे.. आई आईच असते

**आईला पर्याय नसते शोधून मिळत नसते
काहीही झाले तरी आई ही आईच असते**

मराठीत आई या विषयावर अनेक कवींनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. यशवंताची आई आपल्या लेकराच्या मुखात चिमणी प्रमाणे हळूच घास घालते, माधव जुलियन यांना तर आई वात्सल्य सिंधू आणि प्रेमस्वरूप वाटते.फ.मु. यांना तर आई म्हणजे गजबजलेलं घर वाटते. खरं तर आई मुळे घराला घरपण येतं .पावित्र्य नांदत असते. घरात मायेचे पंख असतात ते आईचेच! तिच्या मायेची ओल काही वेगळीच असते .पाडसांना सावली देणारी आईच असते.जीवनाच्या वाटेवरती अनेक नाती मिळतील परंतु आईसारखी व्यक्ती निर्णय दुरापास्त आहे. म्हणून आई वडील जोपर्यंत आपल्याबरोबर आहेत तोपर्यंत त्यांचे शब्द ,त्यांची शिकवण, त्यांचे मार्गदर्शन नेहमीच प्रत्येक व्यक्तीला जीवनामध्ये यशवंत शिखरावर घेऊन जाण्यासाठी निश्चितच मदत करत असते. आई म्हणजे विचाराची एक शिदोरी आहे. ज्ञानाचे एक पुस्तक आहे. आई म्हणजे आपल्या जीवनात येणार एक मायेचा निर्मळ झराच आहे. म्हणूनच जेव्हा जेव्हा आई अथवा माय या शब्दाचा उच्चार होईल तेव्हा प्रत्येकाच्या जीवनामध्ये आईची आठवण पदोपदी आल्या वाचून राहणार नाही... आपण आपल्या जीवनामध्ये आई आणि वडिलांना अहोरात्र कावड कष्ट करून मुलांच्या जडणघडणा साठी अविरत झटताना पाहत असतो. आपल्या जीवनामध्ये त्यांनी केलेल्या संघर्षाचा एक मोठा आदर्श असतो. आपल्यासाठी उपवासी राहून लेकरांना खाऊ घालणारे ती आईच असते. माझे लेखरं पोटभर खावेत, उपवासी झोपू नये असे समजून, चिमणी सारखी मुलांच्या तोंडामध्ये घास भरवत असते. त्यातून मिळणारा आनंद त्याचे वर्णन मी तरी शब्दांमध्ये करणे अशक्य आहे .मुलं आजारी पडली तर धावपळ करणारे ते आई व वडील हेच आहेत. मुलाला ताप आला तर रात्र रात्र जागून काढणारी ती आईच असते. मुलाच्या पायामध्ये काटा रुतला तर पळत येऊन मुलाला उचलून घेणारी ती आईच असते. मुलाच्या वेदना असहय झाल्या तर डोळ्यातून अश्रू ढाळणारी ती आईच असते .म्हणून पदोपदी आईचं रूप, आईची माया,वारंवार अनुभवयास मिळत असते. खरेच नशिबान असतात ती मुलं की ज्या मुलांना आई आणि वडिलांचं असं प्रेम मिळतं.. भर उन्हातून जेव्हा आपण जातो तेव्हा असे वाटते की कुठेतरी थंडगार वृक्षाची सावली मिळाली तर बरे झाले असते थोडा वेळ आपणास त्या ठिकाणी विसावा मिळाला असता तद्वतच लहानपणापासून थंड वृक्षाची सावली होऊन ऊन वारा व पावसापासून संरक्षण करणारी ती आई अजूनही आठवते मला. म्हणूनच एका कवीने असे म्हटले आहे माय माझी माऊली थंड वृक्षाची सावली लहानपणी जेव्हा आपल्या हातून काही चुका झाल्या असतील, काही नुकसान झाला असेल, तर मुलांना जवळ घेऊन समजावून सांगणारी ती आईच असते. तिला माहित आहे की मुलाकडून चूक झालेली आहे पण तिचं हृदय मुलाला मारावं याकडे निश्चितच वळत नाही. ती मुलांना समजून सांगत असते. अशा या प्रेमळ रूपाचं वर्णन शब्दाने करणे तसं अवघडच आहे ! आईचं हृदय म्हणजे जणू काही निर्मळ वाहणारा झराच आहे. आईची माया म्हणजे जणू काही त्रिलोकीच्या स्वामीची कृपा छाया आपल्यावर आहे असे वाटत असते. तिच्या असण्याची जाणीव पदोपदी येते .परंतु ज्या लेकरांच्या आयुष्यातून आईचे छत्र निघून जातं, हरवल्या जातं ,तेव्हा त्या लेकरांना कळतं की आईचं अस्तित्व काय आहे ते ! जोपर्यंत आई सोबत असते तोपर्यंत आईची माया ,आईचा जिव्हाळा, आईचं प्रेमळ रूप, आपल्याला जाणीव करून देत नसते पण जेव्हा तिच्या अस्तित्वाची पोकळी निर्माण होते आणि आई जेव्हा निघून जाते त्यावेळेस खरं कळते की आई असणे



किती गरजेचं आहे. मुलं कितीही मोठे झाली कितीही शिकली सवरली तरीही घरांमध्ये आईसारखं एक वटवृक्ष असणे हे अत्यंत गरजेचे आहे. ते घरात असणे म्हणजे घराचं लौकिक टिकून राहणे असेच म्हणावे लागेल! घरातील लहानसहान गोष्टीकडे लक्ष देणे, नातवंडाकडे लक्ष देणे, नातवंडाच्या आशा आकांक्षा जपण्याबाबत सांगणे, नातवंडाच्या शिक्षणाची चिंता करणे, नातवंडाच्या लग्नाची चिंता करणे, माझ्या समोरनातवंडाना मूलबाळ व्हावं अशी अपेक्षा करणे हे खरंच एक प्रेमस्वरूप माऊलीचा रूप आहे असेच म्हणावे लागेल!

संकटकाळी ज्याप्रमाणे चिमणी आपल्या पिलांना पंखाखाली घेऊन पिलांचे रक्षण करत असते तद्वतच आईही आपल्या मुलांचं आयुष्यभर रक्षण करत असते. चिमणी वाणी रानावनात फिरून काबाडकष्ट करून घरी आल्यानंतर मुला बाळांच्या तोंडात घास भरवणारी ती आईच असते. आई हे प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील एक महत्त्वाचं व्यक्तीमत्व आहे. मुलांच्या चेहऱ्यावरती जेव्हा आनंद दिसतो, जेव्हा मुलं प्रसन्न चित्ताने येतात किंवा जेव्हा मुलांना यश प्राप्त होते ,तेव्हा गगनात न मावणारा आनंद आईच्या चेहऱ्यावर दिसत असते, तिला आपल्या लेकरांचे कुतहल वाटते. कौतुक करावसं वाटते आणि माझ्या मुलाबाळांनी यशस्वी जीवन जगत आहे किंवा यशस्वी जीवनाची वाटचाल करत आहेत या समाधानामध्ये अगदी शांत चित्ताने ती त्या घरामध्ये वावरत असते. कितीही मोठे संकट आले तरी स्त्री रूपातील ही आई वटवृक्षाच्या झाडासारखी मुलाबाळांच्या पाठीशी अगदी खंबीरपणे उभे राहून त्या संकटापासून संरक्षण करण्यासाठी अखंड राबत असते. मुलाबाळांसाठी झिजत असते. जीवनामध्ये व साऱ्या नात्यांमध्ये मुलांबाळासाठी झिजणारे एकच व्यक्ती महत्व आहे ती म्हणजे आई ! मी माझ्या मुलाबाळांसाठी काय करतोय हे कधी ती बोलून दाखवणार नाही, कधी मुलांच्या उणिवा काढणार नाही, परंतु मुलांना प्रेरणा देत असते. मुलाबाळांना प्रोत्साहित करत असते. जीवनाचे मार्ग सांगत असते. जगण्याच्या तऱ्हा शिकवत असते. लहानपणापासून अखंडपणे मुलांवरती संस्कार करण्याचे काम आई या रूपाने ती सतत करत असते. कधी कधी आपणास त्या गोष्टीचा टोकियो टोकीयो खूप राग येतो .आईचे वारंवार सांगणे कधी कधी आपणास आवडतही नसते पण तिच्या दृष्टीने मुलाबाळांचे रक्षण करणे हे तिच्या जणू व्यक्तिमत्त्वाचा एक भागच आहे असे समजून ती मुलाबाळांना वारंवार चांगल्या गोष्टी सांगण्याचा कसूशीने प्रयत्न करत असते. असे म्हटल्या जाते आप्त वाक्य हे माणूस जीवनामध्ये सतत जपून ठेवण्याचा प्रयत्न करत असतो. माझ्या वडिलांनी मला असं सांगितलं ,माझ्या आईने मला असं शिकवलं, माझ्या पूर्वजांचे हे असे आदर्श आहेत , माझ्या पूर्वजांची ही अशी महिमा आहे, अशा पद्धतीचे वडीलधाडील माणसाकडून मिळालेले संस्कार जपण्याचं आपण नेहमी प्रयत्न करत असतो. मग ही तर आईपासून मिळालेली जीवन मूल्याची शिदोरी आहे. त्या शिदोरीचे जतन करणे हे मुलाबाळांचे आद्य कर्तव्य आहे. कुणीही आई-वडील आपल्या मुलांचं कधीच वाईट चिंतत नसतात. कुठेही राहिले, कसेही राहिले कोणत्याही परिस्थितीमध्ये जगले तरी मुलाबाळांच्या प्रति त्यांच्या मनामध्ये नेहमीच प्रेमाची, आपुलकीची व जिव्हाळ्याची भावना असते म्हणून आप्त वाक्य ज्या पद्धतीने आपण जीवापाड जपतो तद्वतच आईने दिलेले संस्कार, आईने शिकवलेल्या चांगल्या गोष्टी, आईने सांगितलेल्या महत्त्वाच्या गोष्टी या सर्व बाबींचा जर माणसाने जीवनामध्ये उपयोग केला तर निश्चितच जीवन हे सुख समृद्धी आणि भरभराटीचे जाऊ शकतो. परंतु हल्लीच्या काळामध्ये कुटुंबाची व्याख्या ही संकुचित झाली आहे .एकत्र कुटुंब पद्धती हळूहळू लोप पावत चालली आहे. मी व माझी पत्नी व माझे मुलं एवढंच कुटुंब समजून माणूस हा दिवसेंदिवस नात्याच्या धाग्यातून बाजूला होत चालला आहे हे आपण नित्य पाहतोय ! एकत्र कुटुंब पद्धतीमध्ये राहण्याची सहसा आजच्या आधुनिक युगातील मंडळीची मानसिकता नाही. आई-वडील यांना सोबत ठेवून त्यांच्या वर्धापकाळी सेवा करण्याची प्रवृत्ती जवळपास लुप्त होत चाललेली आहे. घरामध्ये म्हातारी आई, म्हातारे वडील असणे म्हणजे जणूकाही एक मोठी अडचणच आहे, असे समजून त्यांच्याकडे बघितले जाते. त्यांच्या भावना, त्यांचे संस्कार, त्यांचे आपल्या प्रती असलेल्या अपेक्षा याकडे दुर्लक्ष करून बरेचसे लोक वावरत असताना आपण पाहत असतो. माहिती नाही हे योग्य आहे का अयोग्य आहे? परंतु सारासार जर विचार केला तर वर्धापकाली आई-वडिलांच्या असणाऱ्या भावना त्यांचे संस्कार आपण जपले पाहिजे. त्यांच्या आरोग्याच्या बाबतीत आपण काळजी घेतली पाहिजे. त्यांनी दिलेल्या संस्काराचे पालन केले पाहिजे असे या ठिकाणी वाटते. परंतु हल्लीच्या काळामध्ये आईचं रूप, आईची माया, आईचे कष्ट लक्षात न ठेवता आईपासून लांब राहून आपल्या कुटुंबामध्ये रममान होणारी अनेक मुलं-मुली आपण पाहत असतो. यास काय म्हणावे याचे आकलन करणे अत्यंत अवघड आहे !

# सरकारी रुग्णालयांची दैन्यावस्था



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**नुकतेच ठाणे महापालिकेच्या कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात दिनांक 12 व 13 ऑगस्टला म्हणजे शनिवारी रात्री 10.30 ते रविवार सकाळी 8.30 वाजेपर्यंतच्या 10 तासांत तब्बल 18 रूग्णांचा मृत्यू झाला याचा धक्का संपूर्ण महाराष्ट्राला बसला.यामुळे असे वाटत आहे की सरकारी रुग्णालयाची हालत गंभीर अवस्थेत असल्याचे दिसून येते.आजच्या परिस्थितीत सरकारी रूग्णांलया सोबतच सरकारी शिक्षण संस्था सुध्दा अत्यंत दैनीय अवस्थेत दिसून येते.ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात एकाच दिवशी 18 रूग्णांचा मृत्यू झाल्यानंतर राज्यभर खळबळ उडाली. यामुळे आरोग्य विभाग खडबडून जागा झाला व सरकारी यंत्रणा ॲक्टिव्ह मोडवर आली आहे.आता प्रश्न आहे की उपराजधानीतील मेडिकल आणि मेयोत होणाऱ्या मृत्यूंचे काय? मेडिकल आणि मेयोत मोठ्या प्रमाणात मृत्यू होतात अशी माहिती पुढे आली आहे.**

मेडिकलमध्ये आठवड्याभरात 108 रूग्णांचा मृत्यू तर मेयोत 43 रूग्णांच्या मृत्यूची नोंद झाल्याची माहिती समोर आली आहे. विदर्भासह आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, तेलंगणातील गरिबांचा आधार मेडिकल आहे.परराज्यातील 30 टक्के रूग्ण मेडिकलमध्ये येतात.दरवर्षी 7 लाख रुग्णांची बाह्यरुग्ण विभागात नोंद होते.येथील गर्दीमुळे रूग्णांकडे दुर्लक्ष होत असल्याचे विदारक वास्तव आहे.त्यामुळे प्रश्न आहे की उपराजधानीत होणाऱ्या मृत्यूंची दखल सरकार घेणार का ? असे अनेक प्रश्न सर्वसामान्यांसमोर उद्‌भभवतांना दिसते.

सरकारी रूग्णांलये मग मनपाची असो वा शासनाची असो वा जिल्हा परिषदांची असो वा ई.एस.आय.सी. या संपूर्ण रूग्णांलयांची अत्यंत वाईट अवस्था असल्याचे सध्याच्या घटनेवरून दिसून येते. कारण रूग्णांना औषधी,रक्त डोनेट, रक्त चाचणी, एक्सरे इत्यादी अनेक गोष्टींसाठी भटकावे लागते व झुंझ द्यावी लागते यामुळे रूग्णांचे नातेवाईक हताश होतांना आपण पहातो व अशा परिस्थितीत रूग्णांचा वेळीच उपचार झाला नाही तर रूग्ण दगावतात सुध्दा. राज्यातील काही बोटावर मोजण्या इतकी मुख्य



रूग्णांलये सोडली तर आजही राज्यात अनेक सरकारी रुग्णालये अत्यंत दयनीय अवस्थेत आहेत याचे जिवंत उदाहरण आपल्याला कळवा येथील छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालयात दिसून आले.यामुळेच खाजगी रुग्णालयांची आपल्याला चांदी दिसून येते. सरकारी रूग्णालयात रूग्णांना योग्य सुविधा व उपचार योग्यवेळी मिळत नसल्याने अनेक रूग्ण दगावतात.अशा परिस्थितीत गरीब व सर्वसामान्यांचा कल खाजगी रुग्णालयाकडे जातो.परंतु पैशांच्या अभावामुळे सरकारी रुग्णालयातच आश्र घ्यावाच लागतो अशा परिस्थितीत औषधोपचार सुरळीत झाला नाही किंवा बाहेरून औषधी आनण्याकरीता पैशांच्या अभावामुळे रूग्ण दगावतात ही सत्य परिस्थिती आहे.शहरात मोठ्या प्रमाणात खाजगी रुग्णालये आपल्याला दिसून येते.रूग्णांच्या खिशात पैसा असेपर्यंत खाजगी रूग्णालये रूग्णांचा उपचार मोठ्या थाटामाटात करतात.परंतु पैसा संपल्यानंतर संवेदनाहीन होते व मानुसकीची जबाबदारी सोडून खाजगी रूग्णालयातून थेट ॲम्ब्युलन्स मार्फत मेडिकल किंवा मेयोत रूग्णाला पाठवले जाते.ही रूग्णालये सरकारी असल्यामुळे दाखल करावेच लागते.खाजगी रूग्णालयातुन सरकारी रूग्णांलयात येणारे जास्ततर रूग्ण अत्यवस्थ किंवा शेवटच्या घटका मोजणारे असतात.यामुळे मेडिकलमध्ये उपचारादरम्यान दररोज 16 हून अधिक रूग्ण दगावतात तर मेयोत दररोज किमान 7 रूग्ण अखेरचा श्वास घेतात असे सांगितले जाते.हा अत्यंत गंभीर व चिंताजनक विषय आहे.राज्याची वाढती लोकसंख्या व सरकारी रूग्णांलयात रूग्णांची होणारी गैरसोय यांवर अंकुश लावण्यासाठी सरकारने सर्वप्रथम खाजगी रूग्णालयाच्या मुस्क्या आवळायला पाहिजे. तेव्हाच आपल्याला सरकारी रूग्णांलयात स्थिरता दिसून येईल व सर्वसामान्यांना योग्य उपचार मिळेल. सरकारला खाजगी रुग्णालये किंवा सरकारी रुग्णालये यातील तफावत पहायची असेल तर राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या परिवारांचा संपूर्ण उपचार सरकारी रूग्णांलयात घ्यावा व त्यात काय-काय अडी-अडचणी येतात ते जाहीरपणे जनतेला सांगावे.यातुन आपल्याला कळेल की सरकारी रुग्णालयाच्या काय अडचणी आहेत.

खाजगी रूग्णांलयातील लुट थांबली तर सरकारी रुग्णालयात रूग्णांना योग्य उपचार मिळु शकतील. जोपर्यंत सरकार सर्वसामान्यांकडुन होणारी खाजगी रुग्णालयांतील लुट थांबवित नाही तोपर्यंत सरकारी रूग्णांलयांमध्ये सुधारणा होणार नाही हेही तितकेच सत्य आहे.आजच्या परिस्थितीत सरकारने मुख्यत्वे करून आरोग्य आणि शिक्षण विभाग यांच्यातील खाजगीकरणावर अंकुश लावायलाच हवा तेव्हाच सर्वसामान्यांना योग्य न्याय मिळेल.सध्याच्या परिस्थितीत राज्यात सर्वात जास्त महागडे असेल तर आरोग्य आणि शिक्षण.त्यामुळे हा अत्यंत गंभीर व चिंताजनक विषय आहे यावर सरकारने गांभीर्याने विचार करून सर्वसामान्यांना योग्य न्याय द्यावा.हिच अपेक्षा!

# सर्पमित्रांचे योगदान मोलाचे..!



संगीता ठलाल
७८२१८१६४८५

आधुनिक केसरी

**श्रावण महिन्यात येणाऱ्या बरेच सणांपैकी महत्वाचा सण म्हणून ओळखल्या जाते तो सण म्हणजेच नागपंचमी सण होय. मोठ्या प्रमाणात जिकडे, तिकडे साजरा केला जातो. आजच्या दिवशी मुली, महिला वारूडापाशी जाऊन नाग देवतेची मोठ्या श्रध्देने, आस्थेने पूजा करतात. खास करून ते नागाला आपला भाऊ माणतात.असे अनेकदा ऐकण्यात आले आहे काही लोक म्हणतात की, नाग दुध पितो पण,सर्पमित्र सांगतात की,नाग कधीच दुध पित नाही सारी ही अंधश्रद्धा आहे. खास करून नागसाप बळीराजाचा मित्र आहे त्याच्या शेतात राहून उंदरांपासून होणाऱे नुकसान थांबवतो असो, हे सर्व ठीक आहे पण,साप दिसताच कोणाला भीती वाटत नाही नुसते त्याचे नाव ऐकताच अंगावर काटा येतो.**

जर ऐनवेळी साप दिसतास कोणी भाऊ किंवा बहीण किंवा शेजारी राहणारे लोक सापाला पकडण्यासाठी धावून येत नाही तर नुसते साप बघायला अनेक जण येऊन गर्दी करत असतात व दुरूनच बघत असतात त्यावेळी मग मदतीसाठी कोण येणार हा एक सर्वांना प्रश्न पडत असतो आणि ऐनवेळी त्यांना एका साहसी व्यक्तीची आठवण होते ते म्हणजेच सर्पमित्र होतं. स्वतःचे जीव धोक्यात घालून दुसऱ्यांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी एका निष्पाप जीवाचे प्राण वाचविण्यासाठी रात्र असो किंवा बेरात्री,दिवसा स्वतः च्या खिशातील पैसे खर्च करून दुचाकीत पेट्रोल भरून दोघे तिघेजण मिळून ज्या ठिकाणाहून फोन आला तिकडे माणुसकीचा नाता ठेवून आपुलकीने धावून जातात ते सर्पमित्र असतात. समाजासाठी बरेच लोकांचे योगदान असतात पण,खऱ्या अर्थाने मोलाचे योगदान सर्पमित्रांचे सुद्धा आहेत पण, हे कोणालाही दिसत नाही नाही कारण त्यांना फक्त सर्पमित्र माहीत असतात पण त्यांना पूर्णपणे वाचत नाही म्हणून सर्पमित्र कळत नाही जर आजपर्यंत सर्पमित्र या समाजाला कळले असते किंवा त्यांनी दिलेले निःस्वार्थ भावनेचे योगदान जाणले असते तर सर्पमित्रांची या जगात वेगळ्या प्रकारे ओळख निर्माण झाली असती पण, त्या प्रकारची ओळख होत नाही हीच फार मोठी शोकांतिका आहे. साप कितीही मोठा असेल तरी त्याला अगदी चतुराईने पकडून जंगलात नेऊन सोडतात त्याचे प्राण वाचवतात आणि अनेकांच्या मनातील भीती दूर करून माणुसकी धर्म निभावून दाखवतात अशा सर्पमित्र समाजकार्य करणाऱ्या कार्यकर्त्या चा प्रत्येक जिल्हयातील जिल्ह्याधिकारी यांच्या हस्ते सर्पमित्रांचा सन्मान व्हायला पाहिजेत एवढेच नाही तर नेत्यांच्या हस्ते सुद्धा सन्मान व्हायला पाहिजेत, गावात,किंवा शहरात सामाजिक कार्यक्रम होत असतील तेथे सुद्धा त्यांना मानाचे स्थान मिळायला पाहिजे कारण, सर्पमित्रांना शासनाकडून कोणतेही मानधन मिळत नाही आणि ज्या घरी साप निघाला असतो त्या घरी जाऊन जेव्हा ते साप पकडून संकट दूर करतात त्यांच्याकडूनही रुपयाची मदत मिळत नाही कारण सर्पमित्र कोणालाही पैसे मागत नाही तर माणुसकीच्या नात्याने निःस्वार्थ भावनेने मोलाचे कार्य करून दाखवतात अशा माणुसकीच्या कार्यकर्त्यांचा सन्मान होणे आवश्यक आहे. पण,पाहिजे तेवढ्या प्रमाणात त्यांची कोणीही दखल घेत नाही किंवा घरी असो किंवा एखाद्या शासकीय ठिकाणी साप निघाला की त्यांना बोलवतात पण, एकदा ते साप पकडून नेले की लगेच त्यांना विसरून जातात असा हा स्वार्थी समाज आहे. जे,समाजाच्या हितासाठी चांगले कार्य करतात त्यांचा विसर पडत असतो व जे, प्रसिद्धी



मिळविण्यासाठी दिखावूपणाचे थोडे कार्य करून दाखवतात त्यांचा मात्र उदोउदो केला जातो. उदा. आज जर सर्पमित्र नसते तर कितीतरी सापांचे प्राण गेले असते कारण ते, सापांना फक्त, वैरी समजतात पण,कोणतेही प्राणी असोत किंवा कीडे, सरपटणारे जीव कोणाचेही वैरी नसतात जेव्हा बोलता, चालता माणूसच निसर्गाच्या नियमांचे उल्लंघन करून पशूंना लाज वाटेल एवढ्या खालच्या पातळीवर जावून वागत असेल तर दंड तर सांपाकडून असो किंवा इतर प्राण्यांकडून मिळणारच आहे हे, सत्य आहे म्हणून जे,कोणी आजकाल योग्य कार्य करत आहेत त्यांचा पूर्णपणे विसर पडलेला दिसत आहे त्यातील सर्पमित्र सुद्धा आहेत ते, अजूनही समाजाला कळले नाही म्हणून त्यांची कोणी कदर करत नाही व दखल घेतली जात नाही. बरेचदा सर्पमित्रांशी माझं बोलणं होत असते त्यांचे कार्य व त्यांच्यात असलेल्या माणुसकी बद्दल मला अभिमान वाटतो म्हणून आज पुन्हा एकदा दुसऱ्यांदा त्यांच्यावर लेख लिहिण्याचे मला भाग्य लाभले आहेत कारण ते, स्वार्थी नाही तर निःस्वार्थी होऊन समाजाला विशेष योगदान देत आहेत प्राण वाचविणाऱ्याला प्राणदाता म्हणतात व स्वतः साठी जगतात त्यांना स्वार्थी म्हणतात असे हे, निःस्वार्थी प्राण दाते महान समाजकार्य करणारे सर्पमित्र आहेत.

# मानाचा झोका कालबाह्य



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**काही वर्ष आपण मागे गेलो तर असा एक काळ होता की पंचमी कधी जाणार पंचमी कधी येणार ह्या अशा चर्चा साधारण एक महिना भर चालायच्या हे शब्द आपल्या लाहनपणी आपण ऐकले देखील आहेत. मानाच्या झोक्याची हवा तर घरा घरात गावागावात वाडी वस्ती तांड्यावर असायची.झोका नाहीअसं घर नव्हतं . काय तो झोका काय ती पंचमी सगळं कसं ओके होत .पण सध्या हे ओके नाही तर नावा पुरतच उरलय का ? असं वाटतंय कारण हि सगळी रंगत जवळपास संपुष्टात आल्यात जमा आहे . फक्त आठवणी शिल्लक आहेत असंच काहीसं वाटतंय. आपल्या धर्म शास्त्रानुसार आपण अनेक वेगवेगळे सण उत्सव साजरे करत असतो. परंतु त्या त्या सण उत्सवांच्या निखळ निरागस आनंदाला मात्र आपण दिवसेंदिवस परके होत चाललोय.**

आपण सुधारीत झालो प्रगतशील झालो अगदी चंद्रवर पोहचलो .पण याच बरोबर जीवनातील निरागस आनंदाला मात्र मुकलो .हे वास्तव नाकारता येणार नाही मी दिनदर्शिका पाहिली उद्या पंचमी आहे दिसलं म्हणून समजलं पण पुर्वी एक महिन्या पासून पंचमीची हवा होती .ती हवा तर सोडाच पण हल्ली पंचमी आहे कि नाही हेच लक्षात येत नाही .म्हणून पंचमी तिचं आहे पण रंगत मात्र नक्कीच बदलत चालली आहे म्हणजे दिवसेंदिवस कमी होत आहे .कित्येक महिन्यांपासून ज्या पंचमीची वाट पाहिली जायची पंधरा वीस दिवस गावात सगळीकडे झोकेच झोके गावांत अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या घर सापडायचे ज्या घरी किंवा शेतात झोका नसेल उर्वरित गाव आणि शिवार झोक्यांनी फुलुन निघायचा . मंदिराच्या आवारात दर्शन रंग असावी तशी मानाचे पाच झोके घेण्यासाठी रांग असायची अशी रंगतदार पंचमी एक पर्वणीच होती .हल्ली पंचमी कधी आली आणि कधी गेली हेही कळत नाही . फक्त औपचारिकता म्हणून आपण सण उत्सव साजरे करतो आहेत असंच काहीस वाटत. अगदी रखरखत्या ऊन्हाळयातील आखीदीचा ( अक्षय तृतीया ) सण संपला कि माहेरवाशिणीला पंचीमीसाठी माहेरी जाण्याचे वेध लागायचे आणि ती अगदी चातका पक्षा प्रमाणे पंचमीच्या सणाची आणि माहेरच्या लोकांच्या भेटीची ओढ घेऊन दिवस मोजायची अगदी उन्हाळ्यात चातक पक्षी ज्या पद्धतीने मृगाच्या पहिल्या पावसाची वाटअगदी मग्न होऊन पाहतो .पंढरीचा वारकरी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूर ला कोणत्याही परिस्थितीत जाण्यासाठी आडाखे बांधत असतो . त्याच्या पद्धतीने माहेरवाशिण हि पंचमीच्या सणाला कोणत्याही परिस्थितीत माहेरी जाऊन झोका खेळणारच या आंनद विश्वात आपलं दैनंदिन दुःख विसरून रममाण होत असे माहेरीचा झोका तीला क्षणोक्षणी खुणावतअसे ह्या सगळ्या वाट पाहण्याच्या खेळात अगदी पंचमी तोंडावर येत असे. सगळीकडे पाणीच पाणी आणि हिरवळ असल्याने मन प्रसन्न प्रसन्न अशातच गुचकी लागली किंवा कोणीही दिसलं कोणत्याही गाडीचा आवाज काणी पडला तर आपल्याला घेण्यासाठी मुराळी आला असा भास होण अगदी स्वभाविक आणि अपेक्षित होत.अनेक दिवसांपासून रोज रोज क्षणोक्षणी डोळे लावून ज्या मुराळ्याची वाट पाहत असे तो मुराळी अखेर पाहचाला कि मग आनंदाला भरत येत असे आणि त्या दिवशी ची रात्र अंखड जागत सकाळची वाट पाहत पाहत स्वप्नात हरवलेली माहेरवाशीण सकाळ झाली कि अगदी लगबगीने आपलं सगळं उरकुन माहेरच्या वाटेने मार्गक्रमण करत असे अनेक सख्या बालपणीच्या आठवणी सगळ्या मैत्रिणी काय ते विश्व या सगळ्या आठवणीत मग्न झाल्यावर गाव आल्यावरच समजयाच हि गंमत खुपचं निराळी असायची मग सुरवात होई ती रस्त्यावरील प्रत्येक घरातील परिचित अपरिचित माणसांना काही तरी संवाद साधयचा असं होता होता घर येई.आणि मग डोक्यावर असणारं खुप मोठं ओझं अगदी हालक हालक वाटत असे संध्याकाळी हातांवर मेहंदी सकाळी गावभर भेटी अनेक ठिकाणी झोकयाचा ठेका मनोभावे वारूळाची पुजा कसल दुःख कसला तणाव काही नाही अगदी लहान बालका सारखं जीवन जीवनातील सगळी सुख दुःख विसरून फक्त मन बालका होऊ अंनद मग्न असायच . पण आता हे सगळं कुठे राहील आहे . फक्त आठवणी शिल्लक आहेत.पंचमी घरात लावलेल्या दिनदर्शिकेवर दिसते . औपचारिकता म्हणून विधिवत पूजा झाली पंचमी कुठं साजरी झाली हे पण लक्षात येत नाही . हल्ली म्हणजे एकंदरीत सण उत्सव हे दुःख विसरून मंत्र मुग्ध होऊन आनंद लुटण्यासाठी असतात हे आपण विसरलो आहेत. फक्त औपचारिकता म्हणून आपण हे सगळं साजर करतोय .रूढी परंपरा आहेत म्हणून पुढे चालवतो आहेत. पण त्यामधील खरया आनंदाला मात्र आपण मुकलो आहोत हे नाकरता येणार नाही. निरागस आनंद लुटायचा सोडून आपण भौतिक तंत्रज्ञान युगाच्या जोखडात असो अडकलो आहेत कि प्रत्येक बाबतीत खरया अर्थाने आनंदाला आपण मुकलो आहोत.

# चांगुलपणाचा दबाव समाज नीट होण्यासाठी आवश्यक : आमदार श्रीकांत भारतीय

आधुनिक केसरी

**महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने नुकतीच छत्रपती संभाजीनगर येथे सोशल मीडिया कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेला राज्यभरातून आलेल्या पत्रकारांना विधान परिषदेचे अभ्यासू आमदार श्रीकांत भारतीय यांनी मार्गदर्शन केले. आ. भारतीय यांचे संपूर्ण विचार प्रवर्तक आणि अंतर्मुख करणारे भाषण येथे देत आहोत...**

महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यातून येथे उपस्थित पत्रकार बांधवांनो, खरं तर ज्यांच्या ओल्या, हळव्या मैत्रीच्या धाकाने मी इथं आज आलो, म्हणजे माझे वडील मला नेहमी म्हणायचे की, काही लोकांचा प्रेमाचा धाक असतो. पण काही लोकांच्या धाकातून प्रेम निर्माण होते, असे आमचे माननीय वसंतजी. खरं तर हा माणूस म्हणजे वसंत आहे, मुंडेही आहे. पत्रकार, कार्यकर्ता आहे. मी जेवढा काळ भेटलो तेव्हा बरेचदा मला त्यांच्यातला नेताही झलकतो. वसंतराव तुम्ही कुठवर लोकांच्या मुलाखती घेणार? आता तुमची मुलाखत कुणी घेतील, अशा क्षेत्रात या. पण मला वसंत मुंडे या व्यक्तिमत्त्वातला भावलेला एक भाव म्हणजे हा माणूस मित्र आहे. बाकी सगळंय पण दोस्तय. एक वेळ भेटला तर सारखं वाटतं भेटतं राहावं..हा माणूस भेटत गेला पाहिजे. पत्रकार असून सुद्धा सगळ्यांना मित्र वाटतो. म्हणजे लोकांमध्ये चर्चा असते. आज त्यांचा सत्कार झाला. त्यांना खूप मनापासून शुभेच्छा. आईभवानीच्या चरणी प्रार्थना करतो की, त्यांना आयुष्यात सर्व आव्हानांना पेलण्याची सामर्थ्यवान शक्ती देवो. वसंतराव यांनी आज आणखी वेगळी हिंमत केलीय. सोशल मीडियाचं ट्रेनिंग पत्रकारांना द्यायचं ठरवलंय.. माझा एक मित्रय वसंत, पुण्याला असतो. रीसर्च करतो. तो मला नेहमी असे सांगतो, समाजातील राजकारणी, पत्रकार, आणि पोलीस कोणत्याही विषयाचं प्रशिक्षण घेण्याच्या मानसिकतेत नसतात. ते प्रशिक्षण देण्याच्या मानसिकतेत असतात. माणूस एकदा राजकारणात गेला की, त्याला नळाच्या तोटीपासून पाकिस्तानमधील घटनाच्या संदर्भापर्यंत सगळं येतं. सोशल मीडियाचं प्रशिक्षण देण्याचं धाडस वसंतराव तुम्ही केलेलं आहे. सोशल मीडियाच्या ताकदीवर तर कुणी बोलूच नये. एवढी खतरनाक ताकद आहे. यात मी फार बोलणार नाही, कारण नंतर सत्र आहे. दिवसभर तुम्ही ऐकणार आहात. फेसबुक, ट्विटर, इंस्टाग्राम वर पोस्ट टाकणे म्हणजे सोशल मीडिया हे डोक्यातून काढून टाका. सोशल मीडिया समजून घ्यायचा असेल तर सोशल या दोन शब्दांचा अर्थ समजला पाहिजे. अन्यथा सध्या पत्रकार, राजकारणी आणि सामाजिक कार्यकर्ते यांचे सोशल मीडिया अकाऊंट फोटोशॉप झाले आहेत.

भारतातील सोशल डीएनए आपण समजून घेणार नाही, तो पर्यंत आपण सोशल मीडियाचा प्रभावी वापर करू शकणार नाहीत. ताकद तर सगळ्यांनीच समजलीय. म्हणजे पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी म्हणतात, एक काळ होता, मोठ्या स्क्रीन की चर्चा होती ७० एमएम. तिथून नंतर छोटा स्क्रीन आपल्या घराच्या आत आला आणि आता अख्खी लढाई या छोटया स्क्रीनवर आहे. ताकद कुठपर्यंत आहे तुम्हाला सांगतो. उत्तर प्रदेशातील निवडणुकीतील किस्सा सांगतो, तुम्हाला धक्का बसेल. कानपूरमध्ये ११ पोरं वसतिगृहात एकत्र राहतात. त्यातला एक मुलगा माझ्याशी संबधित होता. त्याने मला फोन केला. म्हणाला, श्रीकांतजी उद्या दुपारी साडेचार वाजता टीव्ही वृत्तवाहिन्यावरची मुख्य बातमी काय असेल ती तुमच्या माहितीसाठी व्हॉट्सॲपवरती पाठवून ठेवतो. आणि दुसऱ्या दिवशी सगळ्या वृत्तवाहिनीवर ब्रेकिंग न्यूज म्हणून जशीच्या तशी बातमी आली. त्या ११ मुलांनी कानपूरमधून सोशल मीडियावर बातमी सुरू केली. मुलायमसिंग यादव यांनी अखिलेश यांच्या गालावर थप्पड माराली. दुपारी साडेचार वाजता अखिलेश यादव धावत धावत टीव्हीसमोर आला. माझी आणि मुलायमसिंग यांची भेटच झाली नाही मग मला थप्पड कशी मारली? मग मुलायमसिंग यांनीही मी अखिलेशला भेटलोच नाही असे सांगितले. पण तोपर्यंत सगळ्या टीव्ही वाहिन्यांवर दाखवले, क्या सच में मुलायमसिंगने अखिलेश को मारा? ही ताकतय सोशल मीडियाची. त्यामुळे सोशल मीडियातील समजून घेतला पाहिजे.

मला बरेचदा असं वाटतं की, आपण भारताचा सोशल डीएनए समजून घेतला पाहिजे. भारताचा सोशल डीएनए अन्य देशांच्या डीएनएपेक्षा वेगळा आहे. तुम्ही जर सोशल मीडियाचे, फेसबुकचे अधिक अधिक मल्टीप्लाय झालेले व्हिडिओ अपलोड झालेले असतील तर तुमच्या असे लक्षात येईल. तुम्ही अभ्यास करत असाल तर तोच व्हीडिओ समाजामध्ये गतीने प्रसारित होतो ज्याचे प्रतिबिंब बरोबर असते. तुम्ही कुठलाही व्हिडिओ घ्या. बैलबंडीच्या चाकाखाली एखादी म्हातारी रडते आहे, व्हिडिओ टाका. ३५ मिनिटांत 35 हजारांपर्यंत जातो आणि त्याच बाईच्या संदर्भातील एक कामाच्या आकडेवारीचा टाका २५ माणसे पण बघत नाहीत. काय कारणय? भारताचा सोशल डीएनए हा इच बेस आहे. म्हणजे आपण जर घराच्या बाहेर पडलो. तुम्हाला शिवी दिली. तू भिकारी, भिकारचोट आहे. जी तुमच्या आर्थिक स्थितीशी संबंधित आहे. पण त्याच व्यक्तीने तुम्हाला तुमच्या आईवर शिवी दिली. ए एक मिनिट.. आईवर शिवी द्यायची नाही. का? कदाचित त्याने आई लहानपणी बघितली पण नाही. आपल्या भारतामध्ये आपण घराबाहेर पडलो. महिला भेटली, आपण मावशी म्हणतो. ती मावशी आहे आपली? कारण आपला सोशल डीएनए इको बेस आहे समजून घ्या. ना इंग्लंड, ना अमेरिका, फ्रान्स, ना रशिया, टोरांटो, तिथे माणसांना जेंटलमेन म्हणतात. भारतात मावशीय. ओ बाबा थांबाना.. तो बाबाय का? कारण भारताचा सोशल डीएनए इच बेस आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास बघा. काय केलं होतं इंग्रजांनी.. तुमच्या खिशात हात टाकले. मी आठव्या वर्गात धडा वाचलाय.. व्यापारी म्हणून आले आणि राज्यकर्ते बनले. पण स्वातंत्र्याच्या आंदोलनात एकाही भारतीय नेत्याने भाषण भारतमातेवर आर्थिक आक्रमणय असे नाहीय, भारत माता बंदिस्त झाली. ने मजसी परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला... भगतसिंगने जीव दिला. बटूकेश्वरने दिला, चाफेकर बंधू फासावर गेले. काय कारण होते, ते आंदोलन इच बेस होते. कुठलेही आंदोलन घ्या, हिंदुस्तानमधल्या इतिहासातील कोणतीही चळवळ कुठलेही आंदोलन इच बेसय. आता रामजन्मभूमीचे आंदोलन झाले. मला कधी कधी वाटतं मी स्वयंसेवक आहे. गावागावात काय राममंदिर नव्हते का? पण अख्खा देश पेटून उठला, अस्मितेचे जागरण केले. अस्मिता ही इमोशन बेस आहे. भारताचा सोशल मीडिया समजून घ्यायचा असेल तर सोशल डीएनए समजून घेतला पाहिजे. भारताचा सोशल डीएनए हा इको बेस नाही, इच बेस आहे. तुम्ही जर दिवसभर ट्रेनिंग घेत असाल तर हे समजून घेतले पाहिजे. या सगळ्यांचा बेस, आधार इमोशन आहे.

अजून एक सांगायचे आहे. तुम्ही सर्व प्रिंट मिडियाचे पत्रकार आहात.. दर्पणकार जांभेकर शास्त्रीपासूनचा प्रवास, इतिहास समृद्ध आहे. इतकं मोठं वय प्रिंट मिडियाचं. ही विश्वासार्हता आहे. त्यामुळे मला आनंद झाला की, प्रिंट मीडियाच्या लोकांनी सोशल मीडियाचा विचार करायला चालू केलं. म्हणजे मोठ्या भावाने छोटया भावाची काळजी घेण्यासारखे आहे. सोशल मीडिया सध्या विश्वासार्हतेच्या संकटातून जात आहे. कुठली पोस्ट टाकली तर ती ट्विटरवर कोट करावी का याची भीती वाटायला लागलीय. सोशल मीडियाची ताकद मोठीय पण विश्वासार्हता कमीय.. प्रिंट मीडियाची ताकदही मोठीय आणि विश्वासार्हताही. तुम्ही प्रिंट मीडियाच्या लोकांनी सोशल मीडियाला आपल्या लहान भावाप्रमाने बघण्याची गरज आहे. त्याची काळजी घेण्याची आवश्यकताय. त्याला गाईड करण्याची आवश्यकताय. वेळ पडली तर त्याच्या कानाखाली लावण्याची आवश्यकता आहे. कारण त्याचं आयुष्य कमीय. आता जन्माला आलंय.. जे बाळ आत्ताच जन्माला आलंय.. त्याच्या घरातील मोठ्या भावांनी काळजीने बघण्याची गरज आहे. ते बिघडलं नाही पाहिजे. मला अजून एक गोष्ट सांगायची आहे. प्रामुख्याने आपण सगळे लोक ग्रामीण भागातील पत्रकार. पत्रकारिता करतो. मला एका गोष्टीबद्दल पूर्ण विश्वासय. की महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनामध्ये जर अजेंडा सेट करावयाचा असेल.. मुंबईतले पत्रकार, पुण्यातले पत्रकार यांच्याबद्दल आनादर नाहीय. त्यांचा अत्यंत आदर करतो. मी त्यांना वर्षानुवर्षे भेटतो, पिढ्यानपिढ्या.. अत्यंत मिशनने करणारी काम करणारे पत्रकार आहेत. पण जर महाराष्ट्राचा अजेंडा सेट करावयाचा असेल तर ते फक्त तुम्हीच करू शकता. बाकी नाही करू शकत. आजच्या या सोशल मीडियाच्या प्रशिक्षणाच्या निमित्ताने मी एक आपणाकडे विनंती घेऊन आलोय.

माननीय, वसंतजी यांनी माझ्यावर जबाबदारी टाकलीय, की तुम्ही पत्रकारांचा विषयातले पालकत्व घ्यावे, मी अत्यंत नम्रपणे आणि तुम्ही श्रीकांत भारतीय बद्दल विचारून घ्या. मला खोटं बोलण्याची सवय नाही.

माझा स्वभाव नाही. माझा संस्कार नाही. पण वसंतजी, तुम्ही म्हणता की, या विषयातले पालकत्व घ्यावे. पालकत्व घेण्याच्या खरचं स्थितीत नाही. तुमच्या खांद्याला खांदा लावून , पावलावर पाऊल ठेवून हा विषय सभागृहात मांडेल. माझा स्वभाव फक्त सभागृहात विषय मांडण्याचा नाही, तो रेटून नेण्याचा सुद्धा आहे. सक्रियपणे कार्यकर्ता म्हणून मी तुमच्या सोबत काम करेन. कारण मी पण पत्रकार म्हणून काम केलेय. आज मी तुमच्यासमोर माझा स्वतःचा एक अजेंडा घेऊन आलोय. माझ्याबद्दल अगोदर माहिती दिली की, मी अनाथांमध्ये काम करतोय. समाजातील दानत खूप मोठी आहे. मी आज तो विषय मांडणार नाही. मी मांडलेल्या सर्व लक्षवेधीवर सभागृहात, महाराष्ट्रात चर्चा झाली. पण एक मागणं घेऊन मी आज तुमच्याकडे आलोय. मी विधान परिषदेत लक्षवेधी मांडली. मी तीन महिन्यांपूर्वी माझ्या गावात गेलो होतो. माझे गाव अमरावती जिल्हयात सातपुड्याच्या पायथ्याशी. कुऱ्हा नावाचे गाव आहे. माझ्याकडे माझी स्वतःची आठ एकर शेती आहे वडिलोपार्जित सोडून. आमचं एकत्र कुटुंबय.. माझा ७ व्या क्रमांकाचा भाऊ माझ्याकडे आला. तो म्हणाला, आपल्या बँकेच्या अकाऊंटमध्ये ३० हजार रुपये आले आहेत. म्हणालो कशाबद्दल? सोयाबीनचे नुकसान भरपाई. मी म्हणालो, का घेतली नुकसान भरपाई ? तो म्हणाला, दादा घ्यावीच लागते नुकसान भरपाई. एकदा तलाठी, तहसीलदाराने रिपोर्ट दिला की, तेवढे पेमेंट तुमच्या बँकेत डायरेक्ट येऊन दाखल होतात. मी त्याला म्हणालो जोपर्यंत मी आमदार आहे तोपर्यंत सरकारचं कुठलही अनुदान आपल्याला नकोय. मी अमरावतीला आलो. जिल्हाधिकारी यांना पत्र दिले. मला हे अनुदान नकोय, मी परत करू इच्छितो. ते तुम्ही परत घ्या. जिल्हाधिकारी म्हणाल्या, इतकी वर्षे मी प्रशासनात काम करते, पहिल्यांदाच अनुदान परत घ्या असे पत्र आले आहे. अन्यथा अनुदान कमी मिळाले, वाढीव द्यावे अशीच मागणीची पत्रं येतात.पण भारतीय सर, अनुदान परत घेण्याची कोणतीही व्यवस्था आपल्याकडे नाही. याबाबत मी विधान परिषद सभागृहात प्रश्न विचारला. लक्षवेधीमध्ये मी म्हटले, माझा समाजातील चांगुलपणावर पूर्ण विश्वास आहे. ज्या व्यक्तींना वाटते की, मला मिळालेले अनुदान परत करावयाचे आहे त्यांना परत करता आले पाहिजे. आणि माननीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सभागृहात उत्तर दिले, दोन महिन्यांमध्ये आम्ही सर्व विभागात ज्याला मिळणारे अनुदान, मदत, आरक्षण आणि सवलत परत करण्याची इच्छा असेल, ती व्यवस्था उपलब्ध करू.

मित्रहो, व्यवस्था उपलब्ध होईल, तो तांत्रिक भाग आहे. पण आपली ओंजळ भरलीय ना.. दोन फुलं देता आली पाहिजे. मला विश्वास यासाठी आहे.. माननीय पंतप्रधान नरेंद भाई मोदी यांनी घोषित केलं की, ज्यांना अनुदान नकोय, गॅस सिलिंडरवरचे त्यांनी परत करा...महाराष्ट्रात पहिल्याच वेळी १६ लाख ५२ हजार लोकांनी अनुदान परत केलं. समाजातील चांगुलपणाला आवाहन करावे लागेल, मला अभिमानाने सांगावेसे वाटेल, महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असेल, की जिथे मिळालेले सोडून देण्याची सुविधा असेल. मला आवाहन करावयाचे सगळ्या लोकांना मी दोन महिन्यानंतर महाराष्ट्रात सोडून देण्याचा अधिकार जगण्याचा आनंद याचं अभियान सुरू करतोय, माझी इच्छाय.. तुम्ही या संकल्पनेला अभियानात बदलू शकता. तुमची ताकदंय ती.. तुमच्यात हिंमतय, तुमच्यात दानतंय आहे. मला विश्वास काय? मी जेव्हा तीस हजार रुपये परत करण्याचे पत्र दिले. तेव्हा प्रवीण दटकेंना कळले. प्रवीणने माझ्यासमोर जिल्हाधिकारी यांना फोन केला, मी सुद्धा अनुदान परत करतो. मी घरी आलो तर सीपी मला भेटायला आले. म्हणाले, श्रीकांतजी खूप मोठी संधी आहे. मलाही मिळालेले ३५ हजार परत करायचे आहेत. माननीय अजिदादांना सांगितले, लोकांना आपण आवाहन करू. सधन शेतकरी अनुदान परत करतील तो पैसा आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या, महिलांच्या आरोग्यावर खर्च करू. एखादी मुलगी फी परत करेल, तो पैसा आदिवासी मुलींच्या स्वच्छतागृहासाठी आम्ही वापरू. तेव्हा समाज पुढे येईल. सोडण्यात एक आनंदय. पण यासाठी आपल्या महाराष्ट्रात असं एक अंगण असू शकतंय.. तर आपण आपल्या अंगणात पेरलेला प्राजक्त अख्ख्या देशभर जाऊ शकतो. हे मागणं घेऊनच खरं तर आज इथं आलोय. माझा स्वार्थ होता इथं येण्यामध्ये. म्हणजे लाडझरी सारख्या छोट्याशा गावात जन्माला आलेला वसंत इतका गजब बहरलेला आहे. पण या बहरलेल्या सर्व वसंतांनी ही चळवळ, जन अभियान आणि पवित्र अभियानात यावे. माझे घर वारकरी संप्रदायाचे आहे. माझी चौथी पिढी वारी करतेय... आमचे वडील नेहमी असं म्हणतात की, संकल्पामध्ये पवित्रता असेल तर ईश्वर पाठीशी उभा राहतोच. आपली इतकी ताकदंय की अख्खी ताकद आपण आपली महाराष्ट्राचा चांगुलपणाच्या भूमीवर उतरवूया.. मला पूर्ण विश्वासय. मी अनुभवलेय. जेव्हा माझ्या मुलीने मुलींना अपील केले, सर्व मुलींनी सांगितले, आपण पैसे देऊन शिकूया. पण हे सर्व अभियान खालून वरपर्यंत उचलावे लागणार आहे. मला याची कल्पनाय, खूप जणांची यामुळे पंचाईत पण होणारय. कारण ज्या वेळेस एक वर्षानंतर महाराष्ट्राच्या टेक्निकल टर्म्समध्ये कोणी कोणी, किती किती परत केले याचा हिशेब होईल न, मी नाव घेणे बरोबर नाही. माझ्याबरोबर विधान परिषदेचे सधन आमदार आहेत. मला म्हणाले, श्रीकांतजी विषय तर खूप चांगलाय. पण वर्षभरात जो हिशेब होईल, तेव्हा थोडी अडचण होईल. कधी कधी चांगुलपणाचं प्रेशर समाज नीट होण्यासाठी गरजेचं असतं. चांगुलपणाचं प्रेशर लागतं. पावित्र्याचं प्रेशर लागतं. चारित्र्याचं प्रेशर लागतं. आणि प्रेशर JOY OF GIVE UP मधून येतं. देण्यातनं येतं. या सगळ्या अभियानामध्ये तुम्ही सगळे साथ द्याल, असं तुम्हा सगळ्यांना आवाहन करतो. वसंतजी, तुम्ही मला बोलवलंत.. व्यासपीठावर, खाली एवढी तगडी माणसं आहेत. देवाजवळ काय मागायचे हे वारकरी संप्रदायाने सांगून ठेवले आहे. हेचि दान देगा देवा
तुझा विसर न व्हावा..
पण तुकोबांना माहीत होतं.. हे काहीतरी मागणारंय.. शेवटी म्हटले,
न लगे मुक्ति धन संपदा ।
संतसंग देई सदा ॥
तुका म्हणे गर्भवासी ।
सुखें घालावें आम्हांसी ॥

आज दोन अडीच तासांच्या कालावधीत हा संतसंग उपलब्ध करून देण्याची संधी वसंतजी तुम्ही दिली, त्याबद्दल सर्वांचे विनम्रतेने खूप खूप आभार मानून इथेच थांबतो. धन्यवाद.



# अनिल देशमुखांचा भाजपावर गंभीर आरोप

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या काळात गृहमंत्री असताना पदाचा गैरवापर करून आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप अनिल देशमुखांवर आहे. १०० कोटी रुपयांच्या खंडणीप्रकरणी त्यांना जेलवारीही झाली होती. आता याप्रकरणात अनिल देशमुख यांनी मोठा आरोप केला आहे. भाजपाला लक्ष्य करत त्यांनी आरोप केला आहे.

भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांचा समझोता करण्यासाठी दबाव होता. समझोता करण्यास नकार दिला, त्यामुळे परमवीर सिंग यांना माझ्यावर खोटे आरोप करायला लावले आणि माझ्यावर कारवाई करायला लावली, हे शंभर टक्के खरे आहे. ज्या पद्धतीने माझ्यावर दबाव होता, मी सरळ सांगितलं की मी कोणत्याही पद्धतीने समझोता करणार नाही आणि त्याच्या दुसऱ्याच दिवशी माझ्यावर रेड पडली. माझ्यावर कारवाई करण्यात आली, ही वस्तुस्थिती आहे, अशी धक्कादायक माहिती अनिल देशमुखांनी आज दिली. माध्यमांना दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

# अवैध पॅथॉलॉजी लॅबवर कारवाई कधी ?

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** राज्यात महाराष्ट्र पॅरावैद्यक अधिनियम २०११ अस्तित्वात आहे. त्या नियमाच्या तरतुदीनुसार महाराष्ट्र पॅरावैद्यक परीक्षेत मुंबई ( महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल ) ची स्थापना संविधानिक रित्या झालेली आहे. अधिनियमातील तरतुदीप्रमाणे प्यारा वैद्यकीय विषयांमध्ये पदवी/पदवीका उत्तीर्ण उमेदवारांच्या नोंदणीसाठी विचार करण्यात येतो विद्यापीठे अनुदान आरोग्य राज्यातील शासनमान्य मान्यताप्राप्त विद्यापीठे, मुक्त विद्यापीठ, अभिमत विद्यापीठ आणि शासनमान्य महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, एआयसीटीई पदवी, पदविका प्राप्त केलेल्या उमेदवारांची व्यावसायिक व्यक्ती म्हणून महाराष्ट्र पॅरावैद्यक परिषद नोंदणी देणे मात्र जिंतूर शहर व तालुक्यात काही खाजगी अनधिकृत वैद्यकीय प्रयोगशाळा ( लॅब ) तंत्रज्ञ यांनी आपले दुकाने मांडून बिनधास्तपणे कायद्याचा धाक न जुमानता अवैध पणे प्रयोगशाळा ( लॅब ) अनधिकृत तंत्रज्ञ पॅरावैद्यक व्यवसाय करीत आहे. त्यांच्याजवळ कोणतीही पॅरावैद्यक अर्हता संबंधित पदविका पदवी नसून महाराष्ट्र पॅरामेडिकल कौन्सिल मध्ये नोंदणी सुद्धा नाही जिंतूर शहर व ग्रामीण भागात राजरोसपणे लॅब चालून रुग्णांच्या जीवाशी खेळून त्यांची आर्थिक लुट करीत आहेत. काही अनधिकृत तंत्रज्ञांनी तर एक युक्ती शोधून नोंदणीकृत व्यक्तीचे नाव त्यांच्या लॅबोरेटरीच्या ही फलकावर लेटरहेडवर सर्रासपणे वापरून रुग्णांच्या रक्त लघवी यांच्या चाचण्या करून अहवाल संबंधित दवाखान्यात देत आहे.
"काही लॅब धार अक्षरात एमडी पॅथॉलॉजी चे नाव रिपोर्टवर वापरून रुग्ण तपासणी करत आहेत वास्तविक त्या ठिकाणी ते पॅथॉलॉजिस्ट उपस्थित नसतात या अश्या कारणांमुळे धारक काही डॉक्टरांना गल्ले लठ्ठ डिपॉझिट तसेच भरगच्च कमिशन देऊन एक प्रकारे रुग्णांची लूट



**जिंतूर शहरात 23 क्लिनिक लॅब मान्यता फक्त पाच लॅब चालकांकडे**

शहरात आज जवळपास 23 क्लिनिक लॅब प्रयोगशाळा असून त्या ठिकाणी रुग्णांच्या रक्ताची, लघवीची तपासणी केली जाते . गल्ली गल्ली पैसे कमवण्यासाठी या प्रयोगशाळा उघडण्यात आले असून यापैकी फक्त पाच प्रयोगशाळा तंत्रज्ञाकडेच महाराष्ट्र पॅरावैद्यकीय परिषद मुंबई यांची नोंदणी असल्याची अधिकृत माहिती आहे . या बोगस प्रयोगशाळा तंत्रज्ञांच्या मनमानी कारभाराने रुग्णांच्या जीवाशी खेळ होत असल्याने अवैध प्रयोगशाळा तंत्रज्ञान वर कोण कारवाई करणार ? असा प्रश्न जनतेला पडला आहे .

करून धंदा करत आहे या अशा कारणांमुळे या लाभधारकाकडे लॅबचा अनुभव स्किल असूनही पैशाअभावी मागे राहावे लागत आहे. काही डॉक्टर तर कमिशन साठी गरज नसतानाही रक्त नमुना तपासणीसाठी आग्रही असतात व त्यात भरडला जातोय तो गरीब व सामान्य रुग्णधारक हे कुठंतरी थांबावं व आरोग्य ही जनसेवा म्हणून राहावी धंदा म्हणून नाही.
ज्यांच्या नावाने लॅब नोंदणीकृत झालेली असते ती व्यक्ती लॅब मध्ये उपस्थित असणे बंधनकारक असतानाही हजर न राहता अर्हता प्राप्त व्यक्ती आपले नाव नोंदणी नसताना संबंधित व्यक्तीला देऊन नागरिकांच्या जीवाशी खेळ करत आहे. हे अतिशय गंभीर बाब आहे पॅरामेडिकल कौन्सिल मध्ये नोंदणीकृत नसलेल्या व्यक्तींनी आरोग्य प्रशासन कायद्याचे कोणताही धाक न बाळगता बेकायदेशीर रित्या लॅब टाकले आहेत त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हावी यासाठी जनतेतून मागणी केली जात आहे.




# काँग्रेसच्या नवनिर्वाचित वार्ड अध्यक्षांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** काँग्रेस पक्षाच्या वतीने दिनांक 20/ 8 /2023 श्रीराम नगर हनुमान मंदिर फुलंब्री विधान सभा मतदारसंघातील दहा वार्डातील वार्ड अध्यक्ष निवडीसाठी युवक काँग्रेस महिला काँग्रेस ज्येष्ठ काँग्रेस असे विविध पदासाठी बैठक घेण्यात आली यावेळी नवनिर्वाचित वार्ड अध्यक्षांची निवड करून त्यांच्या सत्कार करण्यात आला. या काँग्रेस पक्षाचे जिल्हा अध्यक्ष डॉ. कल्याण काळे,शहर अध्यक्ष युसुफ लीडर, युवक काँग्रेस जिल्हा अध्यक्ष वरून पथ्रीकर ओबीसी जिल्हा अध्यक्ष अतिश पितळे, युवक काँग्रेस शहर अध्यक्ष नागरे, महिला शहर अध्यक्ष दिपाली मिसाळ, ओबीसी शहर अध्यक्ष अनिल माळोदे, अनुसुचित जाती शहर अध्यक्ष अरुण शिरसाठ, एन. एस. यू. आय. शहर अध्यक्ष मोहित जाधव, गटनेता भाऊसाहेब जगताप, राहुल सांवत, अशोक डोळस, अंकुशराव चौधरी सुभाष पांडभरे पाटील सुभाष शुक्ला, चंद्रमुनी काळे, कांता रणभरे, राजू मगरे अमजद खान इबबु घाशी, मगरे अंकल, प्रकाश सानप, सुरेश हिवराळे यांच्या उपस्थित हा सोहळा पार पडला या वेळी श्री राम नगर वार्ड अध्यक्ष पदी माणिकराव सोळंके, ओबीसी अधक्ष्य पदी गोविंद चव्हाण,महिला वार्ड अध्यक्षपदी उषाताई सलगर, वार्ड युवक अध्यक्षपदी हेमंत नरवडे, अनु जाती वार्ड अध्यक्षपदी भानुदास पुवटकर, युवक शहर सरचिटणीसपदी अमोल संकपाकळ, ओबीसी शहर उपाध्यक्षपदी कौतिक मोंडले, युवक शहर सचिवपदी कल्याण लीपणे पाटील, प्रकाश नगर पश्चिम शाखा अध्यक्षपदी अरुण नवले, अनु जाती शाखा अध्यक्षपदी राजू इंगळे, युवक काँग्रेस रामनगर शाखा अध्यक्षपदी श्री सतीश पवार, महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीसपदी बागुल मावशी, विठ्ठल नगर वॉर्ड अध्यक्षपदी राजपूत भैया, विठ्ठल नगर युवक काँग्रेस वार्ड अध्यक्ष सुमित चौधरी , पदी बापू सोनवणे प्रकाशनगर शाखा अध्यक्ष पदी संतोष सोनटक्के आदींची निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात आले.

# जागतिक छायाचित्रण दिनानिमित्त बोरीत फोटोग्राफरचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** जागतिक छायाचित्रण दिनाचे औचित्य साधून आज 19 ऑगस्ट रोजी बोरी येथील कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने बोरीतील फोटोग्राफरचा सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. संतोष तायडे या जेष्ठ फोटोग्राफर चा पहिला सत्कार जैन वाचनालयाचे उपाध्यक्ष पवनकुमार ओझा, संचालक दिपक राजूरकर, श्रीकांत सोमाणी, ग्रंथपाल नेमिनाथ जैन, सखाराम सोगे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी चिंतामणी कंठाळे, भगवानराव कदम, बालाजी कंठाळे यांची उपस्थिती होती. बोरी येथील फोटोग्राफर विष्णू तायडे, अमोल वडवाले, जगन्नाथ चौधरी, रमेश चालमोठे, बाळू तायडे, अंगद घाटूळ, भगवान जीवने यांचाही सत्कार त्यांच्या फोटो स्टुडिओत जाऊन करण्यात आला. हजार शब्दात जे सांगता येत नाही, त्यापेक्षा अधिक आशय एक समर्पक छायाचित्र सांगते. शब्दात लिहिता येत नाही तसेच जे बोलण्यातून व्यक्त होत नाही अशा अनेक छायाचित्रांना आपण बोलके केले.





# जवानास ध्वजारोहणापासून ठेवले वंचित

आधुनिक केसरी न्यूज

**मलकापूर :** तालुक्यातील शिराढोण येथील भारतीय सैन्यदलात सैनीक म्हणुन तुषार वसंत ईखारे मागील कित्येक वर्षांपासुन कार्यरत आहे. ते घरी सुट्टीवर आले असता ध्वजारोहणाच्या दिवशी सरपंच व उपसरपंच यांनी जातीय द्वेष भावनेतून भारतीय सैनिकाला आमंत्रित न करताच केले. देशाची सेवा करीत भारतीय सैनिक तुषार वसंत ईखारे हे शिराढोण येथे रजेवर आले असता दि.१५ रोजी गावात ग्रामपंचायत कार्यालय येथे ध्वजारोहनाचा कार्यक्रम होता. तर शिराढोण येथील सरपंच उज्वला मनीष पाटील, उपसरपंच पद्मिनी रघुनाथ नारखेडे, शारदा वराडे, बादल पाटील, सुरेश राठोड ग्रामसेवक, सुरेश प्रल्हाद पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष, निराजी पाटील तंटामुक्ती, प्रकाश पाटील शिक्षण समिती, विनोद पद्माकर पाटील, पोलीस पाटील यांनी मागासवर्गीय समाजाचा असल्याने ध्वजारोहनाच्या कार्यक्रमात हेतुपुरस्पररित्या एका भारतीय सैनिकाला या महान कार्यक्रमात आमंत्रीत केले नसल्याची तक्रार तहसीलदार राजेश सुरडकर यांच्याकडे केली आहे. तर मी देश सेवेच्या महान कार्य माझ्या हातुन निरंतरपणे घडत आहे. तरी अप्रत्यक्षरीत्या एका भारतीय सैनिकाचा अवमान केला तर याबाबतची विचारणा करण्यासाठी गेले असता भारतीय सैनिकाच्या मातेचा देखील अपमान केला आहे. तर शिराढोण जातीवादी ग्रामपंचायत योग्य ती कारवाई करण्यात यावी जेणेकरून यापुढे या ग्रामपंचायत कार्यालयामध्ये कोणत्याही भारतीय सैन्याचा अवमान होणार नाही असे म्हटले आहे.

# जिंतूर आरोग्य ग्रामीण रुग्णालयात सीएस लुखमवार यांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** विविध ग्रामीण भागातून येणारे रुग्ण आरोग्य ग्रामीण रुग्णालयात उपचारसाठी येत असतात. सी.एस. लुखमारे यांनी अचानक भेट दिली असता जिंतूर आरोग्य ग्रामीण रुग्णालयात झालेल्या घानीचे सम्राज्य निदर्शनास आले असून जनरल बाथरूममध्ये कचरा, सलाईन, सुई, बाटली ड्रम घनकचरा पडलेले अवस्थेत असल्याने रुग्णांना बाहेर जाण्याची वेळ येत आहे. वेळेच बंधन नाही. ड्रेसिंग डॉक्टर लेडी डॉक्टर परिचय कार्ड वापरत नाही. डिलिव्हरी पेशंटची निष्काळजीपणे डॉक्टर पाहणी करत नसल्या मुळे पेश्टचा जीव दगावल्यास याचा वाली कोण? वैद्यकीय अधीक्षक नावलाच का? रुग्णालयवर वैद्यकिय अधिषक अजिबात लक्ष देत नाही व सर्व सिस्टर, डॉक्टर यांची हलगर्जी दिसून आली. जनरल टॉयलेट बाथरूम मध्ये पडलेले पॉकेट, कचरा, सलाईन बॉटल, इंजेक्शन अति दक्षताप्रमाणे वापर दिसून आल्यामुळे सीएस साहेबांनी यावर डॉक्टर चांडसे साहेबांना वार्निंग देता सांगितले असे दुसऱ्या वेळेस आलो तर जमणार नाही केव्हा ही रात्री बेरात्री येऊन पाहणी करणार असे वरीष्ठ अधिकारी यांनी सुनावले.

# वाशी तालुक्यातील विविध गावांत सारथीविषयी मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**वाशी :** येथील एम. के. सी. एल. चे अधिकृत केंद्र हायटेक कॉम्प्युटरच्या वतीने वाशी तालुक्यातील विविध गावातील ग्रामसभेमधे सारथी विषयी माहिती देण्यात आली. सारथी ही महाराष्ट्र शासनाची संस्था असून ती मराठा समाजातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी काम करते. छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था पूणे ही महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था आहे. याचं संस्थेचे थोडक्यात नांव सारथी आहे. या संस्था मराठा, कुणबी, मराठा - कुणबी व कुणबी -मराठा या समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी नियोजन समितीच्या अधिपत्याखाली काम करते. ही संस्था संघ लोकसेवा आयोग, महाराष्ट्र लोकसेवा आयोग या परिक्षेचे प्रशिक्षण घेण्यासाठी मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आर्थिक मदत करते. या बरोबरच इतर स्पर्धा परिक्षा, पी. एच. डी., कॉम्प्युटरचे विविध कोर्स, शिष्यवृत्ती ,कृषी संबंधित योजना व इतर उपक्रम यासाठीही अर्थसाह्य करते. वाशी येथे एम. के. सी. एल. चे हायटेक कॉम्प्युटर हे केंद्र आहे. या केंद्राच्या वतीने वाशी सायली जगताप, वैष्णवी उंदरे, स्वरुपा कवडे, सायली कवडे, प्रिती चौधरी या मुलींनी तालुक्यातील दसमेगांव, सरमकुंडी, तांदुळवाडी, पारा व पारडी या गावमधे जाऊन तेथील ग्रामसभेमधे सारथीच्या विविध योजनांची माहिती दिली. सारथी हे मराठा समाजासाठी कसे उपयुक्त आहे, याच्या माध्यमातून आपण आपली उन्नती कशी साधू शकतो हे पटवून सांगितले. या कामी हायटेक कॉम्प्युटरचे संचालक श्री दिपक निर्मल यांचे या मुलींना मार्गदर्शन लाभले. या कॉम्प्युटर केद्रामधे सारथीच्या वतीने कॉम्प्युटरचे विविध कोर्सेस शिकवले जात आहेत. मराठा समाजातील विद्यार्थ्यांनी या बाबीचा लाभ घेऊन मोफतमधे कॉम्प्युटरचे विविध कोर्सेस शिकावेत असे अवाहन ही दिपक निर्मल यांनी केले आहे.

# भिक्षा मागणारा भोंदू बाबा ताब्यात !

## अंधश्रद्धेला बळी पडू नका पी. आय. घोटेकर यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** देवपूर पोलीस स्टेशनची शातीर कामगिरी करण्यात आली. भिक्षा मागणारा आरोपी भोंदू बाबाला अटक करून त्याचे कडून सोन्याचे दागिने व मोटरसायकल असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

फिर्यादी महिला नामे किरण जडे व साक्षीदार तिचे पती आणि मुलगा असे घरात असताना दिनांक 29. 6 .2023 रोजी सकाळी साडेदहा वाजेच्या सुमारास आरोपी अनोळखी भोंदू बाबा साधूच्या रुपात भिक्षा मागण्यासाठी व भविष्य सांगण्याच्या बहाण्याने फिर्यादीकडे गेला व फिर्यादीने भविष्य बघण्यासाठी घरात बोलवले व पाणी दिले. तेव्हा आरोपीने फिर्यादी व तिचे पती यांना सांगितले की तुमचे सगळे चांगले करतो असे सांगून हात चलाकी करून हातात कुंकू व तांदूळ घेऊन त्याची विभूती राख करून दाखविली नंतर मंत्र उच्चार करून महादेवाची छोटी पिंड प्रकट करून दाखवली व तुमच्याकडून मला काहीच नको, मी सोन्याची पूजा करून मंत्र मारून तुमचे परीक्षा घ्यायला आलो आहे, असे सांगून तुमच्या अंगावरील सोने द्या, सोबत नेणार नाहीत व संध्याकाळी जेवणासाठी तुमच्या घरी येतो तुमच्या सोन्याची पूजा करून मंत्र मारून परत देतो व तुम्ही ते सोनं परिधान केल्यानंतर तुमचे सगळे कल्याण होईल व सुखी राहाल असे सांगून विश्वास संपादन करून फिर्यादीने भोंदू बाबाच्या सांगण्याप्रमाणे त्याच्याकडे सोन्याचे तीन ग्राम वजनाचे कानातील टाप्स व सहा ग्रॅम वजनाचे मंगळसूत्र असा एकूण 18 हजार रुपयांचे सोन्याचे दागिने दिले व नंतर फरार झाला. संध्याकाळी जेवणासाठी वाट बघितली परंतु तो आलाच नाही. त्याचे नाव,गाव, पत्ता माहीत नव्हते. अशा प्रकारे फिर्यादीची फसवणूक करून विश्वासघात करून भोंदू बाबा आरोपी फिर्यादीचा वर नमूद मुद्देमाल घेऊन गेला व तेव्हापासून तो फरार होता. सदरबाबत देवपूर पोलिस स्टेशन येथे अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा रजिस्टर नंबर 226/2023 भादंवि कलम 420, 406 प्रमाणे दाखल होता.

गुप्त बातमीदार मार्फत माहिती काढून त्याचे कडून वर नमूद प्रमाणे सोन्याचे दागिने व त्याचे ताब्यातील गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल असा एकूण 68 हजार रुपये किमतीचा मुद्देमाल आरोपीचे ताब्यातून जप्त करण्यात आला आहे. आरोपी भोंदू बाबा नामे नारायण किसन चव्हाण, वय 35, धंदा भिक्षा मागणे व भविष्य सांगणे, राहणार ओझर खुर्द, तालुका जामनेर, जिल्हा जळगाव, यास अटक करण्यात आली आहे. अधिक माहिती घेतली असता त्याचे विरुद्ध जामनेर जिल्हा जळगाव येथे भादवि कलम 326 व इतर कलमाने गुन्हे दाखल आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक संजय बारकुंड साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक किशोर काळे साहेब, मा. सहाय्यक पोलीस अधीक्षक एस. ऋषिकेश रेड्डी यांचे मार्गदर्शनाखाली देवपूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सतीश घोटेकर व त्यांचे डीबी पथकाचे अंमलदार पोलीस हवालदार पंकज चव्हाण, पोना. विश्वनाथ शिरसाट, पोलीस कॉन्स्टेबल किरण सावळे, सागर थाटसिंगारे, सौरभ कुठे यांचे पथकाने केली आहे.

# मुंबई-पुणे महामार्गावर भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** मुंबई-पुणे महामार्गावर भीषण अपघात झाला आहे. पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारा कंटेनर विरुद्ध बाजूच्या लेनवर पलटी झाल्याने पाच वाहनांचा विचित्र अपघात झाला आहे. या अपघातात एका कारचालकासह महिलेचा जागीच मृत्यू झाला आहे. तर संबंधित कारमधील इतर दोन महिला गंभीर जखमी झाल्या. जखमी महिलांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार, अपघातग्रस्त कंटेनर (एमएच-४६, एआर ०१८१) पुण्याहून मुंबईच्या दिशेने जात होता. यावेळी चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कंटेनर विरुद्ध लेनवर जाऊन पलटी झाला. यावेळी समोरून येणाऱ्या इतर पाच वाहनं बाधित झाली. यामध्ये एका सुझुकी डिझायर कारचा (एमएच-४८, ए ६५१२) चक्काचूर झाला.या भीषण अपघातात कार चालकासह एका महिलेचा जागीच मृत्यू झाला. तर कारमधील इतर दोन महिला जखमी झाल्या. दोन्ही जखमी महिलांना कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे.



# श्रीक्षेत्र सावळेश्वर देवस्थानाला यात्रेचे स्वरूप

## श्रावणात दररोज भाविकांची अलोट गर्दी

आधुनिक केसरी न्यूज

**सुरेश बोकील**

**पीरबावडा :** फुलंब्री येथून आठ ते नऊ किलोमीटर असलेले व मारसावळी व नांदखेडा या गावाच्या मधोमध डोंगररांगांत असलेले अतिशय प्राचीन देवदरीतील श्री सावळेश्वर महादेव मंदिरात श्रावण महिन्यात यात्रेचे स्वरूप आलेले पाहायला मिळत आहे. अतिशय निसर्गरम्य ठिकाणी देवदरी हे धार्मिक तीर्थक्षेत्र असून जिल्ह्यासह मराठवाड्यात अतिशय प्रसिद्ध असून बरेच भाविक वर्षभर या ठिकाणी देवदर्शनासह पर्यटनासाठी येतात तर श्रवण महिन्यात तर येथे यात्राचे स्वरूप पाहायला मिळते व अनेक भाविक येथे भांडाऱ्याचे आयोजन करतात तर इतर दिवशीही ही रेलचेल पाहायला मिळते.

जेंव्हा लव अंकुश जन्मानंतर श्रीराम व लक्ष्मण सीतामाता यांना आणण्यासाठी आले तेव्हा याच ठिकाणी या तीन देवतांनी भगवान शंकर यांची पूजा केली. आज ही मंदिरात पिंडे शेजारी राम, लक्ष्मण व सीता मातेच्या मुर्त्या आहेत.

सदरील देवस्थान इसवी सन 14 ते 15 व्या शतकात पाहिल्या बांधल्या गेले. नंतर या ठिकाणी मंदिराचा जीर्णोद्धार केला गेला. या मंदिराजवळ पाण्याचा कुंड असून सदरील कुंडात 12 ही महिने पाणी असते तर 1972 च्या दुष्काळात याच कुंडातून मारसावळी, नांदखेडा व भाकरवाडी याच कुंडातून पाणी पुरवलं गेलं व आज ही नेहमी या कुंडात पाणी राहते. या देवस्थानाला पर्यटन क्षेत्रात ही या देवस्तानाचा समावेश आहे. या देवस्थानाला पूर्व व पश्चिम दिशेकडून येण्यासाठी व जाण्यासाठी रस्ता असून हजारो भाविक वर्षभरात दर्शनासाठी येतात अनेक भाविकांची येथे मनोकामना पूर्ण झाल्या असल्याचे अनेक आख्यायिका असून मग नवस व मनोकामना पूर्ण झालेले व या देवस्थांवर श्रद्धा असलेले अनेक भाविक श्रावणात भांडाऱ्याचे आयोजन करतात या परिसरात मोर मोठ्या प्रमाणात असून डोंगराच्या मध्यात देवदरी अतिशय निसर्ग रम्य देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे.



# श्रावण मासातला पहिला सण नागपंचमी उत्साहात साजरा

## बच्चेकंपनीने लुटला झोके खेळण्याचा आनंद

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** नागपंचमी हा श्रावण महिन्यातील पहिला सण ग्रामीण भागात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भोकरदन तालुक्यातील राजूर येथे महिलांनी वारुळाची मनोभावे पूजा करून दर्शन घेत नागपंचमी हा सण उत्साहात साजरा केला. तर दुसरीकडे बच्चेकंपनीने झोका खेळण्याचा मनसोक्त आनंद लुटला.श्रावण हा आनंद आणि उत्साह घेऊन येणारा महिना आहे.या महिन्यात ऊनसावल्यांचा लपंडाव चालतो.सर्वत्र हिरवाईने निसर्ग नटलेला असतो.अनेक कवी,लेखकांनी आपल्या साहित्यातून श्रावणाचे वर्णन केले आहे. यावर्षी पावसाचा जोर कमी असल्याने नदी,नाले आणि धरणे कोरडी आहेत. पाऊस होईल की नाही याची काळजी शेतकऱ्यांना लागली होती. परंतु मागील दोन दिवसांपासून पावसाची रिपरिप सुरू झाल्याने पिकांना जीवनदान मिळाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागात नागपंचमी सण हा आनंदाने साजरा झाला आहे. श्रावणातल्या पहिल्या सोमवारी नागपंचमी हा सण साजरा होत असल्याने महिलांनी घरोघरी नागरुपी वारुळाची मनोभावे पूजा करून दर्शन घेतले.या सणाच्या निमित्ताने विवाहित मुली माहेरी येण्याची प्रथा हळूहळू कमीहोत असल्याचे चित्र दिसून आले.राजुरमध्ये नागपंचमीच्या सणाला महिला व मुलींनी झोके खेळत आनंद लुटला. बच्चे कंपनीही झोके खेळण्यात दंग होऊन गेली होती.



# व्यायामशाळेचा हॉल व्यावसायिकाच्या ताब्यातून मुक्त करण्याची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**बिडकीन :** पैठण तालुक्यातील बिडकीन ग्रामपंचात कार्यालयात आज सरपंच अशोक धर्मे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामसभेत रमाई घरकुल योजना शबरी घरकुल योजना व ताटी बाटी योजना सह विविध विकास कामावर चर्चा झाली. या प्रसंगी सरपंच अशोक धर्मे यांनी उपस्थित नागरीकांच्या समस्या जानून घेतल्या या प्रसंगी गावातील युवकांनी ग्रामपंचात कार्यालयातील व्यायाम शाळेचा हॉल खाजगी व्यवसायीकाच्या ताब्यातून मुक्त करण्याची मागणी निवेदना द्वारे केली. निवेवनात नमुद केले आहे की सदरील व्यायाम शालेचे उद्‌घाटन तत्कालीन खासदार मोरेश्वर सावे यांच्या खासदार स्वेच्छ निधीतून व रोहयो मंत्री हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते व विद्यमान पालक मंत्री आ. संदिपान पाटील भुमरे यांच्या अध्यक्षते खाली सन १९९६ ला करण्यात आले होते उदघाटन झालेली बिडकीन ग्रामपंचायतीने येथील व्यायामशाळा एका खाजगी व्यवसायीकाला रिकामी असल्याने कारणास्तव भाडे तत्वावर दिली होती ती व्यायामशाळा त्याच्या ताब्यातून मुक्त करण्याची मागणी गावातील आज ग्रामसभेत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे पैठण तालुका उपाध्यक्ष संदीप गायकवाड, अशोक शेळके, राजु पिंजारी, संजय शिंदे, जीवन नरवडे, मिलींद नरवडे, कैलास जाधव व अन्य युवकांनी केली आहे. या प्रसंगी ग्रामसेवक अरुण गोर्डे उपसरपंच अंजलीताई विकास गोर्डे, वैद्यकीय अधिकारी डॉ. विजय दळवी, अभियंता चव्हाण, तलाठी सचिन काशीकर, मंडळ अधिकारी संभाजी देशमुख, उपमुख्याध्यापक सचिन जगदाळे, ग्रामपंचायत सदस्य मधुकर सोकटक, अमोल कोथिंबीरे, अविनाश राठोड, ज्ञानेश्वर कांबळे, रमेश शिंदे, किरन गुजर, सागर फरताळे, अंकुश धर्मे व नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# बाजार सावंगी ते वेरूळ पायी दिंडी सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी जय बाबाजी भक्त परिवाराच्यावतीने श्री संत जनार्दन स्वामी व महामंडलेश्वर श्री स्वामी शांतिगिरी जी महाराज यांच्या आशीर्वादाने श्रावण मासानिमित्त पहिल्या सोमवारसाठी घृष्णेश्वर येथे जाण्यासाठी जय बाबाजी भक्त मंडळ यांचे पायी दिंडी रविवार रोजी सकाळी रेणुका माता मंदिर परिसरातुन रवाना झाली संपूर्ण गावातून पालखी व दिंडीची शोभा मिरवणूक काढण्यात येऊन वाद्याच्या गजरात जयघोष करीत पालखीचे ठिकठिकाणी स्वागत व पूजन झाले महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते पायी दिंडी कनकशीळ शिव संगमेश्वर विराम गाव गादाना भडजी खुलताबाद मार्गी असा प्रवास राहणार आहे सायंकाळी श्री संत जनार्दन स्वामी आश्रम या ठिकाणी प्रवचन भजन सकाळी विधी चा कार्यक्रम त्यानंतर महाप्रसादाने सांगता नंतर दिंडी गावाकडे रवाना झाली.



# श्रावणाच्या सुरूवातीला रिमझिम सरींची झड

आधुनिक केसरी न्यूज

**चारठाणा :** श्रावण महिन्याला सुरूवात झाली आहे. श्रावणाच्या पहिल्या दिवसापासून पावसानेही हजेरी लावली आहे. जवळपास पंधरा दिवसांनी पावसाने हजेरी लावल्याने शेतीपिकांना दिलासा मिळाला आहे.

मागील पंधरा दिवस पावसाने दडी मारली होती. पाऊस गायब झाल्याने सर्वांचीच काळजी वाढली होती. सोयाबीन फुलोऱ्याच्या परिस्थितीत असताना पाऊस नसल्याने सोयाबीनच्या नुकसानीची शक्यता निर्माण झाली होती. शेतकऱ्यांची काळजी वाढली असताना शुक्रवारी पहाटेपासून पावसाने हजेरी लावली आणि शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. पावसामुळे पिकांना नवसंजीवनीच मिळाली. पावसाअभावी पिकांवर विविध रोगांचा प्रादुर्भाव होऊ लागला होता. तसेच पिकांच्या वाढीवरही परिणाम होत होता. उन्हामुळे जमिन कडक झाल्याने तण काढण्याच्या कामाची गती मंदावली होती. आंतरमशागतीतही अडथळे येत होते. पावसाचे आगमन झाल्यानंतर मात्र सर्वांनाच दिलासा मिळाला. शनिवारीदेखील सकाळपासून पावसाने हजेरी लावली. सलग दुसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली. दुपारी पावसाचा जोर काहीसा वाढला होता. बहुतांश भागात पावसाने हजेरी लावली आहे. पावसामुळे पिकांना दिलासा मिळाला असून सकाळच्या सत्रात निंदण, वखरणीची कामे झालीत. मात्र दुपारी पावसाचा जोर वाढल्याने या कामांचा खोळंबा झाला होता.

# राईतकर यांना राज्यस्तरीय साहित्यिक जनजागृती कार्य पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज



**मेहकर :** कर्मयोगी संत शुकदासजी महाराजश्री संस्थापित विवेकानंद आश्रम द्वारा संचालित विवेकानंद विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, हिवरा आश्रम, ता. मेहकर येथील इंग्रजी आणि मराठी साहित्याचे अभ्यासक व अध्यापक भगवान राईतकर यांची राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघ आणि श्रावस्ती सामाजिक शैक्षणिक संशोधन प्रतिष्ठान, परळी वैजनाथ जि. बीड यांच्या वतीने आयोजित ६व्या राज्यस्तरीय साहित्यिक जनजागृती कार्य पुरस्कारासाठी निवड झाली आहे. राज्यातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांनी पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवले होते. या प्रस्तावातून भगवान राईतकर यांची राज्यस्तरीय साहित्यिक जनजागृती कार्य पुरस्कारासाठी निवड झाली असून पुरस्कार जाहीर झाला आहे. भगवान राईतकर यांचे साहित्यिक, शैक्षणिक, पत्रकारिता,स्पर्धा परीक्षा आणि संगीत क्षेत्रामध्ये उल्लेखनीय काम असून प्रवचन, व्याख्यान व विविध शैक्षणिक उपक्रमातून ते विद्यार्थ्यांना प्रबोधन करीत असतात. भगवान राईतकर यांचे संतांचीये पायी..., राईतकर इंग्लिश हॅलो ग्रामर, राईतकर व्हर्ब बँक, राईतकर मूलभूत गणितीय सूत्रे, आभाळाएवढी ज्यांची उंची.. इत्यादी पुस्तक प्रकाशित आहेत. राईतकर यांनी महाराष्ट्रातील जवळपास १५० नवोदित कवी, कवयित्री व साहित्यिकांना लिखाणासाठी प्रेरित केले आहे. बऱ्याच पुस्तकांना प्रस्तावना आणि अनेक पुस्तकांच्या समीक्षा त्यांनी लिहिले आहेत. साहित्याला समर्पित असलेले 'साहित्य जगत ' ही मासिक राईतकर यांनी सुरू केले असून त्याद्वारे साहित्यिक चळवळ चालवित आहेत. त्यांच्या या सर्व कार्याचा आढावा घेऊन निवड समितीद्वारे त्यांना राज्यस्तरीय साहित्यिक जनजागृती कार्य पुरस्कार जाहीर झाल्याचे कळविण्यात आले आहे.

# राजूर येथील विद्यार्थी निखिल बोर्डे विद्यानिकेतनसाठी पात्र

आधुनिक केसरी न्यूज



**श्रीक्षेत्र राजूर :** येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थी निखिल सुभास बोर्डे याची पुढील शिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय विद्यानिकेतन या संस्थेमार्फत पुढील शिक्षणासाठी निवड झाली आहे. त्याबद्दल राजूर येथील जिल्हा परिषद शाळेच्या वतीने निखिल बोर्डे याचा सत्कार करण्यात आला.

शासकीय विद्यानिकेतन ही संस्था १९६६ पासून ग्रामीण भागातील आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे कार्य करते.या संस्थेत मराठवाड्यातील ग्रामीण भागातून दरवर्षी ४० गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतचे शिक्षण मोफत दिले जाते. संस्थेचा माध्यमातून विद्यार्थ्यांचा शारीरिक, बौद्धिक तसेच मानसिक विकास व्हावा या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जातात. राजूर येथील निखिल बोर्डे या संस्थांमध्ये पुढील शिक्षण घेणार आहे. त्याच्या या यशाबद्दल केंद्रप्रमुख रमेश पुंगळे, शाळेचे मुख्याध्यापक बबन जंजाळ, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष पुंगळे, सदस्य मिलिंद मगरे, श्रीमती मुळे, दारुले, श्रीमती हिंगमिरे, श्रीमती थेटे, श्रीमती सहाणे, श्रीमती पिंपळे, श्रीमती बदर, श्रीमती सरोदे, अंकुश मिसाळ,मनोज कणकर, नितीन मगर आदींनी निखिलचे अभिनंदन केले आहे.

# जामनेर ते जालना गाडी सुरू

आधुनिक केसरी न्यूज



**जामनेर :** जामनेर आगार येथून सुटणारी लालपरी जालना,गोद्री, फत्तेपूर, धावडा मार्ग रेणुकाची राजुर गणपती मार्गे जालना जालना पिंपळगाव रेणुकाई राजुर गणपती मार्गे जालना जाणारी गाडी ला सकाळी आठ वाजता फत्तेपुर नगरीमध्ये जामनेर वरून जालना जाणाऱ्या गाडीचे फत्तेपुर बस स्टैंड वर थाटात करण्यात आले उद्घाटन गोदरी येथील बंजारा लवाना कुंभ झाला होता तेव्हापासून घाटामधील धावडा ते गोदरी रोड खूप चांगल्या प्रकारे त्यावर लहान मोठ्या नऊ पुलाचे काम करून झाले आहे.जामनेर तालुक्याचे मन विजेता नेतृत्व माननीय महोदय मंत्री साहेब श्री गिरीश महाजन जी यांनी या रोड रस्त्याचे काम खूप चांगल्या प्रकारे केले असून त्या रोड रस्त्यावरून एसटी सुरू व्हावी अशी होती.

तसे राजूर गणपती देवस्थान हे अष्टविनायकापैकी एक असून मोठे देवस्थान असून आपल्या परिसरामधील लेखी त्या परिसरात मुलीच्या परिसरामध्ये लग्न होऊन गेलेल्या आहेत व त्या परिसरातील मुली आपल्या परिसरामध्ये आलेल्या आहेत त्याकरिता इतर गाडी सुरू झाली तर चांगलं होईल व आपल्या परिसरातील लोकांना चतुर्थीच्या दिवशी गणपतीचे दर्शन होईल कारण आपल्या परिसरामध्ये गणपतीचे मोठे मंदिर नसल्यामुळे ते मध्य रस्त्याने केले तर खूप कमी अंतराने जवळ आहे तर आपल्या परिसरातील लोक जर चतुर्थीला राजुर गणपतीला जाऊ शकते असे सुद्धा आम्ही त्यांच्याशी बोललो होतो. तरी माननीय महोदय गिरीश भाऊ महाजन विद्यमान ग्रामविकास मंत्री यांनी प्रवाशाची मागणी ध्यानात घेऊन दळणवळणाच्या दृष्टिकोनातून हा रस्ता सुरू केल्यामुळे खानदेश व मराठवाड्यामध्ये व्यापारामध्ये फत्तेपुर बाजारपेठ चे गाव असल्यामुळे घाटावरील व्यापारी सोमवारी भरणाऱ्या बाजाराला येथील आपल्याकडचेही व्यापारी घाटावरील पिंपळगाव रेणुकाई धावडा शिवना अनवा घाटावरील मोठ्या गावांच्या बाजाराला जातील याच्याने दळणवळणाचा हा रस्ता कमी मार्गाचा कमी अंतराचा असल्यामुळे हा सुरू होऊन जाईल याकरिता माननीय गिरीश भाऊ महाजन यांचे भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण आभार मानले.व प्रवाशांनी संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयप्रकाश चव्हाण यांनी केले आहे.





# कानुमातेला जल्लोषात निरोप

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** खान्देशाचे कुलदैवत असलेल्या कानुमातेला आज तालुक्यातील बाळापुर गावात डीजे व ढोलताशांच्या गजरात जल्लोषात निरोप देण्यात आला. कानूबाई राणूबाई मातेच्या मिरवणुकीत भाविकांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली. भाविकांनी नाचण्याचा मनमुराद आनंद लुटला.

श्रावण महिन्यातील पहिल्या व दुसऱ्या रविवारी व सोमवारी खान्देशात कानुमातेचा उत्सव साजरा करण्यात येतो. रविवारी कानुमातेची उत्साहात स्थापना करण्यात येते. काही ठिकाणी कानुमातेसह रोट केले जातात. रविवारी विधीवत पूजा करुन स्थापना केल्यानंतर रात्रभर कानुमातेचे जागरण केले जाते. ज्या घरी कानुमातेची स्थापना केली जाते. त्या कुटूंबातील सर्व सदस्यांसह गोत्रातील सर्व नातलग सहभागी होत असतात. रात्रभर नाच गाणे, गरबे, खेळ खेळत जागरण केले जाते. सोमवारी सकाळी या कानुमातेला निरोप देण्यात येतो. सकाळी 9 वाजेच्या सुमारास या कानुमातेची विसर्जन मिरवणूक काढण्यात येते. आज सकाळी धुळे जिल्हयातील बाळापूर उपनगर येथे एकत्रित कानुमातेची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणूकी हजारो भाविक सहभागी झाले होते. यावेळी कोती नदीपर्यंत काढण्यात आलेल्या मिरवणुकीत मोठया प्रमाणावर जल्लोष करण्यात आला. यावेळी भाविक महिलांनी जिम्मा फुगडीचा आनंद लुटला. अनेकांनी डीजेच्या तालावर ठेका धरला. यावेळी कोणताही अनुचित प्रकार होऊ नये म्हणून गावातील प्रतिष्ठित व वरिष्ठ नागरिक तरुण यांनी विषय लक्ष घातले. तर कानुबाई मातेचे दर्शन घेवून भाविकांनी नाचण्याचा मनमुराद आनंद लुटला. कानूमातेला भक्तिमय वातावरणात निरोप दिला.

# आता महिनाभर भक्तिमय वातावरण

## अनेक सणांची रेलचेल : शुद्ध श्रावण मासाला प्रारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**चारठाणा :** सर्वात पवित्र समजला जाणाऱ्या श्रावण महिन्याला १७ ऑगस्टपासून प्रारंभ झाला आहे. या महिन्यात श्रावण सोमवार नागपंचमी, रक्षाबंधन, जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर असे विविध सण, व्रत व उपवासाचे दिवस येणार आहेत. त्यामुळे या महिन्यात पूजा अर्चेत जास्तीत जास्त वेळ जाणार असून अनेकांनी तसे नियोजन केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे संपूर्ण महिनाभर भक्तिमय वातावरण राहणार आहे. हिंदू धर्मात शुद्ध श्रावण महिन्याला अनन्य साधारण महत्त्व आहे. यावर्षी अधिक श्रावण आल्याने श्रावण महिना काही दिवसांनी उशिरा आला आहे. अधिक श्रावणमध्ये पूजापाठ, दानधर्म, तीर्थयात्रांना भेटी देणे याला अधिक महत्त्व आहे. पण शुद्ध श्रावण महिन्यात व्रत वैकल्य व सण येतात यावर्षी १७ ऑगस्ट ते १५सप्टेंबर या कालावधीत शुद्ध श्रावण मास राहणार आहे. श्रावणी सोमवारचे व्रत, नागपंचमी, रक्षाबंधन, जन्माष्टमी, गोपाळकाला, मंगळागौर, पिठोरी अमावस्या हे प्रमुख सण याच महिन्यात असल्याने महिलांनी आपले व्रत व सण श्रावण सोमवार व शिव मूठ श्रावण मासात शिव मुठीला विशेष महत्त्व राहत असून पहिला श्रावण सोमवार २१ऑगस्ट शिव मूठ तांदूळ राहणार आहे. तर दुसरा सोमवार २८ऑगस्ट शिव मूठ तीळ, तिसरा सोमवार ४सप्टेंबर शिव मूठ मूग व चौथा सोमवार ११ सप्टेंबर शिव मूठ जव राहणार आहे. त्याच बरोबर मंगळवार २२ ऑगस्ट, २९ ऑगस्ट, ५ सप्टेंबर व १२ सप्टेंबरला मंगळगौर व्रताच्या तारखा आहेत. कसे साजरे करायचे याचे नियोजन केलेले आहे. असे आहेत श्रावणातील सण यंदाच्या श्रावण महिन्यात सोमवार २१ऑगस्ट रोजी नागपंचमी, बुधवार ३० होणार आहे. ऑगस्ट रक्षाबंधन, बुधवार ६सप्टेंबर जन्माष्टमी, गुरुवार ७ सप्टेंबर गोपाळकाला व गुरुवार १४सप्टेंबर पोळा सण साजरा होणारआहेत.

# घरफोडी करणारा अट्टल चोरटा ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** फिर्यादी युवराज देवराम पाटील यांचे मुकटी येथील बंद घराच्या दरवाज्याचे कडी कोंडा तोडुन दोन अज्ञात इसमांनी आत प्रवेश करून त्यांचे घरातील ५०,००० रुपये रोख रक्कम व २२,०००/- रुपये किमतीचे दोन तोळे सोन्याचे डोरले असा एकूण ७२,०००/- किमतीचा मुद्देमाल चोरी केला. होता व त्या बाबत त्यांनी धुळे तालुका पोलीस ठाणेस फिर्याद दिल्याने धुळे तालुका पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला होता. नमुद गुन्हयातील आरोपीतांचा शोध घेण्यासाठी धुळे तालुका पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील यांनी तात्काळ स्वतंत्र पोलीस पथक तयार करून आरोपींचा शोध सुरु केला असता प्रमोद पाटील यांना गुप्त बातमी दारामार्फत माहीती मिळाली की, नमुद गुन्हयातील एक संशयीत आरोपी हा धुळे येथील आहे तेव्हा सदर संशयीत इसमास पोलीस पथकातील पोलीस अमदार यांनी ताब्यात घेवुन त्यांस त्यांचे नाव पत्ता विचारले असता त्यांने त्याचे नाव सऊद सलीम असारी, वय २२ वर्ष १०० फुट रोड, सरदार हॉटेलच्या पाठीमागे, इब्राहीम मस्जीद जवळ धुळे असे असल्याचे सांगितले व सदरचा गुन्हा हा त्यांने त्याचा साथीदार हेमंत किरण मराठे यांचे मदतीने केला असल्याची पोलीस) तपासात कबुली दिली आहे. नमुद गुन्हयातील आरोपी नामे सऊद सलीम अन्सारी यांचेकडून गुन्हयातील चोरी गेलेल्या रकमेपैका रोख रक्कम १४,६००/- रुपये. त्यांचे राहते धरून हस्तगत करण्यात आले असून नमूद गुन्हयातील फरार आरोपी नामे हेमत किरण मराठे हा फरार असून त्याचाही पोलीस पथक शोध घेत आहेत.





# चावडी वाचनातून सारथी योजनांची माहिती

आधुनिक केसरी न्यूज

**श्रीक्षेत्र राजूर :** राजूरपासून जवळ असलेल्या बानेगाव येथील ग्रामपंचायत कार्यालयात १५ ऑगस्ट २०२३ रोजी गावकऱ्यांना सारथीच्या विविध उपक्रमांची माहिती भास्कर पडोळे यांनी दिली. सारथी ही संस्था महाराष्ट्र राज्यातील मराठा,कुणबी, मराठा- कुणबी व कुणबी - मराठा या लक्षित गटाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासासाठी ही नियोजन विभागाच्या अधिपत्याखाली कामकाज करते. संस्थेमार्फत एमफिल, पीएचडी, यूपीएससी, एमपीएससी, नेट-सेट ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना सारथीअर्थसहाय्य करत असते. युवा व्यक्तिमत्व विकास, संगणक प्रशिक्षण, कौशल्य विकास,राजमाता जिजाऊ कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, इयत्ता ९ ते १२ पर्यंतच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी छत्रपती राजाराम महाराज शिष्यवृत्ती, डॉ. पंजाबराव देशमुख सारथी उच्च शिक्षण शिष्यवृत्ती, परदेशी भाषा शिक्षण अभ्यासक्रम यासारख्या अनेक योजना सारथीमार्फत राबल्या जातात. युवकांनी, सारथीच्या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन पडोळ यांनी केले. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | अ‍ॅल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118

www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com

S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# समर्थ अर्बन बँक सभासदाचा विश्वास संपादन करेल

## बाळासाहेब पाटील रावणगावकर यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** सहकार क्षेत्रात राजकीय मंडळीनी हस्तक्षेप केल्याने जनेतेचा विश्वास उडाला आहे. तालुक्यात नव्याने सुरू होणारी समर्थ अर्बन बँक हि तालुक्यातील असल्याने आम्ही सभासदाची ठेवी सूरक्षीत ठेवून बॅंकेला ऊभारी देण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.त्यामूळे अधिकाधिक सभासदांनी शेअर्स नोंदणी करून हातभार लावावा. आम्ही कदापी सभासदांचा विश्वासघात करणार नाही अशी ग्वाही माजी कृषी सभापती बाळासाहेब पाटील रावणगावकर यांनी सोमवारी ता (२१) बोलताना दिली आहे.



शहरातील दत्तगडावर श्रावण सोमवारच्या शूभ मुहुर्तावर समर्थ अर्बन कॉपरेटीव्ह सोसायटी लिमिटेड भोकर बँकेच्या शेअर्स विक्रीचा शुभारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेच्या माजी सभापती सौ.मंगाराणी अंबूलगेकर होत्या.व्यासपीठावर ऊदघाटक म्हणून दत्तगडाचे महंत ऊत्तमबन महाराज,माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश देशमुख भोसीकर, काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष भगवान दंडवे, सभापती जगदीश पाटील भोसीकर, उपसभापती बालाजी शानमवाड, यूवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष आत्रिक पाटील मुंगल, भाजपाचे तालुकाध्यक्ष कीशोर पाटील लगळूदकर, माजी नगराध्यक्ष विनोद पाटील चिंचाळकर,माजी सभापती गोविंद बाबागौड पाटील, शिवसेना जिल्हा उपाध्यक्ष सतीश देशमुख, संचालक सारंग मूदंडा, गणेश पाटील कापसे, गणेश राठोड, रामचंद्र मुसळे, सूभाष कीन्हाळकर, सरपंच संघटनेचे तालुकाध्यक्ष माधव अमृतवाड,सुभाष पाटील कोळगावकर, मोहन पाटील हस्सापूरकर,सेनेचे सूभाष नाईक, साहेबराव भोंबे, रमेश महादवाड,सूलोचनाबाई ढोले, सूरेखाबाई माळे, विनोद चव्हाण यांची उपस्थिती होती. रावणगावकर म्हणाले की, तालुक्यात यापूर्वी अनेक सहकारी संस्था कार्यान्वित झाल्या पण त्या फारकाळ तग धरू शकल्या नाहीत. परिणामी जनतेचा त्यावरील विश्वास ऊडाला आहे. विश्वस्तच मालक झालेत खरतर सभासद मालक होण गरजेच आहे. मला बँकेतील व्यवहाराचा अनुभव असल्याने मी याकडे वळलो आहे. यानिमित्ताने होतकरू गरजूना आधार मिळणार आहे. आमचे संचालक मंडळ हे तालूक्यातील असून ते उच्चशिक्षित असल्याने नक्कीच तुमच्या सहकार्याने पुढिल काळात तालुक्यात नव्हे तर महाराष्ट्रात जाळे पसरले असा विश्वास आहे. जनतेनी सहकार्य करून बँकेला ऊभारी देण्यासाठी पुढाकार घ्यावा असे अहवान रावगावकर यांनी केले आहे.प्रास्ताविक आत्रिक पाटील मुंगल यांनी केले.सुत्रसंचालन मनोज गीमेकर, आभार अँड. शिवाजी कदम यांनी मानले आहे. कार्यक्रमास तालूक्यातील बहूसंख्य नागरिकांची उपस्थिती होती.

# आ. विजयराव भांबळे यांच्या प्रयत्नातून दिव्यांग तपासणी शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** संसदरत्न डॉक्टर फौजिया खान मॅडम राज्यसभा खासदार परभणी यांच्या प्रेरणेतून व मा विजयराव भांबळे साहेब यांच्या आयोजनातून व ALIMCO या संघटनेच्या संयुक्त विद्यमाने जिंतूर तालुक्यातील दिव्यांगासाठी अवयव दान करण्याच्या हेतूने भव्य दिव्यांग तपासणी शिबिर कार्यक्रम अलमंड फंक्शन हॉल विलासराव देशमुख उर्दू हायस्कूल च्या बाजूला येलदरी रोड जिंतूर येथे पार पडला, या तपासणी शिबिरास दिव्यांगाणी उस्फुर्त प्रतिसाद दिला.

जिंतूर तालुक्यातील दिव्यांग व्यक्तींना सामाजिक दृष्टिकोनातून मदत व्हावी या हेतूने व दिव्यांगांना मोफत अवयव देण्यासाठी सदर शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये 300 पेक्षा जास्त लाभार्थ्यांची तपासणी करण्यात आली असून सदर लाभार्थ्यांना कृत्रिम हात कृत्रिम पाय कानाचे श्रवण यंत्र अपंगांसाठी तीन चाकी सायकल, गाडा, चष्मा, काठी नोटपॅड इत्यादी साहित्य वाटप करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या फौजिया खान मॅडम यांनी जिल्ह्यामध्ये आपण राज्यसभेचे खासदार असल्याने सामाजिक दृष्टिकोन जपत दिव्यांगांसाठी भरीव मदत व्हावी या उद्देशाने कृत्रिम अवयव दान करण्याचा संकल्प हाती घेतला आहे व अनेक विकास कामे तसेच सामाजिक प्रश्न राज्यसभेत मांडून प्रश्न सोडवले आहेत व यापुढे देखील सोडवणार अशी ग्वाही दिली.

आ. विजयराव भांबळे यांनी मनोगत व्यक्त करताना जिंतूर तालुक्यात दिव्यांगांना विविध अवयव देण्यात येणार आहेत जेणेकरून त्यांना दैनंदिन गरजा भागवण्यासाठी मोलाची मदत होईल व त्यांना समाज वेगळ्या दृष्टीने पाहणार नाही या विज्ञानवादी जगात कृत्रिम अवयवातून त्यांची गरज पूर्ण होईल व त्यांची होणारी हेळसांड थांबेल यासाठी मी मदत करणार आहे व अशीच मदत पुढेही चालू ठेवणार आहे असा संकल्प केला.

यावेळी संसदरत्न खासदार डॉक्टर फोजिया खान मॅडम, विजयराव भांबळे साहेब, अजय चौधरी, रामरावजी उबाळे, प्रसादराव बुधवंत, साबिया बेगम कपिलर फारुकी मॅडम, विश्वनाथ राठोड, बाळासाहेब घुगे गणेशराव इलग, शरदराव मस्के, मधुकर भवाळे, विजय खिस्ते, बाळासाहेब भांबळे, मनोहर डोईफोडे, निकाळजे, अशोक बहिरट, उस्मान खान पठाण, अक्कू लाला, मनीषाताई केंद्रे, नायब तहसिलदार प्रशांत राखे, तालुका आरोग्य अधिकारी बोराळकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सरपंच, उपसरपंच पदाधिकारी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सर्व पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिक्षकांना शिकवायचे सोडून इतर कामे देणे म्हणजे 'काम छोडो और बिल्ली हकालो'

## शिक्षणमंत्री व शिक्षण आयुक्तांनी लक्ष देण्याची गरज

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** महाराष्ट्रात शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिकवायचे सोडून इतर अशैक्षणिक कामे देणे म्हणजे काम छोडो बिल्ली हाकालो असा कारभार झाला असुन याकडे शिक्षणमंत्री दीपक केसरकर व शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी लक्ष देऊन शिक्षकांकडून शाळेतील विद्यार्थ्यांना शिकवणी व्यतिरिक्त इतर कामे देऊ नये, अशी मागणी जनतेतून व शिक्षकांकडून होत आहे.



शिक्षक हा देशाचे भवितव्य घडवितो विद्यार्थ्यांना ज्ञानाचे धडे देतो. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये वाडी तांड्यावर दुर्गम भागात जाऊन गोर गरीब शेतकरी, शेतमजूर, सामान्य माणसाचे लेकरे हे जिल्हा परिषदेच्या शासकीय शाळेत शिक्षण घेत असतात धनदांडगे ,पुढारी, अधिकारी, कर्मचारी यांचे मुले हे श्रीमंत शिक्षण सम्राटांच्या शाळेत तालुक्यावर, जिल्ह्यावर, महानगरात शिक्षण घेत असतात त्यामुळे गरिबाला कुणी वाली उरला नाही त्यातच दुष्काळात तेरावा महिना म्हणल्याप्रमाणे जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना शासन विविध सर्वेक्षण,मतदार यादी बनविने, बीएलओपदी नियुक्ती करणे, निवडणूक, स्वच्छता मोहीम राबवने,निरक्षर लोकांचा सर्वे स्थलांतर विद्यार्थी सर्वे,अपंग विद्यार्थांचा सर्वे, शा.पो, आहार वाटप करणे आदी विविध कामे लावीत आहेत त्यामुळे त्यांचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे. पूर्वी जिल्हा परिषदेचे शिक्षक हे विद्यार्थ्यांचा शालेय अभ्यासक्रम पूर्ण शिकवून गुणवत्ता वाढीसाठी जादा वर्ग घेत, असे पण आता जिल्हा परिषदेच्या शिक्षकांना काहीवेळा दिलेला अभ्यासक्रम पूर्ण करता येईना झाला आहे. त्यामुळे स्पर्धेच्या युगात गोरगरिब विद्यार्थ्यी हे मागे राहत आहेत. तेव्हा याकडे राज्याचे शिक्षणमंत्री दीपक केसरकर व शिक्षण आयुक्त सुरज मांढरे यांनी लक्ष देऊन शिक्षकांकडून सर्व अशैक्षणिक कामे तथा, मतदार यादी, बीएलओ आदी कामे काढून घ्यावी, अशी मागणी जनतेतून व शिक्षकांकडून होत आहे.

# अमृत महोत्सवाची सांगता 'मेरी माटी मेरा देश'च्या माध्यमातून

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाची सांगता चंद्रपूरात



मेरी माटी मेरा देश या कार्यक्रमाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. शासनाच्या निर्देशानुसार होणार्या या अभियानांतर्गत अनेक सांस्कृतिक कार्यक्रमाच आयोजन चंद्रपूरात करण्यात येणार असून यातून मिट्टी को नमन, विरोंको वंदन हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात उत्साहात राबविण्यात येत आहे. मातीला केंद्र बिंदू मानून या कार्यक्रमाच आयोजन करण्यात यावं अशा शासनाच्या सुचना आहेत त्या अनुषंगानेच या सांस्कृतिक कार्यक्रमाच आयोजन भव्य प्रमाणात चंद्रपूरात करण्यात येत आहे. 23 ऑगस्ट 2023 ला जिल्हास्तरीय समारोपीय कार्यक्रमाचे आयोजन बल्लारपूर रोड स्थित डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम गार्डन येथे करण्यात आले असून सायंकाळी 6.00 वाजता स्थानिक चांदा क्लब ग्राऊंड वर " मेरी माटी मेरा देश " साद सह्याद्रीची, भूमी महाराष्ट्राची या सांस्कृतिक कार्यक्रमाचं आयोजन करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाला सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, अशोक नेते, आ. रामदास आंबटकर , अभिजीत वंजारी, सुधाकर अडबाले, किर्तीकुमार उर्फ बंटी भांगडीया, सुभाष धोटे, किशोर जोरगेवार, प्रतीभा धानोरकर, सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे, जिल्हाधीकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन, आयुक्त विपीन पालीवाल आदींची उपस्थिती राहणार आहे.

# तलाठी परीक्षा एमपीएससीमार्फत घ्या: नरवडे

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्यामध्ये तलाठी पदाची ४५०० पदाची भरती परिक्षा सुरु आहे. त्यासाठी लाखो विद्यार्थ्यांनी अर्ज केले आहे. परंतू, कुठलाही अभ्यासाला वेळ न देता एका महिन्याच्या आत परिक्षा घेणे सुरु आहे, त्यामुळे विद्यार्थ्याचे फार मोठे नुकसान होत आहे. या परिक्षा भरतीमध्ये परिक्षेच्या पहिल्याच दिवशी नाशिकमध्ये म्हसरुळ मधील एका परिक्षा केंद्रावर पेपरफुटीचा प्रकार घडलेला आहे. त्यामुळे संपुर्ण महाराष्ट्रामध्ये स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थी- विद्यार्थीनींमध्ये संभ्रम व नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. नैराश्यामुळे विद्यार्थ्यांनी आत्महत्येची पाऊल उचलू नये अशी शंका जिल्हाध्यक्ष मनीष नरवडे यांनी व्यक्त केली आहे.



महाराष्ट्रात तलाठी पदाची ४५०० पदाकरीता १०४१७१३ एवढे अर्ज आले आहेत. एका महिन्यामध्येच अर्ज भरण्याची प्रक्रिया पार पडली आणि लगेच परिक्षा जाहीर केली. त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासाला वेळ मिळाला नाही. अनेक विभागाचे सुध्दा या महिन्यामध्ये परिक्षा आहेत. त्यामुळे विद्यार्थी कोणतीही एकच परिक्षा देवू शकेल, त्यामुळे ही परिक्षा एका दिवशी आली तर एक संधी चालल्या जाईल, त्यामुळे ही परिक्षा ०२ महिन्याने पुढे ढकलण्यात यावी, जेणेकरुन विद्यार्थ्यांना अभ्यासाला वेळ मिळेल व गोरगरीब विद्यार्थ्याचे नुकसान होणार नाही, ते नोकरीपासून वंचित राहणार नाही, यांचा सरकारने याचा विचार करावा. तसेच, तलाठी पदाच्या परिक्षेसाठी उमेदवाराने अर्ज भरतांना औरंगाबाद, नगर, पुणे या केंद्राची मागणी केली तर त्याला नागपूर, अमरावती, अकोला असे परिक्षा केंद्र देण्यात आले, त्यामुळे उमेदवारांवर नाहाक प्रवास खर्च, वेळ, जाणे येणे असा भूर्दंड सहन करावा लागत आहे. परिक्षा केंद्र मागणीनुसारच देण्यात यावे आणि मागे राज्यात वनरक्षक पदाकरीताच्या परिक्षा झाल्या, त्यातही पेपरफुटीचे प्रकार घडले आहे, असे प्रकार महाराष्ट्र मध्ये वारंवार घडत आहे त्यामुळे ज्या ज्या सेंटरवर महाराष्ट्रामध्ये पेपरफुटीचे प्रकार घडले ते सर्व सेंटर रद्द करुन त्यांचेवर अजामीनपात्र गुन्हे दाखल करण्यात यावे. स्पर्धा परीक्षा पेपरफुटीच्या घोटाळयाचा तपास चालूच असतांना लगेचच तलाठी पदाची परिक्षा जाहीर केली, त्यामुळे या परिक्षामध्येही महाघोटाळा होण्याची शक्यता होती, तसेच घडले, नाशिकमध्ये वरील प्रमाणे पेपरफुटीचा प्रकार घडला, त्यामुळे विद्यार्थ्यांचे हजारो, लाखो रुपये वाया जाणार की काय, अशी शंका निर्माण झाली आहे. खाजगी कंपनी / कंत्राटदाराकडून घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परिक्षा या एमपीएससी आयोग व शासनस्तरावरुन घेण्यात याव्यात, या मागण्याचे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयातील श्रीमती. पल्लवी लिगदे यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.

# सरचिटणीसपदी वैभव चव्हाण यांची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** खुलताबाद तालुक्यातील सुलतानपूर येथील



वैभव वसंत चव्हाण यांची राष्ट्रवादी युवक कांग्रेस पार्टी छत्रपती संभाजीनगर जिल्हाच्या सरचिटणीसपदी आमदार सतीश चव्हाण, कैलास पाटील (जिल्हा अध्यक्ष राष्ट्रवादी) अनुराग शिंदे, महेश उबाळे, अनिल चव्हाण यांच्या उपस्थित नियुक्ती पत्र देऊन निवड करण्यात आली. या निवडी बद्दल बाळासाहेब श्रीखंडे, इब्राहिम शहा.शेकनाथ कोतकर, भगवान चव्हाण, अमरनाथ श्रीखंडे. शाकीर शहा. गणेश चव्हाण, प्रकाश चव्हाण. स्वप्नील चव्हाण, बाबासाहेब मालोदे, प्रवीण जसोरिया, सिदार्थ श्रीखंडे, राहुल जाधव, दिनेश चव्हाण, प्रदीप छत्रे आदींनी त्यांचे शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

**जाहीर प्रगटन**

मौजे खांडी पिंपळगाव शिवारातील गट क्रमांक 212 एकुण क्षेत्र 5 एकर 20 गुंठे विकणे आहे. मूळ मालकाचे नाव दादाराव गणपत महालकर असून जमिनीत विहीर असून पन्नास टक्के हिस्सा आहे जमिनीवर जाण्यास बैलगाडी रस्ता उपलब्ध. संपर्क मो. नंबर 95 61 90 92 13 / 96 73 36 39 79 ता. खुलताबाद जिल्हा. औरंगाबाद

# संविधानाची अंमलबजावणी करणाऱ्यांना संसदेत पाठवा

## ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे : दिवंगत खासदार बाळू धानोरकर अभ्यासिकेचे लोकार्पण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** दिवंगत खा. बाळूभाऊ धानोरकर यांच्या नावाने अभ्यासिका सुरू करण्यात आली. निश्चितच हा अभिनंदनीय उपक्रम आहे. या अभ्यासिकेमुळे अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याची सुविधा होणार आहे. अभ्यासिका ही संविधान वाचन करणारे केंद्र आहे. मागील काही वर्षांत संविधान धोक्यात आल्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे संविधान वाचवायचे असेल, तर संविधानाची अंमलबजावणी करणारे संसेदत पाठवावे लागेल, असे प्रतिपादन दिल्ली येथील ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखेडे यांनी केले. शहरातील भिवापूर वॉर्डात जिल्ह्यातील स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी गणपर्व चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून दिवंगत खासदार बाळू धानोरकर अभ्यासिकेची निर्मिती करण्यात आली आहे. या अभ्यासिकेचा उद्‌घाटन सोहळा शनिवारी (ता. १९) दुपारी ४ वाजता स्थानिक भिवापूर वॉर्डातील साई मंदिरात पार पडला. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, उद्‌घाटक म्हणून आमदार प्रतिभा धानोरकर, तर प्रमुख अतिथी चंद्रपूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा आमदार सुभाष धोटे, आमदार किशोर जोरगेवार, आमदार सुधाकर अडबाले, माजी आमदार देवराव भांडेकर, भद्रावतीचे नगराध्यक्ष अनिल धानोरकर, चंद्रपूर शहर काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष रामू तिवारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र वैद्य, शिवसेनेचे (उबाठा) जिल्हाध्यक्ष संदीप गिऱ्हे, लोकजागृती सामाजिक संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध वनकर यांची उपस्थिती असणार आहे. संसदेत देशभरातील अनेक खासदार येतात. यातील अनेक खासदारांशी माझा जवळचा संबंध आला आहे. बहुतांश खासदार आपल्या क्षेत्रातील प्रश्नसुद्धा उपस्थित करीत नाही. आपल्या मतदार संघाचा विकास व्हावा, रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्या, उद्योग उभारले जावे, अशी अपेक्षा ठेवून काम करणारे खासदार बोटावर मोजता येईल एवढे असतात. त्यात चंद्रपूरचे खासदार बाळू धानोरकर यांचा अग्रक्रमाने समावेश होतो. पहिल्यांदा निवडून आलेल्या बाळू धानोरकर यांना आपल्या क्षेत्रासाठी झटताना मी स्वता जवळून बघितले असल्याच्या अनेक आठवणी वानखेडे यांनी यावेळी सांगितल्या.

विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी, युपीएससी, एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विदर्भातील विद्यार्थ्यांचा टक्का खूप कमी होता. त्यात पश्चिम महाराष्ट्र आघाडीवर होता. मात्र, मागील काही वर्षांत विदर्भाची टक्केवारी वाढली आहे. त्यासाठी अशाप्रकारच्या अभ्यासिका कारणीभूत ठरल्या आहेत. खासदार बाळू धानोरकर यांच्या नावाने सुरू करण्यात आलेल्या अभ्यासिकेमुळे भिवापूर प्रभागातील बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी हक्काची जागा उपलब्ध करून देण्यात आली असल्याचे सांगितले. आमदार प्रतिभा धानोरकर यांनी, खासदार बाळू धानोरकर यांचे सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय असे काम आहे. प्रत्येक घरातील मुलगा-मुलगी शिकली पाहिजे, असे ते नेहमी म्हणायचे. आपल्या लोकसभा क्षेत्रात अभ्यासिका सुरू करण्याचे त्यांचे स्वप्न होते.

**कोटकरांचे सभागृह अन् अमृतकर, मेहरकुरेंचा पुढाकार :** चंद्रपूर शहरातील अभ्यासिकामध्ये भिवापूर वॉर्डातील विद्यार्थीसुद्धा स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी जातात. मात्र, येथील विद्यार्थ्यांना वॉर्डातच अभ्यासिकेची सोय उपलब्ध करून देण्याचा विचार गोविल मेहरकुरे यांच्या मनात आला. त्यानंतर मेहरकुरे यांनी हा प्रस्ताव गोपाल अमृतकर, अशोक कोटकर यांच्याकडे ठेवला. विद्यार्थी हिताचा विषय असल्याने कोटकर यांनी सभागृह उपलब्ध करून देण्याचे मान्य केले. यानंतर अमृतकर, मेहरकुरे यांनी अवघ्या १५ दिवसांत शहरातील काही दानशुरांच्या मदतीने अभ्यासिका उभी केली. यामुळे या त्रिमूर्तींचे वॉर्डातील नागरिकांकडून अभिनंदन केले जात आहे.



# पावसाळ्यात आरोग्याची काळजी घ्यावी : प्राचार्य नारायण कोलते

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील जय कालिंका देवी शिक्षण संस्था संचलित छत्रपती शिवाजी माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय सावळदबारा येथे 76 व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शाळेच्या वतीने विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांना वाव देऊन अनेक सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले त्यामध्ये गीत गायन स्पर्धा भाषण स्पर्धा नाटक स्पर्धा अशा विविध कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले शेवटी अध्यक्ष समारोप म्हणून प्राचार्य नारायण कोलते यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.

घरामध्ये हात स्वच्छ धुण्यासाठी साबण व इतर साधनांचा वापर करावा अंगावरील कपडे आपण ज्याप्रमाणे स्वच्छ ठेवतो शरीर सुद्धा स्वच्छ ठेवावे हाताचे नखे डोक्यावरील केस अनेक आजार वाढतात त्याची सुद्धा विद्यार्थ्यांनी काळजी घ्यावी. जेणेकरून आजार वाढणार नाहीत व निरोगी शरीर आपल्याला जगता येईल असे सर्व कॉल मार्गदर्शन प्राचार्य नारायण कोलते यांनी केले यावेळेस संस्थेचे अध्यक्ष भाऊराव कोलते व संचालक मंडळ उपस्थित होते गावातील आजी-माजी सरपंच प्रतिष्ठित नागरिक व पालक उपस्थित होते. तसेच शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी यांनी सदरील कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडला. सूत्रसंचालन भास्कर खमाठ सर यांनी केले. तर सर्वांचे आभार विकास पाटील यांनी मांडले यावेळी विजयसिंग राजपूत, मुकुंदा व्यवहारे, संजय जोशी, श्रीकृष्ण सोनवणे, सुदाम राठोड, ज्ञानेश्वर राठोड पंजाबराव शेळके, गणेश मोहने, योगेश थोटे, शिवाजी सत्रे, बाबासाहेब कोलते, अजबराव चव्हाण, श्याम जाधव व इतर शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# वैजापुरात आजपासून सदगुरू गंगागिरी महाराज सप्ताह: भव्य शोभायात्रेने आरंभ

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** सरला बेटचे महंत सदगुरू गंगागिरीजी महाराज यांच्या नावे असणारा १७६ वा अखंड हरिनाम सप्ताह सोमवार दि.२१/८/२३ सोमवार पासून भव्य शोभा यात्रेने आरंभ होत आहे. बेटाचे विद्यमान महंत मठाधिपती हभप रामगिरी जी महाराज यांच्या रथयात्रेने संकट मोचन हनुमान मंदिर ते सप्ताह स्थळ पर्यंत भव्य मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज पुतळा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, डेपो रोड, लाडगाव रोड ते सप्ताह स्थळ अशी निघणार आहे. ज्यात डीजे, बँड, पारंपरिक वाद्य,लेझीम पथक, झाज पथक,वारकरी संप्रदाय पथक, भजनी मंडळ, कलशधारी महिला,सनई वाद्य बैलगाडी व शेवटी महाराज यांचा रथ असे नियोजन आहे. रविवार (ता,२०)रोजी महाप्रसादालयाचे विधिवत उदघाटन करण्यात आले, या प्रसंगी आ. रमेश पा.बोरनारे, हभप मधू महाराज,कडूभाऊ काळे, बाबासाहेब जगताप,लिमेश वाणी,राजेंद्र साळुंके, पारस घाटे, दिनेश राजपूत, खुशालसिंह राजपूत,सीताराम वैद्य,ज्ञानेश्वर टेके, अरुण भालेकर, कल्याण जगताप,संजय बोरनारे, रणजित चव्हाण, अमोल बोरनारे, सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी धोंडीराम राजपूतयांच्या सह समितीचे सदस्य व भक्त मंडळी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# डोंबाळे परिवाराकडून शैक्षणिक कार्यास प्रोत्साहन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** पाडेगाव, ता.फलटण येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख रक्कम आणि पारितोषिक देऊन सन्मान करण्यात आला. स्वातंत्र्यदिनाच्या अनुषंगाने कै.नानासाहेब डोंबाळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ डोंबाळे परिवाराने प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाला गवसणी घातलेल्या इयत्ता ५ वी ते १० वी तील गुणवंतांचा विशेष सन्मान केला.हा सन्मान विद्यार्थ्यांना प्रेरीत करणारा ठरला असून या शैक्षणिक बांधिलकी बद्दल डोंबाळे परिवाराचे विशेष कौतुक केले जात आहे.डोंबाळे परिवाराकडून २५००,१५०० व १००० रुपये व पारितोषिके अशी बक्षीसे पहिल्या तीन क्रमांका साठी देण्यात आली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला उत्तेजित करणारे हे एक शैक्षणिक कार्य डॉ.मकरंद डोंबाळे व त्यांचे कुटूंबीय यांच्याकडून पार पडले.डोंबाळे परिवारातील आशालता डोंबाळे,डॉ.स्वप्नाली डोंबाळे,सूर्यकांत डोंबाळे,सुधीर डोंबाळे आदींच्या हस्ते हे बक्षीस वितरण करण्यात आले. तत्पूर्वी स्वातंत्र्यदिनाचे ध्वजारोहण शाळेने माजी सैनिक आबासाहेब शेळके,रोहीदास चव्हाण,भानुदास झगडे, घनश्याम चव्हाण यांच्या हस्ते करत एक अभिनव उपक्रम घेतला. तसेच स्वातंत्र्य दिन हा शैक्षणिक कार्यास प्रोत्साहन मिळवून देणारा ठरला. डोंबाळे परिवारा प्रमाणेच शैक्षणिक दातृत्वाचे उपक्रम पाहायला मिळाले.



शाळेतीलच शिक्षक सुनिल सस्ते यांनी दिवगंत आईच्या स्मृतीप्रित्यर्थ इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना रोख बक्षीस जाहीर केले. तसेच पाडेगाव सामाजिक विकास फाऊंडेशन अध्यक्ष व सामाजिक कार्यकर्ते गिरिश बनकर यांनी ५ गरजू विद्यार्थ्यांचे पालकत्व घेण्याचे जाहीर करून शैक्षणिक साहित्य स्वरुपात वही संच / शालेय दप्तर यांचे वाटप केले. महावितरणचे अभियंता मिलिंद डोंबाळे म्हणाले की, कै.नानासाहेब डोंबाळे यांनी अतिशय संघर्षातून स्वतःचे शिक्षण पूर्ण करून आपल्या मुलांसोबत नातलगांच्या मुलांचेही संगोपन केले. त्यांना त्यांच्या पायावर सक्षमपणे उभे केले. त्यांनी त्यांच्या वैयक्तिक आयुष्यामध्ये फुले, शाहु,आंबेडकर, व कर्मवीर आण्णांचा आदर्श बाळगला. आम्ही पाडेगावमधील शाळेमध्ये करित असलेले पारितोषिक वितरण हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी उपयोगी असून हे कार्य चिरंतन करण्याचा आमचा मानस आहे. कार्यक्रमास सरपंच राहुल कोकरे,उपसरपंच आशा मोहीते,सर्व ग्रामपंचायत सदस्य, राजेश खरात,माजी सरपंच स्मिता खरात,शेखर खरात,पंढरीनाथ लकडे, वसंतभाऊ मोरे, सुनिल खताळ, विकिराज येळे, तानाजी कोकरे आदी मान्यवर उपस्थित होते.


कार्यक्रमाची प्रास्ताविक मुख्याध्यापक अहिवळे यांनी केले तर सुत्रसंचलन प्रशांत खताळ यांनी केले.व आभार प्रदर्शन पटेल यांनी मानले.

# पॅसेंजर तीन तास थांबल्याने संताप

## माझी ड्युटी संपली आहे, मी गाडी चालवणार नाही

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** लोकल ट्रेन म्हणा किंवा एक्स्प्रेस ट्रेन असोत, उशीर हा त्यांच्या पाचवीलाच पुजलेला आहे, असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. मुंबईसह राज्यभरात लोकल ट्रेन किंवा एक्स्प्रेस ट्रेन उशीरा आल्याने प्रवाशांकडून करण्यात येणाऱ्या तक्रारी या जणू आता सगळ्यांचाच अंगवळणी पडल्या आहेत. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यात या सगळ्यावर कळस गाठणारा प्रकार घडला आहे. चंद्रपुरातील मूल रेल्वे स्थानकात रविवारी रात्री घडलेल्या नाट्याची सध्या चांगलीच चर्चा सुरु आहे. गोंदिया - बल्लारपूर पॅसेंजर ट्रेन ही रात्री साडेदहा वाजता मूल स्थानकात पोहोतचे. मात्र, ही ट्रेन रविवारी मूल येथे पोहोचायला रात्रीचा दीड वाजला होता. अगोदरच गाडी उशीरा आल्याने रेल्वेची प्रतीक्षा करणाऱ्या प्रवाशांचे तीन ते चार तास हाल झाले. मात्र, खरे नाट्य यानंतर सुरु झाले. या एक्स्प्रेस गाडीच्या मोटारमनने चंद्रपूर स्थानकात पोहोचताच माझी ड्युटी संपली आहे, मी आता गाडी चालवणार नाही, असा हेका धरला. यामुळे प्रवासी चांगलेच संतापले. हा प्रकार मूल रेल्वे स्टेशनवर काल मध्यरात्री घडला. अखेर रेल्वे प्रशासनाने लेखी दिल्यानंतर पॅसेंजर ट्रेन पुढे सरकली. मात्र यादरम्यान प्रवाशांना चांगलाच मनस्ताप सहन करावा लागला. अनेक दिवसांपासून या मार्गावरील पॅसेंजर गाड्या नियमीत उशीरा चालत असल्याने रेल्वे प्रवाशी नाराजी व्यक्त करत आहेत. रात्री बारा वाजता पॅसेंजर मुल स्टेशनवर थांबली. जवळपास एक ते दीड तास तिथेच अडली. यावर प्रवाशांनी गाडीला उशीर का झाला, अशी विचारणा



स्टेशन मास्तरांना केली. त्यावर स्टेशन मास्तरांनी प्रवाशांशी हुज्जत घालायला सुरुवात केली. महिला प्रवाशीही स्टेशन मास्तरच्या कचाट्यातून सुटल्या नाहीत. गोंदियातून निघणारी ही पॅसेंजर ट्रेन दहाच्या आसपास मुल किंवा चंद्रपूर स्थानकात दाखल होणे अपेक्षित आहे. त्यानंतर ही गाडी पुढे बल्लारपूरच्या दिशेने रवाना होते. मात्र, गेल्या काही दिवसांपासून ही पॅसेंजर ट्रेन वेळेवर येतच नाही. त्यामुळे प्रवाशांना स्थानकात उतरल्यानंतर घरी पोहोचण्याचा प्रवास रात्री-अपरात्री करावा लागतो. या सगळ्यामुळे प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. गाडीत हृदयविकाराचे प्रवासी, कुटुंबाचे धाकधुक वाढली. या रेल्वेतून प्रवास करणाऱ्यांमध्ये हृदयविकाराच्या एक रुग्ण होता. त्याला तात्काळ चंद्रपूरला नेणे गरजेचे होते. मात्र रेल्वे सुटायला फार उशीर होत असल्याने त्या रुग्णाच्या कुटुंबाची धाकधूक वाढली होती. त्यामुळे त्यांनी रेल्वे प्रशासनाला गाडी लवकर सोडायची विनंती केली होती. मात्र तेथील स्टेशन मास्तर प्रवाशांशी हुज्जत घालत राहिले.